# माणूस

शनिवार । ९ जुलै १९७७
७५ पैसे



आंध्रमधील नक्षलवादी चळवळीचा विचार करताना एक गोष्ट प्रथम ध्यानी घेतली पाहिजे, ती म्हणजे आंध्रच्या एकूण लोकसंख्येच्या ५९ टक्के जनता आदिवासी–हरिजन–गिरिजन आहे. म्हणजे मागासलेल्या विभागात मोडणारी आहे. दारिद्र्य–रेषेखालील आहे, शिवाय बहुसंख्यही आहे.

नक्षलवादाच्या शोधात
लेखांक एक ( पृष्ठ ८ )

## लोकआयुक्तांना दुसरे हायकोर्ट निर्माण करावयाचे आहे का ?

–मुख्य मंत्री वसंतरावदादा

## साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे–अंक सहावा**

**९ जुलै १९७७**

**मूल्य पंचाहत्तर पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
◻
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◻
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◻
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◻
दूरध्वनी : ४३४५९
◻


# लोकआयुक्त विरुद्ध मुख्य मंत्री!

## माहितगार

यशवंतराव चव्हाण यांच्या महाराष्ट्रातच काँग्रेसजन त्याचे ऐकत नाहीत, याचे परिणाम यशवंतरावाना देशाच्या पातळीवर भोगावे लागत आहेत. प्रत्येक नेत्याला त्या त्या राज्याचा पाठिंबा असल्याशिवाय त्याचे राजकारण चालत नाही. भारतासारख्या संघराज्यात देशाच्या पातळीवर नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी प्रथम त्याला स्वतःच्या राज्यात एकमुखी पाठिंबा असण्याची जरुरी आहे. त्याशिवाय इतर राज्यांतून पाठिंबा मिळवता आला पाहिजे तरच देशाच्या पातळीवर नेतृत्व प्रस्थापित करण्यास अनुकूलता निर्माण होते. गेली काही वर्षे यशवंतरावांचे नेतृत्व महाराष्ट्रात अबाधित होते. त्यामुळे देशाच्या पातळीवर यशवंतराव एक शक्ती मानली जात होती. त्यामुळेच १९६९ साली माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी यशवंतरावाना हाकलू देण्याचा विचार बदलला होता. राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीकरिता यशवंतराव चव्हाण यांनी संजीव रेड्डी यांच्या बाजूने मत दिले तेव्हा इंदिरा गांधी यांनी त्याचा सूड म्हणून मंत्रिमंडळातून यशवंतरावाना वगळण्याचा विचार डी. पी मिश्राच्या सल्ल्यानुसार केला होता; पण मिश्रा यांनीच लोकसभेतील मताधिक्याचा हिशोब केला आणि यशवंतरावाविरुद्ध कारवाई करणे धोक्याचे होईल असे श्रीमती गांधींना पटवून दिले होते. काँग्रेस फुटली तेव्हा श्रीमती गांधी यांना लोकसभेत २३ जणांचे बहुमत होते. यशवंतरावांना मानणारे महाराष्ट्रातील ४० खासदार होते. यशवंतरावाना मंत्रिमंडळातून वगळले असते तर बहुमतच गेले असते. ते टाळण्यासाठी श्रीमती गांधींनी यशवंतरावाना मंत्रिमंडळात ठेवले होते. राज्याचा पाठिंबा यशवंतरावाना होता त्यामुळे त्यांच्याविरुद्ध कारवाई करता आली नाही. देशाच्या पातळीवर नेतृत्व करणाऱ्यांना राज्याचा पाठिंबा नसेल तर त्यांची अवस्था तुटलेल्या पतंगाप्रमाणे होते. यशवंतरावाच्या मागे शक्ती होती तेव्हा त्याच्या शब्दाला, कृतीला महत्त्व होते. असलेल्या शक्तीचा वापर आपली ताकद आणखी वाढविण्यासाठी करण्याऐवजी यशवंतराव आहे ते स्थान टिकविण्याकरिताच करू लागले. स्थान टिकविण्याच्या या प्रयत्नामुळे यशवंतरावाना इतर राज्यातील नेत्यांचा विश्वास मात्र गमवावा लागला

यशवंतरावानी अखिल भारतीय राजकारणात कुंपणावर बसण्याची आणि महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात दोन गटांतील कोंबडी झुंजविण्याची भूमिका घेतली व आपले नेतृत्व प्रस्थापित केले जिल्ह्या जिल्ह्यातील गट कमी ताकदीचे होते तोपर्यंत मध्यस्थीसाठी हे गट यशवंतरावाकडे येत व यशवंतराव मध्यस्थी करीत. दोन्ही गट इतक्या वर्षानंतर समर्थ झाल्याने ते आपल्या सामर्थ्याच्या जोरावर आपले निर्णय करू लागले. साहजिकच हळूहळू यशवंतरावांचे महत्त्व कमी होऊ लागले. त्यातच इंदिरा गांधी यांची पकड घट्ट होत गेली. त्यांनीही मधल्या काळात राज्यातील सुभेदाऱ्या पूर्ण मोडून काढल्या किंवा मोडीत काढण्याची प्रक्रिया केली होती. त्यामुळेही यशवंतरावाच्या स्थानाला महाराष्ट्रात धक्का बसला. महाराष्ट्रातच त्यांच्या स्थानाला धक्का बसला असल्यामुळे देशाच्या पातळीवर काँग्रेसजन त्याचे नेतृत्व मानण्यास तयार नाहीत. त्याचा प्रत्यय लोकसभेत येत आहे. लोकसभेत यशवंतराव विरोधी पक्षाचे नेते आहेत. हिंदी–इंग्रजीवरून लोकसभेत गडबड-गोंधळ झाला. आरोग्यमंत्री राजनारायण इंग्रजीतून उत्तर देण्यास तयार नव्हते काँग्रेस-सदस्य इंग्रजीचा आग्रह धरीत होते. सदस्यावर भाषेची सक्ती करता येत नाही त्यामुळे राजनारायण यांच्याकडे इंग्रजीच

आग्रह धरता येणार नाही असे यशवंतराव म्हणत होते व सदस्यांना शांत राहण्याविषयी सांगत होते; पण सदस्यानी आपल्याच नेत्याचे ऐकले नाही. अनुयायांनी नेत्याचे सांगणे ऐकले नाही यातच नेतृत्व कशा कसाचे आहे हे स्पष्ट झाले. ४२ व्या घटना-दुरुस्तीबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन यशवंतरावानी जनतासरकारला दिले; पण राज्यसभेत व्ही. बी. राजू यानी याबाबत विरोध दर्शविला. ससदीय कॉंग्रेसपक्षाचे नेते म्हणून यशवतराव सरकारला या प्रश्नावर सहकार्याचे आश्वासन देतात; परंतु पक्षाचे सरचिटणीस असलेले राज्यसभा सदस्य व्ही. बी. राजू त्याविरुद्ध भूमिका घेतात. यात नेतृत्व राहिले कोठे ? कॉंग्रेसच्या पराभवानतर ३–४ महिन्यांतच यशवतरावाच्या अखिल भारतीय पातळीवरील नेतृत्वाची अशी कुतरओढ झाली असल्याने फार काळ त्याच्या नेतृत्वाला आजच्या इतके तरी वजन राहील का असा प्रश्न पडतो ! ◻

शंकरराव–पी. के. सावंत यांच्या गटाने कॉंग्रेस सोडण्याचा निर्णय जाहीर केला तेव्हा बाहेर पडणारे पंधरा–वीसच आमदार आहेत असे यशवतरावाचा गट सागत होता; परंतु आजपर्यंत महाराष्ट्रात कॉंग्रेस सोडण्याची प्रक्रिया घडलेली नाही. त्यामुळे हा आकडा सख्या म्हणून कमी वाटला तरी घटना म्हणून धक्का देणारा आहे हे सोयिस्करपणे विसरले जात आहे. पक्षातील इतरही आमदार वेगवेगळा गट करून कॉंग्रेस सोडण्याचा विचार करीत आहेत. जनता व शेतकरी कामगारपक्षाचे नेते या गटाच्या गाठीभेटी घेऊ लागले तेव्हा कॉंग्रेसचे नेते हादरून गेले. शंकरराव चव्हाण–पी. के. सावत याच्या भेटीला मुख्य मत्री पाटील, प्रदेशाध्यक्ष नरेंद्र तिडके याना यशवतरावानी पाठविले. या भेटीत पक्ष सोडण्याचा आम्ही का विचार करीत आहोत त्याची अनेक कारणे शकरराव–पी. के. गटाने स्पष्ट केली. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे प्रमुख कारण या गटाने सागितले आहे. अन्नधान्य–उत्पादन वाढावे म्हणून पाटाचे पन्नास टक्के पाणी धान्याकरिता देण्याचा निर्णय घेतला होता. त्याचप्रमाणे कर्जाची परतफेड करण्याची ऐपत असताही कर्जफेड केली नाही त्याच्या जमिनी जप्त करण्यात आल्या होत्या. कापूस खरेदी योजना राबविता यावी म्हणून शेतमाल किमतमडळाने ठरवून दिलेली किमत मान्य करण्यात आली होती, परंतु वसंतराव पाटील यांच्या सरकारने हे निर्णयच बदलले आहेत गरिबाचा कार्यक्रम म्हणून जो मानला गेला, तोच कार्यक्रम बदलला असून धनिकांना ज्याचा लाभ होईल असे निर्णय घेतले. त्यामुळे आम्हाला पक्षात राहणे योग्य वाटत नाही असे शंकरराव–पी. के. गटाने सांगितले.

**बंडखोरांनी पक्ष सोडण्याचे हे कारण सांगितल्यानंतर प्रदेश कॉंग्रेस अध्यक्ष नरेंद्र तिडके यांनी जो युक्तिवाद केला त्यामुळे मुख्य मत्री पाटील यांची मोठीच पंचाईत झाली 'तुम्ही म्हणता त्याप्रमाणे कार्यक्रम झपाट्याने बदलला गेला व तो गरिबांच्या हिताविरोधी जाणारा आहे हे खरे ! कार्यक्रमाच्या आग्रहाबाबत मी तुमच्याशी सहमत आहे; परंतु आपल्याला जे पाहिजे ते पक्षात राहून घडवून आणू या ! पक्ष सोडून ते साध्य होणार नाही !' असे तिडके यांनी शंकरराव चव्हाण व पी. के. सावंत यांना सांगितले.**

पक्षात राहून पक्षशुद्धीकरणाची मोहीम हातात घेऊ या असे म्हणणारेही कॉंग्रेसमध्ये आहेत. त्याचा प्रयत्न किती यशस्वी होणार व त्याचा जनतेवर किती परिणाम होणार हा प्रश्न आहे.

कार्यक्रमाबाबत शकरराव आदि जे म्हणतात ते जरी खरे असले तरी पक्ष सोडण्याच्या त्याच्या निर्णयामागे तेवढेच कारण आहे अशातला भाग नाही. वसंतराव नाईक याच्या कारकीर्दीमध्ये असेच घडत होते. महाराष्ट्र कॉंग्रेस ठराव करून आपले पुरोगामित्व सिद्ध करीत होती; पण सरकार प्रदेश कॉंग्रेसच्या ठरावाची अंमलबजावणीच करीत नव्हते. त्या वेळी या लोकांनी कार्यक्रमाचा आग्रह धरून पक्ष सोडण्याची किंवा पक्षात बंड करण्याची भाषा केली नव्हती. आजच कार्यक्रमावर आग्रही भूमिका ही मडळी का घेत आहेत ? सध्याचे नेतृत्व मान्य करून शंकरराव–पी. के. सावंत आदि पक्षात राहते तर त्याना पक्षात गौण स्थान राहिले असते. त्यापेक्षा पक्ष सोडणे बरे हा विचार त्यांनी केला आहे लोकसभा निवडणुकीनंतर राजकीय वातावरण बदलले आहे. कॉंग्रेसमध्ये राहण्यापेक्षा बाहेर पडल्याने आपले राजकारण साधले जाणार आहे, राजकारणात निर्माण झालेले आकस साधता येणार आहेत म्हणूनच ही मंडळी पक्ष सोडणार आहेत. अर्थात बंडखोराच्या तक्रारीत अर्थ नाही असेही कोणाला म्हणता येणार नाही. ◻

महाराष्ट्रातील फूट आपण थांबवू शकलो नाही तर इतर नेते त्याकडे बोट दाखवतील ही यशवतराव चव्हाण याची भीती आहे. तशीच आणखीही एक भीती त्याना वाटत असावी !

पक्ष फुटू देऊ नका असे इदिरा गाधी यानी मुख्य मत्री पाटील याना सागितले. इदिरा गाधीच्या सागण्यानुसार वसतराव पाटील यानी काही तडजोड घडवून आणली व पक्षाला फुटीच्या धोक्यापासून वाचविले तर आपल्याला महाराष्ट्रात जे घडवून आणता आले नाही ते इतरांनी घडवून आणले तर? हाही आपल्या नेतृत्वाचा पराभव ठरेल ! ही भीती यशवंतरावांना होती म्हणूनच त्यांनी अखेरच्या क्षणी शकरराव चव्हाण याची भेट घेतली, पण शकररावानी यशवंतरावांचे त्या भेटीत वाभाडेच काढले !

**'पक्षातून ज्यांना जायचे आहे त्यांनी खुशाल जावे. त्यांना रोखण्यात अर्थ नाही. त्यांच्या जाण्यानंतर जो पक्ष राहील त्याला बरोबर घेऊन पक्ष-उभारणी करू या !' असे यशवंतरावांनी आम्हाला सांगितले आहे असे एका मंत्र्याने मला नुकतेच सांगितले**

वि स पागे यानी हीच भूमिका घेतली व ती जाहीरपणे शिबिरात मांडण्याचे ठरविले. तेव्हा यशवंतरावानी पागे याना रोखले आणि त्याचा मूळ प्रबंध जाळून नष्ट करण्यास सागितले; पण खासगी बैठकामधून यशवतराव ज्याना बाहेर पडावयाचे आहे त्यांनी खुशालपणे बाहेर पडावे अशी भूमिका घेत आहेत. 'ज्याना बाहेर पडावयाचे आहे

त्यांनी खुशाल जावे ही यशवंतरावाची भूमिका नाही. जो मंत्री त्यांची तशी भूमिका आहे असे सांगत आहे ते खरे नाही' असेही यशवंतरावाविषयी फारशी आपुलकी राहिलेली नाही अशा एका महाराष्ट्र कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्याने मला सांगितले.

बाहेर पडणारे कॉंग्रेस आमदार सरकारविरुद्ध भ्रष्टाचाराचा जेवढा पुरावा गोळा करता येईल तेवढा गोळा करून सरकारचे चारित्र्य उघड्यावर मांडणार व त्यासाठी लोकआयुक्ताच्या अहवालाचा आधार घेतला जाईल. इंडियन एक्स्प्रेसने लोकआयुक्तानी कोणाला दोषी ठरविले आहे त्यासंबंधी ह गो. वर्तक व नाशिकराव तिरपुडे याची नावे देऊन बातमी दिली आहे. लोकआयुक्ताचाच आधार विरोधक घेणार हे स्पष्ट आहे. इंडियन एक्स्प्रेसमध्ये बातमी आल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्या बातमीवर चर्चा झाली असे सांगण्यात येते.

मंत्रिमंडळातीलच कोणी तरी ही बातमी बाहेर फोडली असावी असा संशय अनेक मंत्र्यांना वाटत आहे. या प्रकरणी अर्थमंत्री यशवंतराव मोहिते याच्याकडे संशयाने पाहिले जात आहे. लोकआयुक्तांनी दोषी ठरविल्यामुळे मंत्र्याची कुचंबणा झाली आहे. त्यातून मार्ग कसा काढावा याची चर्चा झाली तेव्हा दोन पर्याय सुचविण्यात आले असे सांगण्यात येते.

**लोकआयुक्तांच्या व्यवहारांची चौकशी करावी व त्यांच्यावरच एखादा ठपका ठेवता आल्यास पाहावे किंवा सध्याचे लोकआयुक्त एस पी. कोतवाल यांची मुदत संपत आली असेल तर त्यांना मुक्त करावे असे दोन विचार आहेत.**

लोकआयुक्ताविषयी संशय घेतला आणि त्या संशयाला काही आधार आहे असे मानले तर त्यातूनही काही प्रश्न निर्माण होतात. ज्याच्या चारित्र्याविषयी संशय आहे अशाची नियुक्ती करणाराच्या हेतूविषयीही मग शंका घ्यावी लागेल वसंतराव नाईक यानी सध्याच्या लोकआयुक्ताची नेमणूक केली होती. लोकआयुक्ताविषयी संशय घेता आला तरी त्यांनी ज्याना दोषी ठरविले आहे ते काही निर्दोष ठरू शकत नाहीत!

**पण मुख्य मंत्री वसंतराव पाटील यांनी लोकआयुक्तांशी थंडे युद्धच आरंभिले आहे लोकआयुक्तांकडे एखादी तक्रार गेली की त्यांनी त्या प्रकरणी चौकशी करावी, साक्षीपुरावा गोळा करावा हे दादांना मान्य नाही अशा पद्धतीने लोकआयुक्तांचे काम चालणे म्हणजे दुसरे हायकोर्टच निर्माण होणे असे वसंतदादा म्हणतात. लोकआयुक्तांकडे आलेल्या तक्रारीत लक्ष घालून त्यांच्यातील खरेखोटेपणा पाहणे म्हणजे जर मुख्य मंत्र्यांना दुसरे हायकोर्ट वाटत असेल तर त्यांनी लोकआयुक्ताचे पदच रद्द करून टाकणे श्रेयस्कर नाही का?**

पक्षाची गळती व मंत्र्याचा भ्रष्टाचार एकदमच उफाळून आले असून पक्षांतराची साथ कमी व्हावी यासाठी तिडके-यशवंतराव चव्हाण शेवटच्या क्षणी धावपळ करू लागले आहेत. पक्षातून फारसे लोक जाणार नाहीत असे म्हटले जात असतानाच ही धावपळ का होत आहे? पक्ष सोडणारे, पक्षात राहून भांडणारे व लोकआयुक्ताचा अहवाल यामुळे कॉंग्रेसची प्रतिमा डागळणार आहे यशवंतराव चव्हाण यांनीही मनापासून प्रयत्न केले आणि त्याना पक्षाची गळती थांबविता आली नाही तर अ भा पातळीवर उरल्यासुरल्या कॉंग्रेसचे नेतृत्व करण्याच्या यशवंतरावांच्या स्वप्नालाही तडे जाणार आहेत.

'तुम्ही मला चांगली वागणूक दिली नाही' असे यशवंतरावानी शंकररावाना सांगितले होते आणि 'इंदिरा गांधीमुळे मी मुख्य मंत्री झालो आहे. त्यांची मर्जी सांभाळून मला तुमच्याबरोबर संबंध ठेवायचे आहेत, ही तारेवरची कसरत मला करावी लागणार आहे, पण ज्या वेळी मला निर्णय घेणे अवघड होईल तेव्हा मार्गदर्शन घेण्यासाठी तुमच्याकडे येईन असे मी सुरुवातीपासून तुमच्या कानावर घातले आहे त्याचप्रमाणे ज्या ज्या वेळी मी दिल्लीला आलो तेव्हा तेव्हा तुम्हाला भेटल्याशिवाय गेलेलो नाही असे असताना मी चांगली वागणूक तुम्हाला दिली नाही हे कसे म्हणता?' असे शंकरराव चव्हाण यानी यशवंतराव चव्हाण याना ओबेराय शेरेटन हॉटेलात झालेल्या भेटीच्या वेळी विचारले होते चव्हाण-द्वयामध्ये झालेला हा संवाद दोघात किती कडवटपणा आहे हे स्पष्ट करतो. अशा वेळी यशवंतराव, शंकरराव चव्हाणाना व त्याच्या सहकाऱ्यांना रोखण्यात यशस्वी होतील असे कसे मानता येईल? त्यामुळे यशवंतरावाच्या प्रयत्नाला यश येईल असे दिसत नाही आणि त्याच्या प्रयत्नाला यश आलेच तर त्यासठी यशवंतरावाना फार मोठी किंमत मोजावी लागेल! किंमतीचा विचार केल्यास यशाची किंमत फारच कमी असेल असा सौदा यशवंतरावाना करावा लागेल! तो त्याना परवडणारा नाही. म्हणजेच पक्ष सोडणाराना त्याच्या विचारापासून परावृत्त करता येणार नाही.

शंकररावाना मुख्य मंत्रिपद व पी के. सावंत यांना प्रदेश-कॉंग्रेसचे अध्यक्षपद देण्याची यशवंतरावाची तयारी होईल का? यशवंतरावानी ती तयारी दर्शविली तरी पक्षातील शंकररावविरोधी असलेला गट ते मान्य करून पक्षात राहीलच काय? अशा पेचाचा हा सौदा ठरणार असल्याने यशवंतरावांच्या प्रयत्नाला यश येण्याची लक्षणे नाहीत! बंडखोरही इतके पुढे गेले आहेत की त्यानी आपला निर्णय बदलला तर त्याच्यावर कोणाचा विश्वासही राहणार नाही हे सर्व पर्याय विचारात घेता आता तडजोडीला वाव राहिलेला नाही हेच खरे! □

पॅपिलॉन

पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# चक्रम्चक्री ( १८ )

दीर्घस्मृती विश्वनाथ

# हवा कॉलेजची-कोल्हापूर

गेल्या आठवड्यात कोल्हापूरला गेलो होतो.

त्ये कश्यापाई ?

का हो, एकदम गावरान भाषेत शिरला?

न्हाई, म्हजी पावनेलोकास्नी भेटाया ग्येलो, म्हून बोललो.

हे असे असते बघा आपल्या पुणेकराचे. मी कोल्हापूरला गेलो होतो, तो गोखले–कॉलेजच्या शिक्षकांनी चालविलेल्या धामधुमीची माहिती घ्यायला. त्या वेळी मला पुण्यातले एक कॉलेज–शिक्षक भेटले.

काय म्हणाले ?

दर हगामाला तीन–चार परीक्षा आणि एक–दोन क्रमिक पुस्तके याचा घाणा घालणारा तो तुस्त–मस्त आणि जबरदस्त प्राध्यापक-पुंगव आपला गजशुंडेप्रमाणे पुष्ट असलेला बाहू मज गरिबाच्या खांद्यावर ठेवून म्हणाला, 'विश्वनाथ, मी कुणाला सल्ला देत बसत नाही; पण तू माझा विद्यार्थी म्हणून सांगतो.'

तुम्ही विद्यार्थी आहात त्याचे? कधी बोलला नव्हता.

मी कधीच त्याचा विद्यार्थी नव्हतो. ग्रह-बल थोर आमचे, विद्यार्थिदशेतले, म्हणून वाचलो >कारण या शिक्षकश्रेष्ठीचे दर्शन विद्यार्थ्यांना दर सहामाहीतून दोन–तीनदा झाले तर त्या वर्षीच्या बॅचमध्ये बऱ्यापैकी विद्यार्थिनी असाव्यात असे मानले जाते. म्हणजे 'तसे' वाईट नाहीत ह ते !

बरे, पण पुढे काय म्हणाले ?

हा, तर म्हणाले, 'हे बघ, त्या शेमलेवाल्याच्या भानगडीत आपण पडू नये. त्या मॅनेजमेंट्सही तसल्याच आणि शिक्षकही त्यातलेच आपण आपली लावून गंमत बघावी.' मी म्हणालो, 'सर, पचाहत्तर साली तुम्ही पगारवाढीसाठी परीक्षांवर बहिष्कार घातलात तेव्हा याच पावनेलोकाच्या माडीला माडी लावून प्रभा रावांशी वाटाघाटी करायला गेला होतात. तेव्हा बरा तुम्हाला शेमलेवाल्याचा संबंध चालला ?' तेव्हा आपल्या कावेबाजपणाचे कौतुक दाखविणारे स्मित करीत आणि हाताच्या अंगठ्याने माझ्या पाठीत टोचीत गुरुवर्य म्हणाले, 'सरकारशी भांडतानाची गोष्ट वेगळी तेव्हा७००–१६०० या स्केलचा प्रश्न होता. सरकार पागोटेवाल्याचे, तेव्हा आमच्यातही पागोटेवाले आहेत हे दाखवायला हवे होते. खरे म्हणशील तर जो पगार मला तोच पिंपळगाव-बसवंतच्या किंवा जयसिंगपूरच्या अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्या प्रोफेसराला मिळावा, हे मला मान्य नव्हते ' मी म्हणालो, 'जरा बघून तर येतो गोखले कॉलेजचा मामला !'

## शिक्षण–शौंड

दुपारी ३॥ ला कोल्हापूरसाठी जादा एस. टी. असते, असे कळले होते. स्टेशनवर गेलो तो कळले की, आज जादा गाडी सुटणार नाही. जरा तोंड वाजवावे लागले. तेवढ्यात कंट्रोलरशी ज्याचे पटत नव्हते असा एक एस टी. वालाही आमच्या बाजूने बोलू लागला. होता होता सव्वासात वाजता जादा गाडी सुटली. रस्ता झकक आहे, ड्रायव्हरही गमतीत होता सव्वानऊ वाजता कोल्हापूरला पोचलो आमच्या डॉक्टरसाहेबांकडे उतरलो. डॉक्टर म्हणजे फक्कड माणूस, औषधाच्या बाटलीत बुडालेल्यापैकी नव्हे. रामराम–शामशाम झाले. गोखले कॉलेजवरून गोष्टी निघाल्या.

बरेच किस्से असतील !

तर हो ! एवढ्याशा अडीच–तीन लाख वस्तीच्या गावात सात कॉलेजेस्. शिवाय आसपासच्या दहा मैलांच्या परिसरात आणखी सात. एकोणिसशे साठ साली सरकारने बाराशेच्या आतल्या लोकांना फुकट शिक्षण चालू केले. त्यामुळे लगालगा गावगन्ना कॉलेजे निघाली. इतकी की, तीनच वर्षांत सरकारला कोल्हापूरला युनिव्हर्सिटी काढावी लागली. मराठा समाजाने कॉलेज काढले की, जैनांना वाटायचे, आमचे कॉलेज का नको; जैनांचे निघाले की, लिंगायताचे हवेच. त्यातून आमदारांच्या साठमाऱ्या !

त्या कशा काय ?

कोल्हापूरचा सिलसिला निराळाच आहे साहेब ! तुम्हाला आमदार व्हायचे असेल तर तुमच्या खिशात एक साखरकारखाना, एक कॉलेज आणि दोन–तीन शाळा असाव्या लागतात कोल्हापुरातली कॉलेजे आमदाराच्या नावावरच ओळखली जातात. शहाजी कॉलेज श्रीपतराव बोंद्रयाचे; कॉमर्स कॉलेज रत्नाप्पाचे, गोखले कॉलेज व्ही. एल. पाटलाचे असा हिशेब चालतो. त्याखेरीज बाळासाहेब देसायांचे कॉलेज आहे, बापूजी साळुंख्याचे आहे, सरकारी राजाराम कॉलेज तर आहेच ! राज(कारणी) पुरुषाचे कुंकू लागल्याखेरीज कॉलेज सौभाग्यसंपन्न होत नाही.

पण लीला तरी काय आहेत या शिक्षणश्रेष्ठींच्या ?

अप्पासाहेब पवार हे शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु मोठे नाकबगार आणि कर्तबगार प्रसिद्धिपटू. बोलणे मऊ–मधाळ आणि साखरेवाळ. वचक आणि दराराही फार. पक्षाघाताने आजारी पडून पुण्याला जायला निघाले, तर शिवाजी विद्यापीठाचा सारा शिक्षकवर्ग 'अप्पासाहेब पवार की जय'च्या घोषणा देत स्टेशनवर हजर ! इतके प्रेम मिळवले अप्पासाहेबांनी ! आता रिटायर्ड झाल्यावर हीच मंडळी सांगत असतात की, अप्पासाहेबांच्या युनिव्हर्सिटीतल्या बंगल्यात विद्यापीठात नेमलेल्या माळ्याच्या देखरेखीखाली काढलेली भाजी बाजारात अप्पासाहेबांच्या नावाने विकली जाई, म्हणून. प्रत्येक मोठ्या माणसाला निंदक असतातच. माझी खात्री आहे की, ही निंदा खोटीच असणार.

मी असेही ऐकलेय् की, अप्पासाहेबांच्या मनात 'आपला नि परका' अशी भावना होती म्हणून.

अप्पासाहेब काही 'वसुधैव कुटुंबकम्' या पातळीला पोचले नव्हते. त्यांना वाटतही असेल की, विवेकानंद संस्था किंवा रयत शिक्षण संस्था या आपल्या आहेत आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी परकी आहे. त्यामुळे डे. ए. सोसायटीने जेव्हा कोपर-

गावला कॉलेज काढायची परवानगी मागितली तेव्हा अप्पासाहेबांनी दोनदा मत देऊन ती परवानगी नाकारली.

ते कसे काय ?

जेव्हा विद्यापीठाच्या कार्यकारिणीकडे प्रश्न आला तेव्हा मतदान घेण्यात आले. त्या वेळी अप्पासाहेबानी परवानगी देण्याच्या विरुद्ध मत दिले. दोन्ही बाजूना समान मते पडली. त्यानतर अप्पासाहेबांनी आपले अध्यक्ष म्हणून जादा असलेले मतही परवानगीच्या विरुद्ध दिले. उगीच पुन्हा पुन्हा विचार करायला नको !

बापूजी साळुंखे म्हणून एक देवमाणूसही बरीच कॉलेजे आणि शाळा चालवून राहिलाय् म्हणे !

बापूजीची संस्था म्हणे रयत शिक्षण संस्थेच्या तोडीची असून अनेक जिल्ह्यांत त्याच्या शाळा पसरलेल्या आहेत ?

खरे आहे ते. त्यामुळे बापूजीना सतत प्रवास करावा लागतो फुटाणे खाऊन दिवस काढायचे आणि त्यात प्रवासाची दगदग. शेवटी शिक्षकानाच कणव आली बापूजीची. बापूजी नको नको म्हणत असता त्यानी ठराव केला की, एक महिन्याचा पगार प्रत्येकाने देणगी देऊन बापूजीसाठी कोरी ॲम्बॅसॅडर घ्यायची ! आपल्या संस्थेतल्या नोकराचे असे दृष्ट लागण्याजोगे प्रेम मिळालेय का कोणाला ?

## गोखले कॉलेज

अरे हो, तुम्ही कोल्हापूरला गेलात ते गोखले कॉलेजच्या माहितीसाठी. काय हकीकत आहे ती ?

सगळे कसे बैजवारीने आणि दमादमाने घ्यावे. कुठवर आलो होतो मी ?

डॉक्टरांकडे गप्पा मारीत बसला होतात.

हां. तर झोपायला बराच उशीर झाला. सकाळी उठलो. ऐकले होते की, 'बिंदू चौकात गोखले कॉलेजी प्राध्यापकमंडळी उपोषणाला बसली आहेत म्हणून. तेव्हा तिथे गेलो तर सगळी सामसूम. जवळच 'जनता कंझ्युमर्स कोऑपरेटिव्ह स्टोअर्स' अशी पाटी पाहून आपुलकी वाटली. जाऊन चौकशी केली. 'जनते'त पाटीलमंडळी' हल्ली पुष्कळ. एक पाटील तिथेही भेटले. त्यांनी मला प्राध्यापक साळुंख्यांकडे पाठविले. त्यांचे गणिताचे क्लासेस आहेत. हे साळुंखे मला 'महावीर महाविद्यालया'त घेऊन गेले. तेथेही ते गणित शिकवतात. 'वर्धमान महाविद्यालया'त आमचे जुने दोस्त संभाजीराव जाधवांची गाठ पडली

हे कोण संभाजीराव जाधव ?

संभाजीराव आमचे वर्गमित्र. शिवाजी विद्यापीठ शिक्षकसंघाचे अध्यक्ष. अनेक कॉलेजे फिरून माणूस सध्या महावीर कॉलेजात टेकला आहे. नोकरीच्या धरसोडीच्या त्यांच्या कहाण्याही ऐकण्यासारख्या आहेत.

पण आता त्या नकोत ! आपले गोखले कॉलेजचे बोला.

तर, संभाजीरावानी गोखले कॉलेजची आणि त्याचे चालक–पालक–मालक एम्. आर. देसाई याची तपशीलवार बखर ऐकवली.

माणसाच्या नावात आद्याक्षरे वापरण्याची ही दक्षिण महाराष्ट्राची विशिष्ट लकब दिसते. व्ही. एल. पाटील, पी. जी. पाटील, एम. आर. देसाई अशी नावे सहसा इकडे वापरीत नाहीत. पु. भा. भावे, श्री. ज. जोशी अशी मराठी आद्याक्षरे पुण्या–मुंबईकडे जास्त आढळतात.

आता विषयांतर नको. तर हे गोखले कॉलेज सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी बाळासाहेब खर्डेकर यांनी काढले. एम्. आर. हे त्यांचे सहकारी. खर्डेकर त्रेसष्ट साली वारले, त्यांनी आत्महत्या केली. त्या वेळी अंत्यसंस्कार होत असताना एम्. आर. धाय मोकलून रडले. 'मी विधवा झालो' असे उद्‌गार त्यानी काढले !

द गॉल वारल्यानंतर पॉम्पीडू यांनीही असेच म्हटले होते की, 'आज फ्रान्स विधवा झाला !'

नंतर एम्. आर. संस्थेचे सर्वाधिकारी झाले. तसा त्यांचा हुद्दा होता आणि आहे सेक्रेटरीचा; पण संस्थेत ते म्हणतील ती पूर्वदिशा, मध्यंतरी खराडेबंधु म्हणून कोणी सुंदोपसुंद एम्. आर्. नाही बेसण घालायला निघाले होते. खरे म्हणजे ते एम्. आर्.चे विद्यार्थी; पण त्यांनी देसायांची एवढी मर्जी संपादली की, त्यांनी एकाला इस्टेटमॅनेजर आणि दुसऱ्याला जिमखानाप्रमुख नेमले. जिमखान्याचे आणि इस्टेटीचे हिशेबही स्वतंत्र ठेवायला सुरुवात झाली. या सगळ्या घालमेलीत मोठ्या रकमेचा अपहार झाला (सुमारे १८ लाख रुपये) असा शिक्षकाचा दावा आहे. ७२ साली शिक्षक विरुद्ध संस्था अशी भांडणे सुरू झाली. त्याचा फायदा घेऊन एम्. आर्. नी खराडेबंधूना घालवून दिले. आज त्यांपैकी एकजण जिल्हा कॉंग्रेसचा उपाध्यक्ष असून संस्थेविरुद्ध शिक्षकाना मदत करण्याची भाषा बोलत असतो.

पण शिक्षक विरुद्ध एम्. आर् हे भांडण झाले कशामुळे ?

अनेक वर्षे शिक्षकाना वेळेवर आणि पुरेसा पगार मिळत नसे कुणी तक्रार केली की, एम्. आर्. त्याच्या खांद्यावर हात टाकून कॉलेजच्या मैदानाला फेरी मारीत. संस्थेची आर्थिक स्थिती समजावून सांगत. त्या आपुलकीत नवथर शिक्षक गारच होई आणि कॉलेजात नवथर शिक्षकच बहुतेक असत. मग ते खालच्या आवाजात गुणगुणे 'नाही, पॅंटी शिवायच्या होत्या.' 'मग तसे बोला की ! जा त्या फलाण्या कापडदुकानात आणि शिवून घ्या पॅंटी ! मी करतोय् फोन.' अडचणी निवारण्यात एम् आर्. पटाईत; पण पुढे एवढ्याने भागेना. सुट्टीच्या तीन महिन्यांचा पगार कायमच संस्थेकडे ठेव म्हणून राहायला लागला. तेव्हा शिक्षकवर्ग युनिव्हर्सिटीकडे तक्रारी करायला लागला. एम्. आर्. युनिव्हर्सिटीलाही धूप घालीत नसत. ते म्हणत 'युनिव्हर्सिटी ही अप्पाची (पवार) शाळा आहे; गोखले कॉलेज ही माझी युनिव्हर्सिटी आहे.' पुढे प्राध्यापकवर्ग आणखी चिडला. त्यानी खाजगीत आणि जाहीर रीतीने संस्थेवर अनेक आरोप केले. आजही त्यातले अनेक आरोप ऐकू येतात.

सागा तरी काही कवडाळं !

खरे–खोटे माहीत नाही, पण अनेक प्राध्यापक मला म्हणाले की, अनैतिक गोष्टीही कॉलेजात चालत असत. यावरून इतर काही नसले तरी शिक्षक आणि एम् ·आर् यांचे शत्रुत्व किती विकोपाला गेलेय ते स्पष्ट दिसते.

## धाकदपटशा

गोष्टी या थराला गेल्यावर मारहाणीपर्यंत मजल जायचीच की !

तेही झालेच ! शिक्षकांनी काढलेले एक पत्रक मी पाहिलं. त्यात धमकीचे आणि मारहाणीचे पाच प्रकार नोंदविले आहेत सी. एम्. देशपांडयांना त्यांच्या घरी मारहाण झाली, १४ ऑगस्ट १९७४ ला कॉलेजच्या आवारात कणणूर यांना मारण्यात आले; प्रा. राऊत यांच्या भाच्याच्या दुकानासमोर हवेत गोळीबार करण्यात आला; अगदी अलीकडे म्हणजे जानेवारी ७७ ला चार शिक्षकांना तलवारी दाखवून खुनाची धमकी देण्यात आली याउलट कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या मुलाला कॉलेजच्या दारात सायकलच्या चेनने मारहाण झाली असेही ऐकले.

अरे अरे, हे कॉलेज म्हणजे एक रणक्षेत्रच झालेले दिसते

तर काय, इन्चण सगळ्या मुलनातीला तोंड देऊन शिक्षकवर्ग त्याच कॉलेजात राहिला, ही शर्थीची गोष्ट झाली. पगार नसताना, विद्यार्थी नसताना हे शिक्षक जाऊन सह्या करून येत आणि आपल्या नोकरीवरचा हक्क कायम राखीत. त्यांची एकजूटही नावाजण्यासारखीच भांडणं सुरू झाल्यापासूनच त्यांनी एक फंड काढला होता— निर्वाहासाठी ! काहींनी कोंबड्या पाळणे, दूध घालणे असे जोडधंदेही सुरू केले आहेत. एम्. आर्च्या वशातून कॉलेज बाहेर काढायचे असा त्यांचा निश्चय आहे.

पण एम्. आर् आणि हे शिक्षक यांच्या भांडणात आपला संबंध कुठे येतो ?

ते सांगतो ना. १९७५ साली एम्. आर्. नी ठरवले की कॉलेजचा सायन्सविभाग बंद करावयाचा. कारण तो तोटयात चालतो. पण युनिव्हर्सिटीने त्याला नकार दिला. कॉलेजचे आर्टस् व कॉमर्स विभाग आणि एकंदर कॉलेजही फायद्यात चालत होते. त्यापूर्वी विद्यापीठाच्या भोगीशायन कमिटीने कॉलेजचे व्यवस्थापक बदलावेत अशी शिफारस केली होती. त्यामुळे रँग्लर चौधरी आणि शिक्षणखात्याचे माजी दुय्यम चिटणीस पासलकर यांची नेमणूक संस्थेच्या आर्थिक सल्लागारपदावर करण्यात आली होती. प्राध्यापकांचे म्हणणे असे की, हे दोन्ही सज्जन एम्. आर्च्या शब्दाबाहेर नाहीत.

हे शिक्षक कोणाविषयीच चांगले बोलताना दिसत नाहीत !

७५ साली कॉलेजने सायन्सकडचे विद्यार्थी कमी व्हावेत म्हणून शर्थीचे प्रयत्न केले. त्या वर्षी फक्त ८५ विद्यार्थी सायन्सकडे होते, तेही प्राध्यापकांनी गोळा केलेले. ७६ साली सायन्सविभाग बंद करण्याची पुन: परवानगी मागण्यात आली या वेळी परवानगी देण्यात आली, पण प्राध्यापकांची सगळी देणी भागवली पाहिजेत अशी अट घालण्यात आली. संस्थेने ही अट पाळली नाही आणि शिक्षकांना काढून टाकले. तेव्हा शिक्षक कोर्टात गेले आणि ७६ जूनमध्ये पोलिससंरक्षणाखाली कॉलेजात हजर झाले ! पुढे २२ नोव्हेंबर ७६ ला संस्थाचालकांनी नोटिस देऊन १६ जून ७६ पासून शिक्षकांना कामावरून काढून टाकले आहे, असे कळवले! पाहिलेत आणीबाणीत रिट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्टचा कसा उपयोग होत होता ते !

## सद्यःस्थिति

मग आता काय अवस्था आहे ?

२२ नोव्हेंबर ७६ ची नोटिस मिळाल्यावर प्राध्यापकमंडळी परत युनिव्हर्सिटीकडे गेली. ४ डिसेंबर ७६ ला विद्यापीठाने सरकारला विनंती केली की, गोखले कॉलेजचा प्रश्न सोडवा. इकडे एप्रिल ७७ मध्ये २२ नोव्हेंबर ७६ ला नोटिसा दिलेल्या शिक्षकांना पुन: नोटिसा देण्यात आल्या ! खेरीज आर्टस्कडील ११ जणांना नोटिसा देण्यात आल्या. एकूण तीस लोक नोकरीला मुकले आहेत. तरी पोलिसांच्या साक्षीनें कॉलेजात शिरण्याचे नाटक १५–६–७७ ला करण्यात आले.

मग आता सरकारने काय करावे ?

कोल्हापूरच्या शिक्षकसंघटनेची मागणी आहे की, सरकारने कॉलेज ताब्यात घ्यावे. या वर्षीच्या एप्रिलमध्ये वसंतरावदादांनी सुचविले होते की, प्राध्यापकांनीच सायन्सकॉलेज चालवावे; पण देसाई त्याला तयार नाहीत. तेव्हा सरकारीकरण इतकाच उपाय उरतो.

सरकार ते का करत नाही ?

सरकार म्हणते की, कॉलेजशिक्षणाला आम्ही प्राधान्य देत नाही. रोगी कॉलेज ताब्यात घेण्याने नवा पायंडा पडेल. अशी अनेक कॉलेजेस् घ्यावी लागतील.

उजू आहे सरकारचे म्हणणे.

सरकारने जेव्हा साठ साली आर्थिकदृष्टया मागासलेल्या लोकांना फुकट शिक्षण देण्याचे मान्य केले, तेव्हाच या जबाबदाऱ्या सरकाराने तत्त्वतः उचलल्या. आपण काय करतो की, प्रश्न आला की त्याचा तुटका विचार करतो. शिक्षणाला महत्त्व आहे असे तोंडी म्हणतो. पैसाही नाही म्हटले तरी बराच खर्च करतो, पण त्यावर सखोल चर्चा आणि निर्णयक्षम चर्चा कधीही करीत नाही.

'का, आपली वर्तमानपत्रे 'हवा कॉलेजची' सारखी सदरे चालवतात की !

'नंदिनी, तू ग ?', 'हेमा, तुला काय म्हणायचय् ? ' अजली चौदाच वर्षांची आहे; पण चित्रकला, गायन, अभिनय आणि अभ्यास सगळ्यात आघाडीवर !' मधूनच तोंडी लावणं म्हणून 'विठोबा झोपडपट्टीत राहून अभ्यास करतो, म्हणून सगळ्यांना कौतुक वाटत.' अशा गुळगुळीत आणि तरुणाईच्या कौतुकानं गुळगुळीत झालेल्या वाक्यांनी भरलेल्या फडतूस सदरातून काय सखोल चर्चा होणार ? हवा कॉलेजची पाहायची असेल तर गोखले कॉलेजात गेले पाहिजे. □

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ जनतासरकार आणि मुस्लिम समाज

मुसलमानांनी घसघशीत मतदान केल्यामुळे जनतासरकार सत्तेवर आले. निदान सत्तेवर येण्यास या 'एक गठ्ठा' मताची बहुमोल मदत झाली हे नाकारता येणार नाही. आजवर वर्षानुवर्षे कॉंग्रेसला मते देणारा हा वर्ग प्रथमच कॉंग्रेसविरोधामध्ये उभा राहिला. अनेक मुसलमानांनी जनतापक्षाच्या प्रचारामध्ये हिरीरीने भाग घेतला. सामाजिक-राजकीय जीवनाशी संबंधित असलेल्या मुसलमानाची तर गोष्टच सोडा; पण आपण केवळ धर्मकारण करतो असा दावा करणाऱ्या शाही इमामनेसुद्धा राजकीय नेत्याच्या पद्धतीने प्रचार-मोहिमेमध्ये भाग घेतला. तात्पर्य-मुसलमानांनी फार मोठ्या प्रमाणावर कॉंग्रेसची साथ सोडली. आज जनतापक्ष सत्तेवर आला, नवीन राजवट सुरू झाली. नव्या शासनकर्त्यांबद्दल मुसलमानांना काय वाटते? विशेषत: त्याच्यामधील अधिक 'कडवट' समजल्या जाणाऱ्या मुसलमानांची याबाबत काय प्रतिक्रिया आहे याची झलक यूथ-टाइम्समध्ये जनाब सयिद अब्बास रझवी यांची जी मुलाखत प्रसिद्ध झाली आहे तीमध्ये पाहावयास मिळते.

जनाब रझवी हे एक प्रमुख मुसलमाननेते आहेत त्याचा जन्म हैद्राबादमध्ये झाला असला तरी सध्या वास्तव्य मुंबईमध्ये आहे. धार्मिक सभाच्या निमित्ताने ते देशभर संचार करीत असतात. भरपूर प्रवास आणि सर्व थरामधील मुसलमानांबरोबर येणारा सततचा संपर्क यामुळे त्याच्या मतांना कडवट मुसलमानांच्या प्रातिनिधिक मताचा दर्जा येतो

**प्रश्न** : देशामध्ये केंद्रस्थानी आणि अनेक प्रमुख राज्यांतून जनतासरकार अस्तित्वात आले आहे. जनतासरकारच्या हाती मुसलमानाचे भवितव्य सुरक्षित आहे असे आपल्याला वाटते काय?

**उत्तर** : आत्ताच याबाबत निश्चितपणे काही सांगणे अवघड आहे. जनतापक्षाच्या रचनेवर आमची नजर जागरूकतेने फिरते त्या वेळी आमच्या लक्षात येते की, जनसघाचे या पक्षावर वर्चस्व आहे आणि आम्ही तर जनसंघ म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा राजकीय आवाज असल्याचे मानतो. खेरीज जनतापक्षाने मुसलमानांना अद्यापी कोणतेही सुस्पष्ट आश्वासन दिलेले नाही हे पण विसरता येणार नाही

**प्रश्न** : आपली राजवट निधर्मी आणि समाजवादी असल्याची घोषणा जनतापक्षाने केली आहे. त्याबाबत आपले काय मत आहे?

**उत्तर** : घोषणा तर चांगली आहे; परंतु घोषणा व कृती यांमध्ये किती मेळ बसतो हे अजून ठरायचे आहे.

**प्रश्न** . राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाने मुसलमानांना संघाचे दरवाजे उघडले तर...?

**उत्तर** : संघाची आजवरची प्रतिमा फारशी चांगली नाही. विशेषत. त्याच्याबद्दल आमच्या मनामध्ये अजूनही भरपूर शंका आहेत. मुसलमानाच्या निष्ठांबद्दल त्यांना अजून शंका वाटतात संघ आणि मुसलमान यांचे पूर्वीचे संबंधही फारसे चांगले नाहीत आणि म्हणून त्याच्या आवाहनासबंधी आम्ही फारसे उत्साही नाही.

**प्रश्न** : नवीन जनतासरकारमध्ये ज्या व्यक्तींना घेण्यात आले आहे त्याच्याबद्दल आपण समाधानी आहात काय?

**उत्तर** : केवळ प्रतिनिधित्वाचा विचार केला तर केवळ एक मुसलमान मंत्री सध्या मंत्रिमंडळामध्ये आहे. आम्हाला हे प्रतिनिधित्व पुरेसे वाटत नाही. अजून संपूर्ण मंत्रिमंडळ आकाराला यायचे आहे. ते आल्यावरच याबाबत बोलणे इष्ट ठरेल.

**प्रश्न** : जनतापक्षामधील इतर घटकपक्षाबाबत आपल्याला काय वाटते?

**उत्तर** : जनतापक्षावर जनसंघाचे वर्चस्व असल्याचे मी म्हणालो असलो तरी जनतापक्ष म्हणजे जनसंघ नव्हे हे आम्हाला विसरता येणार नाही. जनतापक्षाच्या इतर घटकाबद्दल आम्हाला भरपूर अगत्य आहे आणि ही मंडळी आपले स्वतंत्र अस्तित्व टाकून देऊन जनतापक्षामध्ये विलीन झाली म्हणूनच मुसलमान मोठ्या संख्येने मदतीसाठी सरसावले हे विसरता येणार नाही. मुसलमानाबद्दल विशेष आपुलकी असलेले काही नेते सत्तास्थानी महत्त्वाच्या जागी आहेत याबाबत आम्हाला निश्चितच समाधान वाटते.

**प्रश्न** · जुन्या इंदिरा गांधी सरकारबद्दल आता तुम्हाला काय वाटते?

**उत्तर** . त्या सरकारवर आज कितीही टीका होत असली तरी एक गोष्ट निश्चित की, त्या सरकारच्या कारकीर्दीमध्ये आम्हाला-आम्ही अल्पसंख्य असूनही-भरपूर सुरक्षितता वाटत होती. मुसलमानासंबंधी इंदिराजीचा दृष्टिकोन सहानुभूतीचा होता. मुसलमानांना प्रतिनिधित्वही फारच चांगले मिळत असे. म्हणजे मी केवळ सरकारमधील प्रतिनिधित्वाबद्दल बोलतो आहे असे नव्हे, तर अन्य अनेक महत्त्वाच्या जागी इंदिराजींनी मुसलमानाच्या नेमणुका केल्या होत्या.

**प्रश्न** : असे जर होते तर आणीबाणीच्या काळामध्ये मुसलमानावर अत्याचार झाले असे कसे म्हटले जाते?

**उत्तर** : तुमचा रोख कुटुंबनियोजनाच्या संदर्भामध्ये असेल तर मी असे म्हणेन की, इंदिराजींना कल्पना न देता अधिकाऱ्यानी अत्याचारी वर्तन केले. थोडीफार जबाबदारी त्याच्यावर असेल तर ती त्याच्या मुलाने या अत्याचाराला जो हातभार लावला त्याबाबतच असेल. मुझाफरनगर किंवा तुर्कमनगेटमधील दुर्दैवी घटनाची जबाबदारी इंदिराजीवर टाकता येणार नाही. खेरीज अन्य प्रत्येक गोष्टीसाठी चौकशीमंडळ नेमणाऱ्या नवीन सरकारनेही या घटनाच्या

पृष्ठ २६ वर

# स्पेन

## लोकशाही युगाची आव्हाने

वा. दा. रानडे

स्पेनमध्ये ४१ वर्षांत पहिल्या खुल्या निवडणुका गेल्या १५ जूनला होऊन तेथे लोकशाहीच्या युगाची सुरुवात झाली आहे. स्पेन व पोर्तुगाल या दोन्ही शेजारील देशात दीर्घकाल हुकूमशाही राजवटी होत्या पोर्तुगालमध्ये पूर्वीच्या पद्धतीची हुकूमशाही आता नसली तरी तेथे लोकशाही पूर्णार्थाने प्रस्थापित झालेली नाही निवडणुका होऊन सोरेस या समाजवादी नेत्याच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ अधिकारावर आले असले तरी अजून लष्करी नेत्यांचे नियंत्रण पूर्णपणे गेलेले नाही. स्पेनमध्ये मात्र लष्कराचे कोणतेही दडपण न येता खुल्या निवडणुका होऊन प्रातिनिधिक सरकार प्रथमच अधिकारावर आले आहे.

स्पॅनिश जनतेने डावे व उजवे दोन्ही बाजूच्या अतिरेक्यांना बाजूला सारून नेमस्त, मध्यममार्गी पक्षाच्या बाजूने कौल दिला आहे पंतप्रधान स्वॉरेझ यांच्या सेंटर डेमॉक्रॅटिक युनियनला सर्वांत जास्त १६६ जागा मिळाल्या निर्णायक बहुमतासाठी ३५० पैकी १७६ जागा तरी हव्यात. त्या दृष्टीने दहा जागा कमी आहेत. सेंट्रल डेमॉक्रॅटिक युनियन म्हणजे निवडणुकासाठी तात्पुरती उभारलेली मध्यममार्गी गटांची आघाडी होती. त्याला पक्षाचे रूप देण्याचा प्रयत्न स्वॉरेझ करीत आहेत; पण एक पक्ष स्थापन होणे सध्या तरी कठीण दिसत असून ख्रिश्चन लिबरल व सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाची युती असे या सेंटर डेमॉक्रॅटिक युनियनचे स्वरूप राहील असे दिसते. सेंटर डेमॉक्रॅटिक युनियनच्या खालोखाल ११६ जागा सोशॅलिस्ट वर्कर पार्टी या समाजवाद्यांच्या पक्षाने मिळविल्या. पॉप्युलर सोशॅलिस्ट पार्टी या समाजवाद्यांच्या दुसऱ्या पक्षाला ६ जागा मिळाल्या. डाव्या गटामध्ये समाजवाद्यांनाच मतदारांचा अधिक पाठिंबा असल्याचे दिसून आले. कम्युनिस्ट पक्षाला फक्त १९ व अति डाव्या पक्षांना तर अवघ्या २जागा मिळाल्या.

मतदारांनी कम्युनिस्टांना दूर सारले तसेच उजव्या पक्षांनाही दूर सारले. पॉप्युलर अलायन्स या उजव्या पक्षाला फक्त १६जागा मिळाल्या. प्रादेशिक पक्षांपैकी केटालान डेमोक्रॅटिक पॅक्ट पक्षाला ११, केटालान सेंटर पार्टीस २ आणि बास्क नॅशनॅलिस्ट पार्टीस ८ जागा मिळाल्या. दोन अपक्ष निवडून आले. स्वत: पंतप्रधान स्वॉरेझ अपक्ष म्हणून उभे होते

हुकमी बहुमत न मिळाल्याने पंतप्रधान स्वॉरेझ यांना इतर पक्षाच्या पाठिंब्याशिवाय स्थिर सरकार बनविणे शक्य नव्हते; पण पॉप्युलर अलायन्स या उजव्या पक्षाला मंत्रिमंडळात घ्यावयाचे नाही अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली सोशॅलिस्ट वर्कर पार्टी या दुसऱ्या क्रमाकाच्या पक्षाबरोबर संयुक्त सरकार बनविण्याची स्वॉरेझ यांची तयारी होती; पण सोशॅलिस्ट वर्कर पार्टीचीच तयारी नव्हती. देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी अप्रिय उपाय योजावे लागतील. अशा वेळी आपला पक्ष सरकारमध्ये नको असा विचार त्या पक्षाचे नेते गोंझालेझ यांनी केलेला दिसतो; पण जबाबदारी टाळणारा हा एक प्रकारचा पलायनवाद आहे आपल्या धोरणाप्रमाणे निर्णय घेण्याची मोकळीक आपणास मिळते की नाही हाच संयुक्त मंत्रिमंडळात सहभागी होताना मुख्य विचार असायला हवा. अशी मोकळीक मिळत असेल तर समाजवाद्यांनी मंत्रिमंडळात सहभागी व्हायला हवे. अप्रिय उपाय योजावे लागणार म्हणून दूर राहणे योग्य नाही. सोशॅलिस्ट वर्कर पार्टीने मंत्रिमंडळात येण्याचे नाकारल्याने समाजवाद्यांचा दुसरा छोटा पक्ष पॉप्युलर सोशॅलिस्ट पार्टीला एक मंत्रिपद पंतप्रधान स्वॉरेझ यांनी दिले

केटालोनिया व बास्क भागातील पक्षांची स्वायत्ततेची मागणी आली. केटालोनिया पूर्वी स्वायत्त राज्य होते. जनरल फ्रँको यांनी १९३९ साली एक हुकूम काढून ही स्वायत्तता नष्ट केली. ती पुन्हा आपणास मिळावी अशी मागणी केटालोन समाजवादी नेते जॉन रेव्हेन्टोस यांनी राजे कार्लोस आणि पंतप्रधान स्वॉरेझ यांची भेट घेऊन केली आमची मागणी मान्य झाल्यास आम्ही सरकारला पाठिंबा देऊ असेही त्यांनी सांगितले. केटालोन व बास्कनेत्यांशी समझोता करून त्याचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न पंतप्रधान स्वॉरेझ करण्याची शक्यता आहे.

आर्थिक परिस्थिती कशी सुधारावयाची हे स्वॉरेझ यांच्या सरकारपुढे सर्वांत मोठे आव्हान आहे. गेली तीन वर्षे चलनवाढ, बेकारी आणि आयात-निर्यात व्यापारातील प्रतिकूल तफावत सतत वाढतच गेली. तेल पेचप्रसंगाला तोंड देण्यासाठी इतर देशांनी उपाय योजले, पण जणू काहीच घडले नाही अशा पद्धतीने स्पेनचा कारभार चालू होता. वर्षाला ३० टक्क्यांनी चलनवाढ दरवर्षी वाढतच आहे. व्यापारातील तूट भरून काढण्यासाठी राखीव गंगाजळीतून उचल आणि परदेशांची कर्जे या मार्गांचा अवलंब सरकारने केला राष्ट्रीय उत्पन्नात वाढ १९६० ते १९७० या दशकात वर्षाला सरासरी ७ टक्के होती ती १९७५ साली एक टक्क्यापेक्षाही कमी झाली आणि गेल्या वर्षी २ टक्के झाली. देशातील आठ टक्के कामगार बेकार आहेत. आयात-निर्यात व्यापारातील प्रतिकूल तफावत १९७६ मध्ये ४२० कोटी डॉलर होती. गंगाजळी ४५० कोटी डॉलरपर्यंत घटली. त्यापैकी २०० कोटी डॉलरची घट गेल्या तीन वर्षांत झालेली आहे एकूण परदेशी कर्जांचा बोजा येत्या जानेवारीपर्यंत १४०० कोटी डॉलरवर जाईल.

ही आर्थिक परिस्थिती सावरण्यासाठी कोणते उपाय योजावयाचे पेसेटा या स्पॅनिश चलनाचे पधरा टक्के अवमूलन करण्याची सूचना करण्यात येत आहे दुसरा उपाय म्हणजे पगारवाढीवर नियंत्रण घालणे गेल्या दोन वर्षांत कामगाराच्या पगारात २० टक्के वाढ झाली. चलनवाढीचे ते एक महत्त्वाचे कारण आहे, पण पगारवाढ रोखण्यास समाजवादी व कम्युनिस्ट आणि त्यांच्या नियंत्रणाखालील कामगारसघटनांची मान्यता मिळणार नाही. या दोन्ही पक्षांच्या निवडणूकजाहीरनाम्यात पगारवाढ रोखण्याची आवश्यकता मान्य केलेली नाही या अप्रिय उपाययोजनेत आपणास सहभागी व्हावे लागू नये म्हणून तर सोशॅलिस्ट वर्कर पार्टी मंत्रिमंडळात सहभागी झालेली नाही.

आयात-निर्यात व्यापारातील प्रतिकूल तफावत भरून काढण्यासाठी निर्यातवाढीवर लक्ष केंद्रित करण्याची सूचना केली जात आहे. पूर्व युरोप, दक्षिण अमेरिका, आशिया व अरब राष्ट्रांशी निर्यात वाढवून परिस्थिती सुधारता येईल करासबंधी सध्याच्या कायद्याची कडक अमलबजावणी केली तरी उत्पन्न दुपटीने वाढेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. स्पेनमधील ७६ टक्के करदाते कर चुकवितात असे नुकत्याच केलेल्या एका पाहणीत आढळून आले.

खंबीर उपाय योजून आर्थिक परिस्थिती सुधारण्यात नव्या मध्यममार्गी सरकारला यश आले नाही तर जनतेचा कौल डाव्या पक्षाकडे झुकण्याचा संभव आहे. □



# नक्षलवादाच्या शोधात

### लेखांक एक

## एकोणिसशे सत्तरपर्यंत काय घडले? कसे घडले?

शिरीष सहस्रबुद्धे । चंद्रशेखर पुरंदरे

त्या सोमवारी म्हणजे वीस जूनला सकाळी हैद्राबाद रेल्वेस्टेशनवर उतरलो आणि बाहेर पडलो. सायकलरिक्षांचा एक भला दांडगा कळप आणि त्या ओढणाऱ्या दुबळ्या, कळकट आणि फाटक्या कपड्यांतल्या रिक्षावाल्यांचा घोळका यांचे दर्शन स्टेशनसमोरच्या रॉयल आणि निओ रॉयलटाइप भव्य हॉटेल्सच्या पार्श्वभूमीवर घडले. तेव्हाच खरे म्हणजे आम्हाला अभिप्रेत असलेला नक्षलवादाचा शोध सुरू झाला होता. पुढचा आठवडाभर एक दिशा निश्चित करून पण निरनिराळ्या मार्गांनी केलेली सहेतुक भ्रमंती आणि त्यातून लिहिली जाणारी ही लेखमाला.

नक्षल'वादाचा' शोध घेणे हीच ती दिशा असे म्हणता येईल. या विषयावर आपल्याकडे लिखाण फार कमी झाले आहे आणि जे आहे तेही बरेचसे नक्षलवाद्यांबद्दल आहे, नक्षलवादाबद्दल नव्हे. त्यामुळे सत्यापेक्षा गैरसमजच खूप पसरले आहेत. शिवाय नक्षलवादाच्या बाबतीत आंधळे टीकाप्रहार किंवा प्रच्छन्न प्रचार असे दोनच वैचारिक पर्याय आपल्याकडे संभवतात. हे दोन टोकाचे रस्ते टाळून वस्तुनिष्ठ परीक्षणाचा मध्यममार्ग स्वीकारावा आणि त्यातून नक्षलवादी चळवळ आणि तिच्यामागचे तत्त्वज्ञान ऊर्फ नक्षलवाद यांचे वास्तव स्वरूप शक्य तितके आपल्याला आणि इतरांना समजावे हा आमच्या प्रवासाचा आणि लिखाणाचाही एक प्रमुख हेतू होता—आहे.

नक्षलवाद ही एक राजकीय तत्त्वप्रणाली आहे असे मान्य केल्यानंतर तिचे विविध पैलू, तिचा इतिहास, तिचे वर्तमान अस्तित्व व भवितव्य या सर्वांचा विचार करणे अपरिहार्य ठरते. तसा तो यापुढील लेखांकांतून केलेला दिसेल. या विषयाला एकापेक्षा अधिक बाजू आहेत आणि त्या सर्व निःपक्षपातीपणाने समजावून घेणे व मांडणे हे आमचे कर्तव्यच आहे. पहिल्या लेखांकात प्रामुख्याने नक्षलवादाची पार्श्वभूमी व त्याला जन्म देणारी परिस्थिती यांचा विचार करायचा आहे.

नक्षलवादी चळवळ, तिचा प्रत्यक्ष पहिला उद्रेक जरी नक्षलवारी या दार्जिलिंगजवळच्या खेड्यात झाला असला, तरी पाळेमुळे बरीच खोलवर गेलेली अशी ही चळवळ आहे.

स्वातंत्र्यपूर्व हैदराबादसंस्थानामध्ये जेव्हा हिन्दुस्थानभर झंझावाताप्रमाणे पसरू लागलेल्या राष्ट्रीय असंतोषाची धग पोचली, तेव्हा 'आंध्र महासभे'ची स्थापना १९४० च्या सुमारास झाली. ही आंध्रमहासभा म्हणजे त्या वेळी कॉंग्रेसचा आंध्रमध्ये फारसा प्रभाव नसल्याने बहुतांशी कॉंग्रेसजनांनी या नावाखाली स्थापन केलेली, कॉंग्रेसचीच ध्येयधोरणे राबवणारी संघटना होती. कम्युनिस्ट पक्षाने आपले पाय आंध्रमध्ये या सुमारास रोवलेले होते. स्थानिक प्रश्नांची तड लावण्यासाठी जनसंघटन करण्याच्या कुशल कार्यामुळे त्यांना स्वत:च्या ताकदीवर प्रादेशिक पातळीवरचा नाही, तरी मान्यताप्राप्त असा पक्ष म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती. अशा वेळी कम्युनिस्ट अगदी सुरुवातीपासून जे करीत होते, तेच त्यांनी इथेही केले. आंध्रमहासभेमध्ये शिरून आतून संघटना पोखरावी व जनमानसात असलेल्या सभेच्या प्रतिमेचा फायदा उठवून आपली उद्दिष्टे साध्य करून घ्यावीत अशा हेतूने त्यांनी महासभेत शिरकाव करून घेतला. हळूहळू महत्त्वाच्या जागा काबीज केल्यावर १९४४ च्या सुमारास आंध्रमहासभा संपूर्णतया कम्युनिस्टांच्या ताब्यात गेली. ज्यांच्या लक्षात हा कावा आला, त्यांनी दुसरी आंध्रसभा, आमचीच सभा खरी असा दावा करून, स्थापन केली.

रझाकारांचा उपद्रव या कालखंडातच सुरू होत होता. कम्युनिस्टांनी गावोगावी या रझाकारांशी व त्याच वेळी काही जमीनदारांशी लढा देऊन जनहिताची भूमिका रुजवली होती; परंतु १९४६–४८ या महत्त्वपूर्ण वर्षांमध्ये, जेव्हा निजाम पाकिस्तानमध्ये विलीन होण्याची किंवा स्वतंत्र राष्ट्र स्थापण्याची स्वप्ने पहात होता आणि जनता भारतीय संघराज्यात सामील होण्याची आशा बाळगून होती तेव्हा कम्युनिस्टांनी जनहितकार्याचा बुरखा अवेळी फेकून देण्याची घोडचूक केली.

कायद्याचे राज्य हैदराबाद संस्थानात त्या वेळी अस्तित्वात नव्हतेच. रझाकार, जमीनदार, सामान्य जनता असा धुमाकूळ चालू होता. अशा अस्थिर परिस्थितीत कम्युनिस्टांनी निजामाला पाठिंबा जाहीर केला या वेळी त्यांचा हिशेब असा होता की, याच सत्तांतराच्या काळात, निजाम म्हणतो त्याप्रमाणे जर स्वतंत्र राज्य म्हणून हैदराबादची स्थापना झाली, तर भारत सरकारला हस्तक्षेप करणे कठीण होईल. कारण त्या वेळी प्रश्न आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा बनलेला असेल रशिया आणि चीन या नवजात राज्याला– जे आपण कम्युनिस्ट मुक्त करणार– अविलंब मान्यता देतील आणि एकदा प्रश्न देशाचा अन्तर्गत प्रश्न म्हणून न राहता आन्तरराष्ट्रीय पातळीवर पोचला की, आपले उद्दिष्ट सफल होईल; पण आजतागायत त्याच ठोकरा खाऊन शहाणपण न शिकण्याची किमया भारतीय कम्युनिस्टांनी त्या काळापासूनच शिकून घेतलेली आहे. या सगळ्या अधांतरी स्वप्नांना 'लोक आमच्या मागे आहेत' या गोंडस कल्पनेचा टेकू कम्युनिस्टांनी दिलेला होता. आपली विशिष्ट स्थानिक व प्रासंगिक स्वरूपाची समस्या सोडविण्यासाठी जेव्हा कम्युनिस्ट धावून आले तेव्हा लोकांनी त्यांना निश्चितच पाठिंबा दिलेला होता; पण जेव्हा याचा वारू भलत्याच दिशेला उधळू लागला तेव्हा त्याला लोकांनीच आवर घातला जेव्हा कम्युनिस्टांच्या स्वप्नातल्या 'स्वतंत्र सार्वभौम' हैदराबादमध्ये भारतीय सैन्याने प्रवेश केला, तेव्हा जनतेने याच्या उपदेशानुसार लढा न देता सैन्याचे स्वागत केले वल्लभभाई पटेलही कम्युनिस्टांना अपेक्षेपेक्षा बरेच जड गेले आणि फारच थोड्या कालावधीत पितळ उघडे पडल्याने त्यांना भूमिगत होण्याची वेळ आली

याच्यातीलच काही जणांनी रझाकार व भारतीय सैन्य यांच्याशी झालेल्या चकमकीत हाती आलेली शस्त्रे पुढे तेलगण चळवळीच्या वेळेला वापरली. तेलंगण चळवळीचा इतिहास बहुचर्चित आहेच. ही चळवळ १९५१ मध्ये संपुष्टात आली.

पुढे कम्युनिस्ट पार्टी १९६२ च्या चीनच्या आक्रमणाच्या प्रश्नावर दुभंगली. या वेळी डाव्या मार्क्सिस्ट पक्षाकडेच–CPI ( M ) कडेच आन्ध्रमधले बहुसंख्य कम्युनिस्ट वळले. खरा प्रश्न १९६७ मध्ये निर्माण झाला. १९६७–६८ ला जेव्हा नक्षलवादीमध्ये जमीनदाराविरुद्ध लढा सुरू झाला, तेव्हा कम्युनिस्ट ( United Front ) बंगालमध्ये सत्तेवर होते. ज्योति बसू (आजचे मुख्य मंत्री) त्या वेळी गृहमंत्री होते. CPM चे म्हणणे आजवर असे होते की अजून सशस्त्र उठावाची वेळ आलेली नाही. लोकशाही मार्गाने व संसदीय मार्गानें प्रश्न सुटू शकतील जेव्हा ही वेळ येईल तेव्हा CPM मागेपुढे न पहाता लढ्यात सामील होईल; परंतु आजच्या नक्षलवाद्यांच्या मते तशी वेळ नक्षलबारीत आली असतानाही केवळ आपली सत्ता अबाधित रहावी म्हणून केन्द्राकडून आलेल्या आदेशाची अंमलबजावणी ज्योति बसूंनी केली आणि चळवळ दडपून टाकली. या भोंदूपणाचा सताप येऊन चारु मुझुमदारने सर्व डाव्या विचारसरणी लोकांना पक्षातून तावडतोब बाहेर पडून क्रांतिकारी–सशस्त्र–मार्ग अवलंबिण्याची विनंती केली.

या वेळी आंध्रच्या सुप्रसिद्ध श्रीकाकुलम् जिल्ह्यात असंतोषाचा उद्रेक होईल इतपत स्फोटक परिस्थिती निर्माण झाली होती. याला अर्थातच जमीनदारांचे असह्य जुलूम हेच कारण होते. १९६६ साली कम्युनिस्ट पार्टीचा कार्यकर्ता सांबय्या रेड्डी याचा वेंकटपुरम्‌मध्ये जमीनदाराकडून खून करण्यात आला १९६७ मध्ये निवडणुकांच्या काळात अप्पा रामस्वामी व कृष्णप्पा या जमीनदारांनी दहशतीचे वातावरण निर्माण केले. आतून परिस्थिती अशी खदखदत होती.

या वेळी अखिल भारतीय पातळीवर CPM ने केलेल्या धोरण विषयक ठरावाचा मसुदा आंध्र प्रदेश कमिटीपुढे आला. आंध्र प्रदेश कमिटीने हा संपूर्ण मसुदा बदलून सशस्त्र लढ्याचा त्यात समावेश करण्याची शिफारस केली व मध्यवर्ती समितीचा ठराव प्रचंड बहुमताने फेटाळून लावला. १९६८ साली आन्ध्र प्रदेश क्रांतिकारी कम्युनिस्ट पार्टीची [ APCCR ] स्थापना झाली श्रीकाकुलम्‌मध्ये जो भडका उडाला त्यानंतर मात्र यात झपाट्याने फूट पडली. श्रीकाकुलम् जिल्ह्यात जो सशस्त्र मार्ग हाताळला गेला त्यावरून पुढे बरेच रण माजले.

प्रत्यक्ष श्रीकाकुलम्‌मध्ये काय झाले ?

गरुडभद्र या खेड्यातील दोन आदिवासी-गिरिजन एका सभेला-पक्षाच्या-उपस्थित रहायला जात असताना सत्यनारायण या जमीनदाराच्या गुंडांकरवी मारले गेले. कोरन्ना आणि मंगन्ना ही त्यांची नावे. या प्रसंगाचे महत्त्व असे की नक्षलवाद्यावर जो हिंसाचारी–हा अनेक आरोपांपैकी एक आरोप आहे–तो या प्रसंगापुरता तरी

खोटा आहे. या वेळी तरी नक्षलवाद्यांनी केवळ स्वसंरक्षणासाठी शस्त्र हातात घेतले नंतर मात्र दोन जमीनदार ठार मारले गेले. हे पाहून बाकी खेड्यातले जमीनदार शहरात पळाले कारण भुकेल्या जनतेला तोंड देण्याचे सामर्थ्य त्याच्यात नव्हते.

प्रथमतः नक्षलवाद्यांचा रोख जमीनदारावरही नव्हता. १९५३ साली आंध्र सरकारने कायदा मंजूर केलेला होता की, सरकारी मालकीच्या ज्या जमिनी जमीनदार कसत आहेत त्या भूमिहीनाना, प्रत्यक्ष कसणाऱ्यांना देण्यात याव्यात. ह्या कायद्याची अमलबजावणी दूरच, कायदा आहे हेही जमीनदार विसरलेले होते. या जमिनीवर की जी कायद्यानेच त्या भूमिहीनांच्या मालकीची होती आणि सरकारी दिरंगाईने म्हणा अगर जमीनदाराच्या मग्रुरीने म्हणा, त्यांच्यापर्यंत पोचलेली नव्हती, तिच्यावर त्यानी हक्क प्रस्थापित केले. नालगुंडा, कर्नूल या भागात चळवळ झपाट्याने पसरली. वर्षानुवर्षाच्या अत्याचाराची पहिलीच प्रतिक्रिया असल्याने तिचा सामना करणे कोणत्याच दमनशक्तीला शक्य नव्हते १६ वर्षे अस्तित्वात असणाऱ्या पण अमलात न आलेल्या कायद्याच्या अमलबजावणीसाठी जेव्हा शिल्लक राहिलेला हा उग्र आणि अन्तिम मार्ग भूमिहीनानी स्वीकारला तेव्हा अप्रतिकारक्षम जमीनदार, गावे रिकामी करून पळून गेले अनन्तपूर या तालुक्याचा पंजाबी कलेक्टर अरोरा याला नक्षलवाद्यानी गाठले त्याला सगळी परिस्थिती समजावून सांगितली. तो कायदेशीर बाजू समजावून घेतल्यावर चळवळीला पूर्ण अनुकूल बनला. त्याने सात दिवसाची मुदत मागून घेतली आणि त्या अवधीत जमीनवाटप सरकारकडूनच होईल अशी हमी दिली; पण त्याला जमीनदारांच्या जमीनदारानी जमीनदारांच्यासाठी चालविलेल्या राज्याचा अनुभव यायचा होता. पुढच्या १५ दिवसांत कलेक्टर काहीही करू शकला नाही. कारण ही जमीनवाटपयोजना म्हणजे जमीनदारांच्या अस्तित्वावरच पहिला हल्ला होता. मग नक्षलवाद्यानी कायदा आपल्या हातात घेतला ' मुक्त ' केलेल्या जमिनीचा नकाशा काढून जेवढे भूमिहीन असतील तेवढे त्याचे तुकडे पाडण्यात येऊन केवळ २२ दिवसात २७६० एकर जमीन बळकावून वाटण्यात आली. या वेळी गावातील वृद्ध मंडळीचा सल्ला घेण्यात आला कारण जमीनदाराची जमीन कोणती आणि सरकारी जमीन जी जमीनदारानी बळकावली होती ती कोणती हे त्यानां निश्चित रूपाने माहीत होते. याही ठिकाणी इतक्या व्यवस्थित रीतीने जमीनवाटप करताना नक्षलवाद्यांच्या पुढे नमुनेदार अडचणी उभ्या राहिल्या. कसदार जमिनीच्या पट्ट्यासाठी भूमिहीनाच्यात मारामाऱ्या सुरू झाल्या. शेवटी कसदार जमीन दोन एकर द्यायची असेल, तर कमी प्रतीची चार एकर द्यावी अशा प्रकारे वाटप चिठ्ठ्या टाकून करण्यात आले. २२ दिवसांनंतर चळवळीचे उद्देश, दिशा व मार्ग याचा अभिप्रेत धोका पूर्ण लक्षात आल्यावर सरकार पूर्ण सामर्थ्यानिशी यावर चालून आले. तोपर्यंत कर्नूलमध्ये, जिथे जमीनदाराच्या आधिपत्याखाली सरकारची जमीन फारशी नव्हती, तिथे या मजुरानी जंगलप्रदेशातील जमीन बळकावण्यास सुरुवात केली. येथेही हे लक्षात घेतले पाहिजे की त्यांनी कायद्याने जी जमीन जमीनदारांची होती तिला हात लावला नाही. जर एखाद्या जमीनदाराची स्वतःची ८० एकर जमीन अशी असेल व तो २५ एकर बळकावलेली जमीन अनधिकृतरीत्या कसत असेल, तर फक्त ती २५ एकरच त्यानी बळकावली अनन्तपूरमध्ये ४० कुटुंबाना अशी जमीन मिळाली आणि त्याच दिवशी त्यानी नांगरणीही केली इतकी त्या लोकाना जमिनीची जरुरी होती. याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे, या २२ दिवसांच्या चळवळीनंतर जेव्हा पूर्ववत स्थिती सरकारने स्थापन केली तेव्हाही कोणताही जमीनदार पोलिसाच्या संरक्षणाखाली देखील या जमिनीवर हक्क सागावयाला धजावला नाही आजपावेतो या जमिनी तेच गरीब गाववरी कसत आहेत.

**परंतु या देखण्या चळवळीचा परिणाम मात्र दुर्दैवी झाला. अदूरदर्शी, असमंजस व निष्कर्षाप्रत पोचण्याची महागात पडणारी घाई झालेल्या नेत्यांनी आपल्या कुवतीनुसार या चळवळीचे अर्थ लावून भावी चळवळीचे नुकसान केले**

या चळवळीचे प्रमुख दोन अन्वयार्थ काढण्यात आले. पहिला असा की, त्या विशिष्ट परिस्थितीत वैयक्तिक जमीनदाराची हत्या करणे चळवळीला आवश्यक होते या उदाहरणाचे ततोतंत अनुकरण करणे हा मूर्खपणा ठरेल जेथे जेथे जशी जशी परिस्थिती उद्‌भवेल, तेथे तेथे, त्यात्याप्रमाणे लोक जमीनदाराचे किंवा शोषकवर्गाचे काय करायचे ते ठरवितील. या चळवळीवरून जमीनदाराची हत्या हा निष्कर्ष कोणी काढू नये.

दुसरा निष्कर्ष चारु मुझुमदारने काढला की, हा वैयक्तिक हत्येचा मार्गच योग्य होय. याचेच तंतोतंत अनुकरण भारतातल्या प्रत्येक खेड्यात केल्यास १९७२ साली किंवा उशिरात उशिरा १९७५ सालापर्यंत संपूर्ण भारत ' मुक्त ' होईल. चीनमध्ये ज्याप्रमाणे येनान येथे पहिली ठिणगी पडली, त्याप्रमाणे मुझुमदारने श्रीकाकुलम्‌चा गौरव करून तो पंथ अवलंबिण्याचा निर्णय जाहीर केला.

याआधी चारू मुझुमदारने CPM मधून बाहेर पडल्यावर कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट [ CPI(ML) ] ची स्थापना २६ एप्रिल १९६९ ला, लेनिनच्या वाढदिवशी केली होती. परंतु यात लगेच फूट श्रीकाकुलम्‌च्या प्रश्नावरून पडली. तरीही आज जो गट आंध्रप्रदेशात सर्वांत प्रभावी आहे (किंबहुना तोच गट नक्षलवादी म्हटला जाऊ शकेल) तो CPI(ML) याच नावे; पण श्रीकाकुलम्‌च्या घटनेचा चारु मुझुमदारने काढला तो अर्थ न काढता कार्यशील आहे. १९७२ ला भारतातील क्रांती पूर्ण करण्याच्या मोहक स्वप्नाने भारून जाऊन परत एकदा या कम्युनिस्टानी नव्या नावाने जुन्या चुका केल्या लोकाची तयारी सगळ्या भागात हत्या करण्याएवढी झालेली नव्हती. संघटना करणे हाही प्रतिक्रांतिवादी, प्रतिक्रियावादी व क्रांतिद्रोही मार्ग असल्याचा लोकविलक्षण निष्कर्ष काढून चारु मुझुमदारने कामगारसंघटन, लोक-

**केवळ २२ दिवसात २७६० एकर जमीन बळकावून वाटण्यात आली मात्र....**

शिक्षण आणि आर्थिक प्रश्न यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे चळवळीला परत जनसामान्याचा पाठिंबा मिळाला नाही. दुसरी गोष्ट म्हणजे जमीनदाराच्याच बाजूने असणारे सरकार श्रीकाकुलम्ला पहिल्या धक्क्यातून सावरण्याच्या आत बराचसा भूप्रदेश 'मुक्त' झाला होता. हीच फूटपट्टी आता इतर ठिकाणी लावण्यात अर्थ नव्हता. कारण सरकार सावध झाले होते. तरीही १९७१ सालापर्यंत हाच मार्ग नक्षलवाद्यानी हाताळला. शेवटी चारु मुझुमदाराच्या डोळ्यादेखतच स्वप्नाचे रंग विरू लागले आणि आजच्या नक्षलवाद्याना तो मार्ग चुकीचा असल्याची खात्री पटली आहे.

मागे उल्लेख केलेल्या APCCR मध्ये या प्रश्नावरून फूट पडली व नागीरेड्डी, चद्रपुल्ला रेड्डी यानी श्रीकाकुलम्चे अनुकरण ततोतत करता येणार नाही असा निष्कर्ष काढला व APRCP [आंध्र प्रदेश रेव्होल्यूशनरी कम्युनिस्ट पार्टी]ची स्थापना केली. तिकडे बगामध्येही याच प्रश्नावर मतभेद होऊन असीम चटर्जी व सत्यनारायण सिंग यानी चारु मुझुमदारपासून अलग होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे हे दोन ग्रुप्स जवळ आले; परंतु आजपर्यंत फुटीरतेचा शाप लाभलेली भारतीय चळवळीची कटू कहाणी याच्याही नशिबी आली. टाटा-बिर्ला याना नॅशनल बूर्ज्वा म्हणायचे की बिग बूर्ज्वा म्हणायचे यासारख्या किरकोळ प्रश्नावरून फूट पडली. नागीरेड्डी व काही साथीदार जेव्हा भूमिगत होते, तेव्हा त्यानी मद्रासमध्ये एक बैठक बोलाविली होती. अनेकानी बैठक जंगलात कुठेही घ्या, मद्राससारख्या शहरात घेऊ नका असा सल्ला देऊनही त्यानी तो मानला नाही आणि घरभेदेपणामुळे सगळे अलगद पोलिसाच्या हातात सापडले. चद्रपुल्ला रेड्डीलाच जरा उशीर झाल्याने, तो मद्रासला जाणाऱ्या रेल्वेत होता. रेल्वेत त्याने सध्याकाळच्या बातम्यात नागी रेड्डी, कनु सन्याल पकडले गेल्याची बातमी ऐकली आणि तो निसटला. त्याने चळवळ पुढे चालू ठेवली. प्रथम नागी रेड्डीने तुरुगातून या चळवळीला पाठिंबा दिला, परतु काही काळाने चळवळीच्या अस्सलपणाबद्दल सशय व्यक्त करून ती नक्षलवादी नव्हेच असे जाहीर केले. त्याने प्रदेश कमिटी विसर्जित करावी अशी मागणी तुरुगातून केली. ती फेटाळली गेली आणि डावे, अतिडावे, क्रांतिकारक, जहाल, अतिजहाल असे गट पडले. दुर्दैवाने साध्या साध्या बाबींवर मतभेद झालेले हे लोक एकमेकाना शत्रू मानू लागले. कांग्रेसपेक्षा चद्रपुल्ला रेड्डी–सत्यनारायण सिंगचा गट नागी रेड्डी गटाला क्रमाक एकचा शत्रू मानतो. चारु मुझुमदारच्या मृत्यूनतर (तो खून होता असा नक्षलवाद्याचा दावा) लिनपिआओवादी व लिनपिआओविरोधी असे दोन गट त्याच्या हाताखालच्याच्यात पडले. लिनपिआओचे तत्त्वज्ञान ही एकदा क्रांतीची दिशा ढोबळपणे ठरली की, वादाचा मुद्दा होऊ शकेल, पण फुटीचा मुद्दा होऊ शकणार नाही किंवा होऊ नये. यानतर १९७२-७३ मध्ये वासुदेवराव या नक्षलवाद्याने १९७१ पर्यंत सरकारने मृतप्राय करून टाकलेली श्रीकाकुलम्मधली चळवळ जे काय भग्नावशेष राहिले होते, त्याच्या आधारे पुनरुज्जीवित करण्याचा [जुन्याच तत्त्वाआधारे] अयशस्वी प्रयत्न केला. लिनपिआओ गट म्हणजे तत्त्वज्ञान नसलेला गट किंवा झुंडशाहीने जाणारा गट असे चद्रपुल्ला रेड्डी–सत्यनारायण सिंग गट [CP-SNS ग्रुप] म्हणतो. मध्यंतरी या लिनपिआओवादी म्हणवणाऱ्या गटाने–१० जणानी मिळून एक जीप पळवून एका पोलिसचौकीवर अचानक हल्ला केला. पोलिसाना ठार मारून शस्त्रास्त्रे पळविली. ही घटना आज पोलीस आणि नक्षलवादी दोघेही मूर्खपणाची म्हणून सांगतात कारण या चळवळीबद्दल सर्वसामान्यांची सहानुभूती गमावणे, ताकदीचे पाशवी प्रदर्शन करणे व चळवळ मागे नेऊन ठेवणे एवढेच अशा आततायीपणातून साध्य झालेले आहे.

आज आंध्रमध्ये नक्षलवाद्यांच्या एकूण बाराचौदा गटांपैकी (मध्यतरी प्रत्येक माणूसच स्वत चा ग्रुप जाहीर करीत असे) तीन गट शिल्लक आहेत त्यातही दोन गट केवळ नामशेष आहेत आणि Cpsns गट कार्यरत आहे दुसरा गट Coc (सेन्ट्रल ऑर्गनायझेशन कमिटी) हा आहे हा गट अजून चारु मुझुमदारला नेता मानून त्याच्या अतिरेकीपणा (हा शब्द इतर नक्षलवाद्याचा) वर विश्वास ठेवतो कोडापल्ली सीतारामय्या हा आध्रमधला या गटाचा नेता आहे सुनीती घोष हा पश्चिम बगालमधला तिसरा ग्रुप नागि रेड्डी ग्रुप ह्याचा देवुलापल्ली वेन्कटेश्वर राव हा नेता आहे परतु स्वतः नागि रेड्डीचा भाऊही. रामदास रेड्डी याच्या म्हणण्यानुसार एक राजकीय तत्त्वप्रणाली म्हणून नक्षलवाद आता मेला आहे

सत्यनारायण सिंग–चन्द्रपुल्ला रेड्डी या सर्वांत जास्त प्रभावी असणाऱ्या गटाच्या मते शाब्दिक मारामाऱ्या करण्यात काही अर्थ नाही. जेव्हा हे गट तयार झाले, तेव्हापासूनच जर प्रत्यक गट आपल्या तत्त्वज्ञानानुसार प्रत्यक्ष कामाला लागला असता, तर लोकानीच कोणता आपल्याला जवळचा हे ठरविले असते. चन्द्रपुल्ला रेड्डी सत्यनारायण सिंग (Cpsns) ग्रुपच्या मते आम्हीच फक्त अशा कामाला ७२-७३ पासून लागलो आणि म्हणून आजपर्यंत टिकलो. बाकीच्यांचा 'शब्द बापुडे', 'केवळ वारा' विरून गेला.

ही सर्व वर्षे मार्क्सच्या प्रतिपादनाप्रमाणे ससद ही शोषकवर्गाचे प्रतीक असल्याचे मानून या लोकानी निवडणुकावर बहिष्कार टाकण्याचा मार्ग अनुसरून आता त्यांना (जनतापक्षाच्या सत्ताग्रहणानंतर) ती चूक आहे असे वाटते. ही गोष्ट ते स्वत.च कबूल करतात.

मात्र ७१ पर्यंतच्या त्याच्या हिंसात्मक चळवळीमुळे त्यांना तोटा बराच सहन करावा लागला सतोष चक्रवर्ती हा कांग्रेसचा ६७ पासून आजतागायत आमदार आहे हा एक बडा जमीनदारही आहे. याचा पोलिसी दहशतीचा वरवटा फिरवण्यात मोठा सहभाग आहे. मन्सूर नावाचा गणपुर गावातील यांचा कार्यकर्ता ६८ साली त्याने ठार मारल्याचा यांचा दावा आहे. गोविन्दराव पेठ या गावात १९६९ च्या ऑक्टोबरमध्ये बहुतेक सगळ्या लोकाना नक्षलवाद्यांचे आश्रयदाते म्हणून बेदम पिटण्यात आले. तीच गोष्ट दुम्पलपुरम् या गावातल्या लोकांची. मोरपुल्लय्या हे गावच्या गाव पोलिसी अत्याचाराला विटून उठून गेले. सगळ्या गावाने स्थलातर केले. दुम्पल्लपुर हे संपूर्ण गावच नक्षलवादी असल्याचा याचा दावा आहे.

**...जी जमीन कायद्याने जमीनदारांची होती तिला त्यांनी हात लावला नाही.**

१९६९ मध्ये तिथे मजूरसंघटना उभी राहिली. तेव्हापासून पोलिसाची गावकऱ्यांवर आणि गावकऱ्यांची पोलिसांवर कृपादृष्टी आहे. इथली लच्चम्मादेवी रेड्डी ही बाई गर्भवती असताना तिला बेदम मारहाण करून जळत्या सिगरेटचे चटके देण्यात आले.

अशा रीतीने ठिकठिकाणी अत्याचाराची कोठारे उघडण्यात येऊन सरकारतर्फे त्यांचे मुक्तहस्ते वाटप झाले. संधी मिळताच गावकऱ्यांनीही दान सव्याज परत करण्यास अनमान केले नाही हिंसेने हिंसा कशी वाढत जाते (ते बरोबर की चूक हा प्रश्न निराळा) त्याचे १९७१ सालपर्यंत चालत आलेली ही चळवळ हे उत्तम उदाहरण आहे.

ही सर्व पार्श्वभूमी ठळक आहे. याचा दोन प्रकारे विचार करता येईल. एक म्हणजे गेली दहा वर्षे फक्त निराश, हताश, पिसाट लोकांनी हिंसेच्या आश्रयाने धुमाकूळ घातला आणि त्याला गरिबाची मुक्तिदात्री नक्षलवादी चळवळ असे नाव दिले. दुसरा विचार म्हणजे खरोखरच ही चळवळ लोकाची आहे.

नक्षलवाद्यांचा क्रमांक एकचा (सर्व नक्षलवाद्यांचे याच एका मुद्द्यावर एकमत आहे.) शत्रू विजय रामराव हा आंध्राचा एक D. I. G आहे. अत्यंत बुद्धिमान माणूस. याची सविस्तर मुलाखत पुढे येईलच. त्याच्या मते तेलंगणाचा जो सशस्त्र उठाव झाला, त्या वेळी १९५१ ला उठाव फसल्याने जे असंतुष्ट राहिले, त्यानी १९६७ ला पश्चिम बंगालमध्ये संयुक्त आघाडीचे (त्यात CPM चा मोठा भाग) सरकार आल्यावर, जिथे १९५१ ला थांबलो, तिथून १९६७ मध्ये पुन्हा सुरुवात करू या, या विचाराने प्रवृत्त झालेल्यांनी नक्षलबारीच्या उठावापासून स्फूर्ती घेऊन तेलंगणाच्या लढ्यात शिल्लक ठेवलेली शस्त्रे धूळ झटकून परत हाती घेतली अर्थात् तेलंगणाच्या लढ्यापासूनचे बुजुर्ग या लढ्यात होते आणि त्यांच्या अनुभवाचा फायदा लढ्याला झाला हे नक्षलवाद्यानाही नामंजूर नाहीच. 'तेलंगण सशस्त्र लढा सप्ताह' मध्यंतरी दरवर्षी जुन्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी पाळण्यात येत होता.

पण याच दरम्यान परिस्थिती खरोखरच इतकी बाईट आणि टोकाची झालेली होती, की काही ना काही स्वरूपात असंतोष पृष्ठभागावर येणे अपरिहार्यच होते. याला दिशा प्रथमपासून नीट सापडली नाही. चुकातून सामान्य माणूससुद्धा बरेच शिकतो. तेवढीही संवेदनक्षमता आणि बुद्धिमत्ता नेत्यानी दाखविली नाही. हे बेटे कोठून आले? ते कोठून आले या प्रश्नाचे उत्तर शोधले तर आंध्रमधल्या परिस्थितीच्या विदारकतेवर आणि स्फोटकतेवर बराच प्रकाश पडू शकेल.

बहुतेक मेडिकल आणि इंजिनिअरिंग कॉलेजची मुले [ विशेषतः हैदराबादचे गांधी मेडिकल कॉलेज आणि वरंगळचे रिजनल इंजिनिअरिंग कॉलेज ] या तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झाली. सुरक्षित भविष्याची खात्री देणाऱ्या शाखेची मुले जेव्हा आपले भविष्य अंधारातच (जवळपास) झोकून देतात, तेव्हा निश्चितच प्रश्न शाब्दिक आणि तात्त्विक मारामाऱ्यांच्या रिंगणाबाहेर जातो. महाराष्ट्रात कल्पना करता येणार नाही अशी जमीनदाराची या भागात अस्खलित पिळवणूक होती. साधीच उदाहरणे द्यायची झाली तर विडीच्या पानाची [ तेंदू ] बंडले करण्याच्या उद्योगाचे पहिले उदाहरण घेऊ. या १०० बंडलामागे फक्त दोन पैसे त्या इसमाला मिळत असत. दोन पैसे कुठवर पुरणार? दुसरे म्हणजे भूमिहीन मजुराना सहा महिने राबवून घेऊन मग शेतीची कामे नसलेल्या सहा महिन्याकरिता वाऱ्यावर सोडणे. ही फारच ढोबळ उदाहरणे. यासाठी सरकार, विनोबा फारच अपुरे ठरलेले आहेत.

तेव्हा लोक पोटाला चिमटा किती काळ सहन करतील? आणि जेव्हा सनदशीर मार्ग अंधारच दाखवितात, तेव्हा हिंसक मार्गाकडे ते वळलेले दिसतात. चळवळीची खरी पार्श्वभूमी भुकेत आहे. दहा वर्षे चळवळ इतक्या धोड्युकानिशी टिकली याचे कारण पोटाची खळगी तुम्हाला स्वस्थ बसू देत नाही. नक्षलवादी तत्त्वज्ञान, मार्ग त्याना पटले असतीलच असे नाही [ किंबहुना दहा वर्षे चळवळ फक्त टिकली, वाढली नाही. टिकली तीही प्रथम होती त्या प्रमाणात जिवंत राहिली नाही; पण डोकेदुखी व्हावी इतपत शिल्लक राहिली. यावरून तत्त्वज्ञान लोकांना जवळचे वाटावे एवढे प्रभावी नसावे असाच तटस्थ निरीक्षकाला संशय यावा ] पण कोणी तरी आपल्यासाठी लढतो आहे, येन केन प्रकारेण शोषणकर्त्या वर्गाकडे गाऱ्हाणे पोचते आहे यावर जनतेने समाधान मानले आहे आणि सुरुवातीला केलेल्या गगनचुंबी अपेक्षांइतकी नाही, तरी थोडीफार जनता आपल्या पाठीशी आहे, परिस्थितीशी समरस होऊन, तिचा फायदा उठवून [ संपूर्ण चळवळ आता फक्त जंगलातच मर्यादित. कारण जंगलाचे संरक्षण, अन्न हे नैसर्गिक फायदे ] एका विशिष्ट ध्येयाकडे वाटचाल करू इच्छिणारा तरुणवर्ग, याच्यामुळे चळवळ टिकली आहे.

ही चळवळ आज नक्की काय करीत आहे? साधारणतः १९७१ नंतरचे तिचे स्वरूप काय आहे याचा विचार पुढे करू. इथे फक्त एकच गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे. ती म्हणजे आंध्रच्या एकूण लोकसंख्येच्या ५२% जनता आदिवासी–हरिजन–गिरिजन आहे. म्हणजे मागासलेल्या जमातीत मोडणारी आहे. जी जमात अल्पसंख्य म्हणून इतरत्र आहे ती इथे [ Backward Class & Scheduled Caste ] बहुसंख्य आहे. ती गरिबी रेषेखाली आहे. वर्षानुवर्षे झगडते आहे. यातच असंतोषाचा उगम आणि १९७१ पर्यंतचा प्रवाह याची मूलभूत न्याय्यता आली. नक्षलवादी चळवळीची सर्वसाधारणपणे परिचित असणारी पार्श्वभूमी ही अशी आहे. [ क्रमशः [

आर्थिक टिपणे :

# उसना दागिना

नारायण वैद्य
सभासद, पुणे म. न. पा.

२६ जानेवारी १९७६ या प्रजासत्ताकदिनी दिल्लीत चाललेला राष्ट्रीय सोहळा-समारंभ त्याच दिवशी त्याच वेळी मुंबईत टी. व्ही. वर पाहताना लोकाना शंका येत होती की, 'गेल्या वर्षीच्या–म्हणजे २६ जानेवारी १९७५ च्या–प्रजासत्ताकदिनाची फिल्म तर आज दाखवीत नाहीत ना? इतक्या दूर अंतरावरचे दृश्य ताबडतोब कसे प्रक्षेपित केले जाते?'

परंतु हे सारे जमू शकले अमेरिकेकडून एक वर्षापुरत्या (उसन्या) घेतलेल्या उपग्रहामार्फत हा उपग्रह अमेरिकेकडून जरी उसना घेतला होता (का भाड्याने?) तरी अशा प्रकारच्या उपग्रहाद्वारा प्रक्षेपण करण्याचा खर्च भारताला सुमारे ६० लक्ष पौंड म्हणजे काही कोटी रुपये आला असे म्हणतात 'भारतासारख्या गरीब देशाला ही महागडी योजना परवडणारी नाही' अशी टीका त्या वेळी झाली होती. हा उपग्रह नॅशनल एरॉनॉटिक्स ॲन्ड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (नासा) या अमेरिकन अंतरिक्ष संस्थेने नव्या पद्धतीने बनविलेला एक प्रभावशाली उपग्रह आहे जमिनीवर मोठमोठाले मनोरे उभारून प्रक्षेपण करण्याची जरुरी येथे नसते. दूरदूरच्या टी. व्ही. पर्यंत पोचेल असे प्रक्षेपण हा उपग्रह सरळ करू शकतो. 'नासाने भारताशी याबाबत केलेला करार मूळचा एक वर्षाचा. ते वर्ष संपूनही गेले तसेच हा उपग्रह जास्तीत जास्त दोन वर्षे काम देईल असा त्या वेळचा अंदाज. आता हा उपग्रह पृथ्वीसमोरच्या कक्षेत विशिष्ट ठिकाणी परत नेऊन ठेवण्याचा व त्याद्वारे पुढील संशोधन करण्याचा नासाचा मानस आहे.'

भारतातला स्पेस ॲप्लिकेशन सेंटरच्या मध्यवर्ती कार्यालयातील शास्त्रज्ञांना असे आढळले आहे की, या उपग्रहाद्वारे जे कार्यक्रम आतापर्यंत प्रक्षेपित केले गेले त्याचा शैक्षणिक फायदा दररोज दूरदूरच्या सुमारे २००० खेड्यांना मिळाला आहे. सरासरी एकूण प्रेक्षकवर्ग २ लाख होता. ज्या खेड्याला हा टी व्ही. सेट दिलेला होता तेथे सरासरी १७४ लोक कार्यक्रम पाहात असत. या कार्यक्रमातून शेती, पोषण, कुटुंबनियोजन याचे शिक्षण दिले जाई. त्याचबरोबर करमणूक व बातम्याही असत. समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञ यांनी 'झालेल्या परिणामाची' पाहणी केली. त्याचा निष्कर्ष भारत सरकार, नासा व ऑक्टोबर महिन्यात अहमदाबाद येथे युनेस्कोतर्फे जी जागतिक परिषद भरणार आहे त्याना सादर केला जाणार आहे

पण भारतापुढे प्रश्न असा आहे की, हा उपग्रह नासाने काढून घेतला तर पुढे काय? काही कोटींचा खर्च भारत सरकारने केला ही गोष्ट खरी असेल तर एक–दोन वर्षापुरता असा हा 'उसना दागिना' भाड्याने घेण्याची योजना कोणी आखली? कोणी मान्य केली? टी. व्ही चा प्रसार भारतात झपाट्याने होत आहे. निरक्षर जनतेला प्रत्यक्ष डोळ्यांनी कार्यक्रम पाहून जे ज्ञान मिळते ते विचारात घेता टी व्ही सारख्या शैक्षणिक माध्यमाचा त्याग करून चालणार नाही. माहिती व नभोवाणी मंत्री श्री. लालकृष्ण अडवानी यानी राज्यसभेत नुकतेच असे जाहीर केले की, 'हैद्राबाद येथे नवे टी व्ही प्रक्षेपण केंद्र स्थापन केले जात असून त्याचा फायदा सभोवतालच्या १६०० खेड्यातल्या ३८ लक्ष जनतेला मिळणार आहे.' आपले शास्त्रज्ञ टी. व्ही. साठी उपग्रह जेव्हा बनवतील तेव्हा तो बनो; परतु देशात सर्वत्र– शैक्षणिक माध्यम म्हणून– टी. व्ही. चा प्रसार करण्यासाठी नवी तंत्रे आपण शोधली पाहिजेत.

□

१९६२ मध्ये झालेल्या भारत–चीन युद्धामुळे या दोन्ही देशातले राजकीय–व्यापारी असे सर्व प्रकारचे संबंध तुटले. त्यानतर अनेक वर्षे दोन्ही देशामध्ये परस्पराविषयी शत्रुत्वाचे वातावरण होते. पुढे काही वर्षांनी राजकीय पातळीवर संबंध सुधारण्याच्या पर्वाला प्रारभ झाला आणि आज गेली पधरा वर्षे खंडित झालेले व्यापारी संबंध पुन्हा प्रस्थापित होण्याच्या मार्गावर आहेत हे स्वागतार्ह होय.

नुकतेच कॅन्टन येथे एक औद्योगिक प्रदर्शन पार पडले. '१९६२ नतर प्रथमच भारतीय शिष्टमडळाला या प्रदर्शनाचे निमंत्रण देण्यात आले होते. तेथे भारत आणि चीन यामध्ये एका व्यापारी कराराचा प्रारंभ झाला. हा करार १ कोटी ५० लक्ष रुपयांचा असून त्यानुसार भारत चीनला लाखेच्या काड्या निर्यात करील व पारा, ॲन्टिमनी यांसारख्या अलोहित धातूची आयात चीनकडून भारताला करता येईल.'

हा १ कोटी ५० लक्षांचा आकडा जरी लहान दिसत असला तरी या घटनेचे महत्त्व खूप आहे. ९५ लक्ष ६१ हजार चौ. किलोमीटर एवढे प्रचंड क्षेत्रफळ असलेल्या ६९ कोटी ७६ लक्ष एवढ्या प्रचंड लोकसंख्येच्या शेजारी राष्ट्राशी भारतासारख्या देशाला शत्रुत्वाचे संबंध ठेवणे परवडणारे नाही. व्यापारी संबंधातून पुढे मैत्री दृढ झाल्याची अनेक देशाची उदाहरणे या जगात आहेत, ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. म्हणून स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन यापुढे भारत-चीन व्यापारी क्षेत्राचा विस्तार वाढविण्याचा मनापासून प्रयत्न करील अशी आशा आहे.

ज्या वेळी–म्हणजे १९६२ मध्ये–भारत-चीन संबंध तुटले तेव्हा भारत-चीन व्यापारी क्षेत्र वाढण्याच्या मार्गावर होते. दुसऱ्या पचवार्षिक योजनेच्या उत्तरार्धात भारताचा औद्योगिक पाया चांगल्या रीतीने तयार होत होता. काही आवश्यक मालाची आयात व पक्क्या मालाची निर्यात याची भारताला आवश्यकता जाणवू लागली होती १९६२ पूर्वीच्या काळात पाहू गेल्यास असे आढळेल की, १९५९-६० मध्ये भारताची चीनला निर्यात सर्वांत जास्त म्हणजे ७·७२ कोटींची होती. चीनकडून भारताचा आयात व्यापार १९५१–५२ मध्ये सर्वांत जास्त म्हणजे १६ कोटी रुपयांचा होता. तरी त्या वर्षी भारताच्या एकूण आयातीत चीनचा वाटा जेमतेम १ टक्क्यापेक्षा थोडा अधिक होता. तसेच १९५९–६० मध्ये भारताची चीनला निर्यात सर्वांत अधिक असली तरी चीनच्या एकूण आयात व्यापारात भारताचा वाटा अगदी नगण्य म्हणजे ०·८ टक्के होता.

जगाच्या राजकारणात चीन हा अनेकांशी फटकून वागत असला तरी जगात चीनचे व्यापारी संबंधच नाहीत–किंवा असले तरी कमी–असे समजणे अडाणीपणाचे होईल. १९५१ ते ६० या काळात चीनच्या निर्यातीत सरासरीने प्रतिवर्षी १७·२ टक्के वाढ झाली व आयातीत प्रतिवर्षी सरासरी १३·२ टक्के वाढ झाली. १९६१ ते ७० या काळात मात्र चीनच्या आयात-निर्यात व्यापाराचा वेग घटला. आयात प्रतिवर्षी सरासरी ०·५ टक्क्याने व निर्यात १ टक्क्याने वाढली. परंतु १९७१ ते ७६ या कालखडात चीनने व्यापारी धोरण अधिक वास्तववादी व मिळतेजुळते घेतले. परिणामी या काळात निर्यात प्रतिवर्षी सरासरी २३ टक्क्यांनी व आयात १८·५ टक्क्यानी वाढली. देशांतर्गत विकासाची कामे पार पाडण्यासाठी परकीय चलन गंगाजळीतील वाढ फार आवश्यक असते. १९७६ मध्ये चीनची एकूण निर्यात ६३०६ कोटी रुपयाची व आयात ५५०६ कोटीची झाली म्हणजे सरळसरळ ८०० कोटी रु चीनच्या गंगाजळीत भर पडली. असे असूनसुद्धा जागतिक निर्यातीत चीनचा हिस्सा फक्त ०·७ टक्के व जागतिक आयातीत चीनचा वाटा फक्त ०·६ टक्केच होता हे आश्चर्य नव्हे काय ?

चीनच्या निर्यातीत खाद्यतेले, इंधन इ. २० टक्के आहे याचा फायदा भारताला घेता येईल. तेलासाठी पश्चिम आशियाई देशावर कायमचे अवलंबून राहाणे भारताला परवडणारे नाही. केवळ तेल महाग करूनच इतर देशांची नाकेबंदी पश्चिम आशियाई करतात असे नाही तर 'शस्त्र' म्हणून तेलाचा उपयोग करून इतराचा आर्थिक पराभव करण्याचा त्या देशाचा उद्योग चालू असतो. तेव्हा 'भारताला चीनकडून तेलाची आयात करता येईल. चीनच्या आयात मालात ५१ टक्के कारखान्यातला उत्पादित माल असतो. खाणीची लोखंड व पोलाद शुद्धिकरणाची, रासायनिक कारखान्यांची, विमानतळ नियंत्रक केंद्रासारख्या वाहतुकीची, तेल उत्खनन करण्याची, टी. व्ही. प्रक्षेपणाची अशा विविध यंत्रसामुग्रीची गरज चीनला आहे. त्याची निर्यात भारत करू शकतो.' त्या दृष्टीने चीनबरोबरचा व्यापार कसा वाढेल हे आपण पाहिले पाहिजे.

विदेशमंत्री अटलविहारी बाजपेयी यांनी लोकसभेत सांगितले की, 'भारताच्या व्यापारी जहाजाना चीनच्या बंदरात जाण्याची परवानगी चीनने दिली आहे.' त्यापाठोपाठ शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने असे जाहीर केले आहे की, त्यांची एक मालवाहू बोट कलकत्त्याहून जुलैच्या मध्यास चीनला जाईल. स्वतःच्या जहाजातून दुसऱ्या देशांशी केलेला व्यापार अधिक फायद्याचा होतो हे सांगायला पाहिजे असे नाही.

□

डिसेंबर ७६ मध्ये जो चहा १४ रु किलो होता तो मे ७७ मध्ये २५ रु. किलो इतका भडकला. चहा म्हणजे भारतातल्या लक्षावधी गरिबांचे 'अमृत !' तेच बेसुमार महागल्यावर लोकांत संतापाची लाट उसळल्यास नवल नाही.

चहाचे उत्पादन करणारे व निर्यात करणारे जगातले प्रमुख देश म्हणजे श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका. तेथील उत्पादन यंदा खूपच घटले. ब्राझिलमध्ये कॉफीचे उत्पादन भयानक प्रमाणात कमी झाले. परिणामी आंतरराष्ट्रीय बाजारात कॉफीचा भाव ७० रु. किलो झाल्यामुळे कॉफीवाली मंडळी ५० रु. किलो दराचा चहा पसंत करू लागली. म्हणून भारतीय चहाला जगातून भरमसाठ मागणी आली. इतकी की, कलकत्त्याच्या लिलावबाजारात ४० रु किलो दराने माल उचलला गेला.

व्यापाऱ्यांना काय, सुवर्णसंधीच ! पैशाच्या लोभाने अधिक चहा निर्यात झाला आणि इथले भाव कडाडले. दरम्यान केंद्र सरकारने चहावरचा निर्यात–कर किलोमागे ५ रु. वाढविल्यामुळे चहाचे भाव २५ रु. पेक्षा अधिक वर न जाता उलट २३ रुपयापर्यंत खाली आले आहेत.

तरी पण २३ रु. किलो ही काही स्वस्ताई नव्हे ! देशासाठी वर्षाला लागणारा चहा बाजूला राखून ठेवून मगच उरलेला निर्यात करण्यास सरकारने परवानगी देणे हा यावरचा उपाय होय.


☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

□ **सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ **टॉलस्टॉय एक माणूस**
सुमती देवस्थळे

□ **श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर

□ **शतपावली**
रवींद्र पिंगे

□ **पुरंदऱ्यांची दौलत**

□ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो. पुरंदरे

□ ★ ★

# कलकत्ता मेल

तारा पंडित

## ☐ बंधुगण

रवींद्रनाथानी बंगाली लोकांवर काय जादू केलीय कोण जाणे ! माणूस कोणत्याही राजकीय पक्षाचा असो, कविगुरूंच्या चरणांपाशी अगदी लीन होतो, ह्याचं प्रत्यतर येतं सभा-समेलनाच्या वेळी. जेव्हा निवडणुकीचे वारे वेगाने वाहत असतात, प्रचार-सभा धमाल उडवितात, शहरातले सगळे पार्कस् भाषणानी दुमदुमत असतात अशा वेळी तुम्ही कुठल्याही पक्षाच्या सभेला जाऊन बसा, सुरुवातीला तुमच्या कानावर पडेल ते रवींद्रसंगीत. हार्मोनियमच्या सुरात सूर मिसळून गद्गद स्वरात गाइलेलं रवींद्रसंगीत सारा श्रोतृवृंद अगदी तल्लीन होऊन ऐकत असतो–हे आणखीच आश्चर्य ! वास्तविक गाणी तीच ती असतात, अनेक वेळा ऐकलेली असतात तरी पण पुन्हापुन्हा ऐकतानादेखील तो कसल तरी नाविन्य अनुभवीत असतो, त्या संगीताशी एकरूप होऊन जातो. काय हा टागोरांचा बंगाली मनावर जबरदस्त प्रभाव !

आणि मग भावविश्वातून जागा झालेला वक्ता माइकसमोर उभा राहतो. पहिला शब्द ठरलेला–'बंधुगण...' हा शब्दप्रयोग मोठा मजेदार आहे. लहानपणी महाराष्ट्रात असताना वक्त्यानी म्हटलेले शब्द आठवतात-'भाईयो और (एक छोडके) बहनो !' किंवा 'बंधुभगिनीनो !' इथे मात्र 'बंधुगण' ह्या संबोधनात भगिनीचा स्पष्ट उल्लेख दिसत नाही. याची दोन कारणे संभवतात. एक तर 'बंधुगण' म्हटल की, त्यात स्त्री–पुरुष दोघाचाही उल्लेख अध्याहृत असतो. बंगाली भाषेत मैत्रिणीलासुद्धा 'बंधू' म्हणायचीच पद्धत आहे. पुरुष–मित्र आणि स्त्री–मित्र यातील फरक दाखवायला 'बांधवी' असा शब्दप्रयोग अस्तित्वात आहे; पण तो क्वचितच प्रचारात आढळतो. 'आमार बंधू' म्हटलं की, मित्र किंवा मैत्रिण असे दोन्हीही अर्थ त्यात समाविष्ट असतात. मग संदर्भाने तो मित्र आहे की मैत्रिण आहे हे आपण समजून घ्यायचे. म्हणूनच कदाचित 'बंधुगण' हा शब्द भाषणाच्या प्रारंभी श्रोत्यांना उद्देशून वापरला जात असावा. त्या वेळी स्त्री–पुरुष हा भेदभाव न ठेवता साऱ्यांनाच बंधू (मित्र) म्हणून संबोधण्यात येत असावे.

दुसरे कारण असेही संभवते की, इथे राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा प्रादुर्भाव तुलनात्मक दृष्टया कमी प्रमाणात आढळून येतो. बंगाली मन अजूनही जुन्या संस्कारांना चिकटून आहे. जगाबरोबर बंगालही प्रगतिपथावर पुढे सरकत असला तरी आपलं जुनं आहे त्याचा चुटकीसरशी तो त्याग करू इच्छित नाही. येथील अगदी तरुण मुलेसुद्धा धोतर आणि झब्बा घालून हिंडतात तेव्हा जरा विचित्रच वाटत. भारतातील अन्य शहरात ९० टक्के मुली बेलबॉटम घालून हिंडत असतात अशा वेळी ९० टक्के बंगाली मुली साडीतच बघायला मिळतील. इतर ठिकाणी नायलॉन, जॉर्जेट, वुली इ. प्रकार भरपूर प्रमाणात आढळत असले तरी बंगाली स्त्रीला खास सुती–हातमागाची साडीच अधिक प्रिय आहे. म्हणूनच येथील हातमागाच्या धंद्यावर इतर स्पर्धक मात करू शकले नाहीत. उलट ह्या हातमागाच्या साडीच्या बाबतीत रंगसंगती, डिझाइन ह्या दृष्टीने अधिकाधिक प्रयोगशील कलाकारांची डोकी वापरली गेल्याचे जाणवते. म्हणूनच बंगालच्या बाहेरही बंगाली साडीला महत्त्व आले आहे.

जुन्या संस्काराविषयी बोलता बोलता फार दूर गेले खरी, मला म्हणायचय, बंगाली माणसाने आपली जुनी संस्कृती उराशी जतन केलेली आहे म्हणूनच कदाचित येथील स्त्री फारशी हिरीरीने समाजकार्यात पडताना दिसत नाही. त्या दृष्टीने 'बंधुगण' हा शब्द केवळ पुरुषानाच संबोधण्यासाठी वापरला जात असण्याची शक्यता आहे.

□

## ☐ बंगाल लाल झाला आणि–

नाही तरी पश्चिम बंगालमध्ये जनतापक्षाची सत्ता प्रस्थापित होईल अशी लक्षण दिसत नव्हतीच; पण उसन अवसान आणून जनतापक्षाचे लोक म्हणायचे– वा ! वा ! सर्वच्या सर्व २९४ जागा आमच्याच पक्षाला मिळणार आहेत. जसजसा डाव्या आघाडीचा जोर वाढू लागला तसतसे २९४ वरून ते खाली घसरू लागले; पण २९४ मधील ४ हा आकडा अंतर्धान पावून उरलेले २९ च फक्त आपल्या भाग्यात राहतील असं त्याना स्वप्नातसुद्धा वाटल नव्हत. डाव्या आघाडीचा उन्मत्त विजय आपल्या उघड्या डोळ्यानी पाहण त्यांच्या नशिबी आल.

डाव्या आघाडीच्या विजयाने लाल झेंडे फडफडले. सारा बंगाल लाल रंगाने माखून निघाला. डाव्या प्रवृत्तीच्या सर्वसाधारण माणसाच्या डोळ्यातही ती लाली उतरली. ज्योती बसू आता कमालीचे खूष आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरचा प्रत्येक स्नायु हसतो आहे मुख्य मंत्र्याच्या खुर्चीत ते आजच स्थानापन्न झाले आहेत खुर्चीचे पाय कोणी वाह्यात व्यक्ती ओढणार नाही ना याची पूर्ण खबरदारी ते घेणार आहेत. १९६७ व १९६९ चे जबरदस्त अपयश गाठीला बांधलेले असल्यामुळे ते आता डोळयात तेल घालून राज्यकारभार करतील अशी आशा ठेवू या.

बंगालच्या लाल रंगाने स्वतःची अलिप्तता साऱ्या भारताला प्रकर्षाने जाणवून दिली आहे खरी; पण ह्याच बंगालमध्ये कॉंग्रेस आणि जनतापक्ष, विजयोन्मादात गुंग असलेल्या डाव्याना काडया टोचण्याचा निरर्थक प्रयत्न करीत आहेत. ह्या दोन्ही पक्षाना डाव्याचा– विशेषत. मार्क्सवाद्याचा– संताप आलेला आहे. त्या भरात हे दोन्ही पक्ष 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' ह्या उक्तीनुसार हातमिळवणी करून सत्ताधाऱ्याविरुद्ध उठण्याचे मनसुबे तर रचीत नसतील ना अशी एक शंका मनाला उगाचच चाटून जाते. एरवी प्रफुल्लचंद्रानी तसले आक्षेपार्ह उद्गार काढले नसते. स्वतःच्या पक्षाशीच प्रतारणा करण्याइतपत ते उद्गार अविश्वसनीय आहेत. सत्ताराच्या वाऱ्याने फुललेले हे निखारे स्वपक्षालाच चटके देतील असे त्याना का बरे वाटले नाही ?

झाल काय की, जनतापक्षाची बैठक सुरू असताना एकाएकी काही तरुणांनी घोषणा देण्यास सुरुवात केली व प्रफुल्लचंद्र सेन (अध्यक्ष, जनतापक्ष, प. बंग शाखा), अशोक कृष्ण दत्त (सेक्रेटरी) आणि डी. एन्. लाहिरी (सेक्रेटरी) ह्यानी राजिनामे द्यावे अशी मागणी केली. कारण विधानसभेच्या निवडणुकीत जनतापक्षाची जोरदार पिछेहाट झाली आहे, पण प्रफुल्लचंद्राकडून राजिनामा मागण्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे आदल्या दिवशीच्या बैठकीत त्यांनी काढलेले उद्गार. ते म्हणाले होते–

'If parliamentary democracy was to thrive in the country, there was need for another All-India party which would be an alternative to Janata. The Congress is the only other such party which had roots all over the country and which, in my opinion, should be purified and revived and brought back to its past prestige and glory.'

ह्या त्याच्या काँग्रेसविषयीच्या अकारण आस्थेमुळेच जनतापक्षाची तरुण मंडळी चिडली व त्यांनी निदर्शने केली.

श्री. पी. सी. सेन ह्याना म्हातारचळ झाला आहे की काय? लोकशाहीचा पुरस्कार करणारे पश्चिम बंगालमधील जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून त्याचेकडे मोठ्या अभिमानाने आम्ही बघत होतो. त्यानी असले अविश्वासार्ह विधान माडणे हे त्याना, त्यांच्या पदाला व लोकशाहीला देखील न शोभणारे आहे

सेनसाहेबाना केवळ सत्तेची हाव होती म्हणून तर त्यानी हे उद्गार काढले नसतील ना? की त्याच्या रक्तात अजूनही काँग्रेसची बीजे जिवत आहेत व संधी मिळताच ती डोके वर काढतात? मार्क्सवाद्यांचा त्याना राग असेल; पण म्हणून त्या रागाच्या भरात काँग्रेसशी हातमिळवणी करण्याची इच्छा त्यानी अप्रत्यक्षपणे व्यक्त करावी? आणि तीही जनतापक्षाच्या पश्चिम बंग शाखेच्या अध्यक्षाच्या खुर्चीवरून?

डाव्यांच्या विजयाने बंगाल लाल झाला, जनतापक्षाचे येथील अध्यक्ष रागाने लाल झाले आणि हे पाहून काँग्रेसवाल्यांना हसू फुटले. □

# मद्रास मेल

श्रीधर लिमये

तामीळनाडू व पाँडेचेरी येथील विधिमंडळाच्या निवडणुका पार पडल्या. त्यात अपेक्षेप्रमाणे अण्णा द्र. मु. क. पक्षाला जास्त जागा मिळाल्या हे खरे, पण तामिळनाडूमधील बरेचसे निकाल आश्चर्यकारक आहेत. खुद्द मद्रास शहरात श्री. करुणानिधींच्या द्र. मु. क. पक्षाने १४ पैकी १३ जागा जिंकून घवघवीत यश मिळविले तर बाकीच्या जिल्ह्यात अण्णा द्र. मु. क. पक्षाला बहुमत मिळाले. त्यानी एकूण १२६ जागा जिंकल्या. द्र. मु. क. पक्षाला ४८ जागा मिळाल्या. हा सगळ्यात मोठा विरोधी पक्ष म्हणून विधिमंडळात बसेल. त्याचबरोबर हे पण लक्षात ठेवण्यासारखे आहे की, विरोधी पक्षांनी जिंकलेल्या सर्व जागांची गोळाबेरीज केली तर अण्णा द्र. मु. क. पक्षाला फक्त ६ जागांचे बहुमत आहे.

निवडणुकीचा प्रचार करणाऱ्या जनतापक्षाचा एक कार्यकर्ता मला भेटला. त्याच्याशी बातचीत केली. शिवाय इतरही काही मडळीना भेटलो. त्यावरून असे दिसते की, मद्रास शहरात श्री. करुणानिधी याना बहुमत मिळाले ते मुख्यतः झोपडपट्टीतील मतदारांमुळे. त्या दिवशी सकाळसे पासून चागलाच पाऊस होता. त्यामुळे फा र. सुशिक्षित मतदार बाहेर पडलेच नाहीत- झोपडपट्टीतील मतदारांत करुणानिधी चाग लेच पॉप्युलर आहेत. कारण त्याना चांगली घरे बाधून मिळाली व इतरही सोयी मिळाल्या; पण, बाहेरच्या जिल्ह्यात मात्र उलटी परिस्थिती होती. द्र. मु. क. चे राज्य असताना त्याच्या कार्यकर्त्यांनी बराच पैसा गोळा केला, मोठी घरे बाधली आणि त्याकडे बोट दाखवून खेडूत म्हणत, हे पैसेखाऊ आहेत; पण अण्णा द्र. मु. क. च्या कार्यकर्त्यांबद्दल असे म्हणायला सध्या तरी जागा नाही. तेव्हा आम्ही त्याना मत देणार! एकूण काय बहुसंख्य मतदारानी स्थानिक पक्षालाच मते दिली.

द्र. मु. क. किंवा अण्णा द्र. मु. क. याच्या मतप्रणालीत फरक नाही. वाद सुरू झाला तो नेत्यांबद्दल. अण्णा द्र. मु. क. कसा सुरू झाला याची माहिती पुष्कळाना असेल. त्या वेळच्या द्र. मु. क. पक्षातील एक नेते श्री एम. जी. रामचद्रन याना एकाएकी असा साक्षात्कार झाला की, सत्ताधिष्ठित द्र. मु. क. नेते लाचखाऊ व हुकुमशहा आहेत आणि त्यानी आपला सवता सुभा माडला. त्याआधीच ते आयकर-प्रकरणातून सुखरूप सुटले होते. यामागचे इंगित काय होते ते सागायला नकोच. असे म्हणतात की, त्या वेळच्या दिल्लीच्या राज्यकर्त्यांनी (राज्यकर्तीने म्हणा हवं तर) एम जी आर ना पेचात पकडून द्र. मु. क. पक्ष फोडण्यास उद्युक्त केले; पण तो डाव फसला व लोक करुणानिधीच्या मागे उभे राहिले.

अण्णा द्र. मु. कने दोनही ठिकाणी निवडणुकीत बहुमत मिळविले असले तरी मत्रिमडळ घडविण्याबाबत त्यांना बऱ्याच अडचणीना तोड द्यावे लागले. श्री. करुणानिधी हे मुरब्बी राजकारणी आहेत निवडणुकीनतर झालेल्या एका प्रचड सभेत अण्णा द्र मु क. पक्षाला सहा महिने स्थिर होण्याकरिता वेळ देऊ असे त्यानी सांगितले. याचा अर्थ असा की त्यानतर त्याचे डावपेच चालू होतील. वर सांगितल्याप्रमाणे अण्णा द्र मु. कला फक्त सहा मताचे पाठबळ आहे आत्ताच ८० लोकांनी मत्रिपदावर हक्क सांगायला सुरुवात केली आहे आणि एवढ्या सभासदाना मत्री बनविणे शक्य नाही. तेव्हा या असतुष्ट आत्म्याना आपल्याकडे ओढायचे हा त्याचा डाव आहे. अण्णा द्र. मु. क. पक्षातले बरेच आमदार त्याना भेटतात असे म्हणतात. त्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. सरकारी आयोगाने चौकशी चालविली आहे तरी सुद्धा ठाम आत्मविश्वासाने ते निवडणुकीला उभे राहिले व निवडून आले. योग्य ते डावपेच करून आमदार फोडायचे व पुनः राज्यावर यायचे असेही स्वप्न ते पाहात असतील.

एम्. जी. रामचद्रन हे सिनेमानट म्हणून लोकाचे लाडके आहेत; पण राजकारणाचा त्यांना अनुभव नाही. त्याचा स्वभाव चागला आहे. पण माणसाना एकत्र बाधून ठेवण्याचे कसब किती आहे त्याची आता परीक्षा आहे. बोलपटात त्याना भूमिका दिली की शूटिंगला तारखा मिळता मिळता दिग्दर्शकाच्या नाकी दम येतो. अशा या कामाच्या गराड्यात मुख्य मंत्रीपदाचे रोजचे काम ते कसे करणार आहेत? असे म्हणतात की त्यानी मुख्य सचिवाना विचारले की आठवड्यातून एक–दोन वेळा कचेरीत आले तर चालेल काय?

एकूण काय तामीळनाडूमध्ये स्थानिक पक्षांनाच महत्त्व आहे. गेली कित्येक वर्षे सत्ता त्यांच्याच हातात आहे. अखिल भारतीय पातळीवर स्थापन झालेल्या जनतापक्षाच्या तामीळनाडू शाखेला भेडसवणारा प्रश्न असा आहे की कोणत्या कार्यक्रमाने जनतेला या स्थानिक पक्षाच्या कचाट्यातून सोडवून अखिल भारतीय पातळीवर आणता येईल. □

कथा

# थोटी !

दिलीप निबाळकर

'ए !'

'हू !'

'नुसतं हु हूं नको. काही तरी बोल ना.'

'काय बोलू ?'

'ते मला नको विचारूस. काहीही बोल !'

'मस्त आयडिया. तुझं ते 'ओ सजना बरखा बहर आयी' म्हण ना !'

'आज आवाज नाही रे लागत.'

'आवाज गेला उडत. मला फक्त तुझ्याकडून काही तरी ऐकायचं आहे आज.'

'मुड नाही आज.'

'तुला नसेल तर आलीस कशाला दुसऱ्याचा ऑफ करायला ?'

.........................

'काय रे रागावलास ? काही विशेष ?'

'काही नाही विशेष. झक मारली अन् तुझ्याबरोबर आलो हे विशेष. साऱ्या संध्याकाळचा विचका !'

'सॉरी ! राजा, खरच, आज फक्त तुला टक लावून पाहात बसावंसं वाटतं आहे म्हणूनच बोलावलं. नाही एक दिवस बोलले तर काय बिघडल ?'

'एवढं पाहात बसावंसं वाटायला मी काही मदनाचा पुतळा नाही लागून गेलो. अन् पाहायचच होतं तर बसायच होतंस घरातच फोटो घेऊन !

'आयला वैतागच आहे म्हणे पहात बसावसं वाटलं'

'...पुन्हा एकदा सॉरी म्हणते ना ! उद्या परत ये. खूप बोलायचे आहे.'

'हू ! हे तर दररोजचच आहे. माहिती आहे ना, तरफडायला जातोय कुठे ! येणारच परत ! चल, आता उठूयाच !'

'चला !'

प्रिय पकोडी,

आज मी बोलले नाही म्हणून खूप रागावला असशील ना ? संध्याकाळ खराब केली की तू नेहमीच ऑफ होतोस हे मला चागल ठाऊक असूनही, आज सध्याकाळी तुला निरोप देऊन बोलावल खरं; पण आज मला बोलायचं नव्हतच मुळी ! म्हणजे काही मुका मंगळवार–शुक्रवार होता अस नाही. पण... पण एक वेळ ते असले मगळवार–शुक्रवार परवडले अस आता वाटू लागलं आहे. कारण त्या वाराच्या ठराविक पोथ्या वाचून मनाला थाडा वेळ तरी समाधान मिळत. 'आजची संध्याकाळ खराब केल्यानतरही या बाईने ही पोथ्या-पुराणाची 'भंकस' काय चालू केली आहे' अस म्हणून पत्र वाचण्याचं सोडू नकोस, ही विनंती.

काल संध्याकाळी बोलावंसं वाटत नव्हतं. फक्त तुला डोळे भरून पहावस वाटत होतं. का ? त्याचा खुलासा करण्यासाठीच हा पत्रप्रपच.

एरवी मी एवढी बडबडणारी, की माझ्या बडबडीला कटाळूनच तू बहुधा कॉफीचे प्रपोजल मांडायचास; पण कालची संध्याकाळ वेगळी होती. अशी 'वेगळी संध्याकाळ' वगैरे वाचुन बोअर होऊ नकोस. कोणतीही गोष्ट लाइटली घेण्याचा तुझा स्वभाव मला माहीत असतानाही केवळ एकदाच, आजच माझ्यासाठी तू हे सर्व गभीरपणे वाचावंस ही इच्छा. तुझ्या–माझ्या मैत्रीचा विषय आता आपल्या दोघांच्या घरात आणि बाहेरही जुना झाला आहे. त्यात सांगण्यासारखं काही नाही किंवा लपवण्यासारखं तर मुळीच नाही. सुरुवाती सुरुवातीस माझ्या घरी तुझी एका भटक्या बेफिकीर, पोराची 'इमेज' आता एक गिर्यारोहणाची 'हॉबी' असणारा मोकळ्या स्वभावाचा बडबड्या तरुण अशी तयार झाली आहे. जे माझ्या घरातल्याच्याबाबत तेच तुझ्याही घरात !

'ही केवळ पुस्तकांच्या जगातच रमणारी मुलगी व्यवहारात काय कपाळ घर सांभाळणार !' अशी म्हणणारी तुझी आई मला आता खुशीने विशेष समारंभाच्या तयारीसाठी खास आमंत्रण देते यातच सारं काही आलं. हे तुझं–माझं सुदैव ! दोघांचीही घरं आचार–विचारान सुशिक्षित निघाली, अन् मैत्री वाढायला, तिच रूपातर प्रेमात व्हायला फार अवधी लागला नाही. चारचौघा प्रेमिकासारख्याच आपल्याही गाठी कॉलेजातच पडल्या अन् जे इतरत्र तेच आपल्याही बाबतीत घडल !

गिर्यारोहण–डोगरदऱ्याची भटकती हा तुझा मनस्वी छद अन् मला असणार पुस्तकाचं कमालीचं वेड या दोन्हीची सागड घालायची कशी हा आपल्या दोघापेक्षाही इतरांनाच नको तितक्या आपुलकीन सतावणारा प्रश्न सोडविला तो दोघाच्याही 'बडबड्या स्वभाव' या कॉमन फॅक्टरनं. अर्थात तुझं बोलणं पावसाळातल्या धबधब्यासारखं–सीझनल–एकदा बोलायला लागलास की न थाबता भराभर सागून मोकळं होणारा तर मी सातत्यान बडबड करणारी.

आजपर्यंत तुझी गिरिविहाराची लहानशी जरी मोहीम झाली तरी त्यानतरचे चार दिवस मला कपलसरिली भौगोलिक विवेचनापासून ते शेवटच्या दिवसाच्या एम्. टी. प्रवासापर्यंत सारं ऐकाव लागायचं आणि मीदेखील एखाद चागल पुस्तक वाचल्यानंतर त्याविषयी–तुझी इच्छा असो वा नसो – त्या पुस्तकाविषयी तुला सुनावण्यास कमी केलेलं नाही ! तर असा हा कॉमन फॅक्टर आपणा दोघाना बाधून ठेवण्यास पुरेसा ठरला आहे.

पकोडी, आतापर्यंत इतका वेळ तुझ्या स्वभावशैलीत या पत्रातून बोलण्याचा प्रयत्न केला; पण आता राहवत नाही. नाइलाजास्तव का होईना गभीर व्हाव लागत आहे. गंभीर होण–स्वस्थ चित्तान विचार करण हे मला फारसं अन् तुला तर कधीच जमलेलं नाही. जमवाजमव करण्यास तू ज्याला मानत नाहीस त्या दैवाचाही मोठा वाटा आहे. बी, सिन्सिअर ! कृपया भकस मानू नकोस !

प्रकाश, तुला माहीतच आहे की थोडाफार वाचनाची म्हण किंवा संवेदनाशील मनाची देणगी म्हण–मला लाभल्यानं थोडी-

फार सामाजिक कार्याची मला पहिल्यापासून आवड आहे. कॉलेजच्या या चार वर्षात मी विविध प्रकारच्या पुस्तकाच्या दुनियेतून थोडीफार वास्तवात जाण्याचा नेहमीच प्रयत्न करते. ' गेल्या वर्षी बिहारमधल्या महा-पुराच्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी याचमुळं तुला सोडून एक महिनाभर मी तिकडे राहू शकले, ' येथे हे स्पष्ट करावसं वाटतं की यात कुठेही ध्येयवादासाठी–समाजासाठी जीवन समर्पित करणं वगैरेच आकर्षण नव्हत तर एका वेगळ्या अनोख्या अनुभवविश्वास सामोरे गेल्याचा आनंद असे. अर्थातच, ध्येयच नसल्याने ध्येयपूर्तीचा आनद नसे; पण इतरापेक्षा वेगळ जीवन जगावयास मिळतं याचा आनद जरूर असे. आज सर्व प्रामाणिकपणानेच सागायच ठरविल्यान पुन्हा एकदा सागते की या वेगळेपणाच्या लालसेपायी हे सोशलवर्क करीत असे. थोडीफार सामाजिक जबाबदारीची जाणीव वगैरे असे–नाही असे नाही.

पण आता हे माझे अनुभव, लालसेचं विश्व उध्वस्त होणार आहे. असा दचकू नकोस ! यापेक्षा जोरात धक्के घ्यावयाच्या तयारीनेच पुढे वाचायला लाग !

ज्या अनुभवविश्वाची मला ओढ होती त्यातच माझा अत ठरलेला असावा याला तू काय नाव द्यायचे ते दे ! मी याला दैवगती म्हणते. कारण माझा देवावर विश्वास आहे.

सहा महिन्यापूर्वी या अनुभवाच्या हव्यासापोटीच मी, एका सेवार्थ संस्थेनं चालविलेल्या कुष्ठरोग्याच्या आश्रमात एक महिना मुक्काम ठोकला होता. तेथून आल्यानंतरच्या आपल्या पहिल्या भेटीतला तुझा राग आठवला की मला आजही तुझ्यापुढं येण्याच धाडस होत नाही. ' एकजात हे थोटे गोळ्या घालून नाहीसे केले पाहिजेत ' हे तुझं मत मला अजिबात पसंत नसताही केवळ वाद टाळण्यासाठीच मी त्या वेळी काहीही बोलले नव्हते. निरोगी राष्ट्र, अनुत्पादक घटकाचा नाश, असल्या तुझ्या मतांशी मी सहमत झाले नव्हते असे नाही; पण मला त्या दिवशी तरी फक्त त्या आश्रमातीलच– जगाने झिडकारलेली पण आश्रमचालकांच्या आपुलकीने पुन्हा फुललेली मनं अन् राबणाऱ्या अर्धवट हातांतूनही निर्माण होणारी उत्पादित कामंच–दिसत होती. हे सर्व ऐकून घेण्याच्या मूडमध्ये तू नव्हतास म्हणूनच मी गप्प बसले.

मी गप्प बसले पण–पण 'तो' गप्प बसला नाही. काय गंमत आहे रे ! आज पावेतो या आश्रमात किंवा यासारख्या इतर अनेक आश्रमाना कित्येकजण भेटी देतात. काही बघे तर काहीजण ' काही तरी ' करू इच्छिणारे; पण येथे आल्यानतर हे सर्व पाहून, सहन न होऊन परत जाणारे. या सर्वांना तो आपुलकीने जवळ घेतोच असे नाही; पण मी त्याच्यावर काय मोहिनी घातली कोण जाणे मी त्याच्या सहवासात सुमारे एक महिनाभर राहिले अन् मी त्याची कधी झाले हे माझं मलाच कळले नाही. त्याच-माझं कायमचं नातं जुळल्याचं मला जेव्हा कळलं तेव्हा मला आश्चर्य वाटलं, हसूही आल अन्...

थांब पकोड्या, असा जळू नकोस कोण तो साला माझ्यात वाटेकरी होणारा म्हणू. त्यास शिव्या देऊ नकोस. कारण तो मुळी तुझ्या दृष्टीसच पडणार नाही. आता मीच त्याच्याकडे जाण्याचे ठरविले आहे. अगत्याने त्याने मला जवळ केले आहे. मग नको जायला ?

तो कुष्ठरोग आहे.

असा एकदम विझू नकोस. मी आजपासून तुला भेटणार नाही. घरातही नाही अन् कोठेच. आता कोण मला घरी राहू देईल ? कारण परवा दिवशीच डायग्नोसिस झाले आहे. फर्स्ट स्टेप आहे. लवकर उपचार केले तर यातून सहज सुटका होईल असे म्हणत होते डॉक्टर ! पण आता मीच त्याला न सोडण्याचा निर्णय घेतला आहे अनायासे याही एका वेगळ्या जगात जाण्याची–अनुभव विश्वाची–प्राप्ती होत आहे तर का सोडा ?

पकोड्या, आता बिनती एकच. लग्नाचे, तुझ्या आयुष्याचे वगैरे तुझे तू बघ ! तू त्यास समर्थ आहेस म्हणूनच या कोणत्याही बाबतीतली विनती मी तुला करीत नाही. (या दृष्टीने तुझ्यासारखा खराखुरा 'भक्कम पुरुष' तुझ्या रूपाने, अल्पकाळ का होईना माझ्या वाट्यास आल्याबद्दल मी स्वतःस भाग्यवान समजते.) माझी विनती आगळी असेल पण प्रामाणिक आहे. तुझं जे लाडक मत आहे की, 'एकजात या थोट्याना गोळ्या घातल्या पाहिजेत' ते मत जर अमलात आणणार असशील तर कृपया याची सुरुवात माझ्यापासून कर ! हे अंत:करणापासून सांगते आहे. कारण यातही माझा स्वार्थ आहेच ! एका वेगळ्या मरणाचा अनुभव मला मिळेलच की यातून. करशील माझ्यासाठी एवढे ?

आजपासून भेटू नकोस. भेटणार असशील तर केवळ माझी वरील इच्छा पुरी करण्यासाठीच भेट ! अन्यथा तसाच भेटण्याचा प्रयत्न करशील तर एक थोटी मस्तकात गोळी झाडून घेऊन चिंधड्या होऊन पडलेली दिसेल अन् मग ही गोळी कोणी झाडली हे विचारण्याचाही तुला अधिकार राहणार नाही !

कधी काळी तुझी असणारी
मीरा


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागापासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**BHARAT AYURVEDASHRAM (M) P. O. KATRI SARAI (GAYA)**

पुस्तकपरीक्षण

# दूर गेलेल्या नौका !

सतीश कामत

'दूर गेलेल्या नौका' हा एक लघुकथांचा संग्रह आहे या कथा एका डॉक्टरांनी लिहिलेल्या आहेत. साहजिकच त्यांच्या व्यवसायातील निरनिराळ्या अनुभवावरच त्या आधारलेल्या आहेत. या कथाच आणखी एक वैशिष्टय अस की त्याच्यामध्ये मानवी प्रयत्नांना येणार अपयशच वर्णन केलेलं आहे. आयुष्यात काही क्षण असे येतात की त्या वेळी, नियतीने घातलेल्या घाल्याला निमूटपणे, असहायपणे साक्ष वेत उभ राहावं लागतं. नेमक्या अशाच काही क्षणाचं हे चित्रण आहे.

एकूण दहा कथा असलेल्या या संग्रहात 'कुदकळ्या', 'आई', 'पाठलाग,' 'हरलेली' या कथा विशेष उल्लेखनीय आहेत. मानवी भाव–भावनाचे कंगोरे दाखविण्याचा थोडा प्रयत्न त्याच्यामध्ये केलेला आहे. 'पाठलाग' ही कथा तर बऱ्याच अंशी मानसिक पातळीवरीलच आहे. एका अतिसशयी मनाच्या माणसाच्या, आपल्यावर कोणी तरी सतत 'वॉच' ठेवून आहे अशा निरर्थक सशयातून ही संपूर्ण कथा घडते. 'हरलेली' ही एका प्रेमी युगुलाच्या अपयशी पण दृढ प्रेमाची साक्ष देणारी कथा आहे. 'आई' या कथेमधून कुमारावस्थेतलं मातृत्व या आजच्या काळातील अत्यंत ज्वलत अशा सामाजिक समस्येवर लेखकाने प्रकाश टाकलेला आहे.

हा सबंध संग्रह वाचताना एक गोष्ट वारंवार जाणवते ती ही की यातील कथा, जरी काल्पनिक असल्या तरी, प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांपलीकडे इतर कोणत्याच बाबीची फारशी नोंद लेखकाने घेतलेली नाही. रोग्याच्या शारीरिक व्याधीबरोबरच त्याच्या मनोवस्थेचेही काही धागे पकडण्याचा प्रयत्न या कथामध्ये फारसा कुठेच आढळत नाही काही ठिकाणी तर रोगाची उत्पत्ती, विकास आणि प्रतिबंधक उपाय अशा स्वरूपाच्या शास्त्रीय माहितीवरच बराचसा भाग खर्च झालेला आहे आता डॉक्टरच्या वैद्यकीय व्यवसायातील अनुभवाशी सबधित अशा या कथा असल्यामुळे दवाखाना, औषधे आणि उपचारपद्धती याची भाषा जरी अटळ असली तरी तिचा अतिरेक टाळणं शक्य होत. काही कथांमधील वर्णनं मात्र चागली आहेत. उदाहरणार्थ, 'हरलेली' या कथेमधील पेशटच भयानक रूप, तसच मृत्युशय्येवर पडलेल्या त्या पेशटच्या खोलीमध्ये फिरणारा फॅन म्हणजे 'नियतीच्या शाश्वत खेळाच्या कालचक्राचे हे आरेच आहेत' यासारख्या त्या कथेतील डॉक्टरच्या प्रतिक्रिया त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

पुस्तकाची छपाई मात्र फार काळजीपूर्वक करणं आवश्यक आहे- यासंबंधातल्या चुका कित्येक वेळा रसभगही करतात. उदहारणार्थ, 'हरलेली' या एका उत्कृष्ट कथेमध्ये एक वाक्य, 'कॉट न. ३ वर एक अंदाजे ० वर्षांचा तरुण होता' असं आहे. या शून्याच्या अगोदर काहीच आकडा नाही. कथेच्या गभीर आणि करुण वातावरणाला हे 'मुद्राराक्षसा'चे विनोद फारच मारक ठरतात.

कथांची मांडणी तशी ओबड-धोबड आहे; पण एक प्रामाणिक प्रयत्न म्हणून या कथा–सग्रहाचा सहानुभूतीन विचार होण आवश्यक आहे. कारण पोलिसखात्यातील किंवा जीवनाच्या इतर अनेक क्षेत्रामधील रोमांचकारी अनुभवावर आधारित अशा कथा भरपूर प्रमाणात लिहिल्या जातात; पण अशा तऱ्हेचे, डॉक्टरला त्याच्या व्यवसायात येणाऱ्या अनुभवाचे कथासूत्रात केले गेलेले चित्रण सहसा आढळत नाही. त्या दृष्टिकोनातून डॉ. श्यामकान्त कुलकर्णी याचा हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे.

□

# जरीपटका - षण्मासिक

संपादक – शिवाजी सावंत

नियतकालिकाचे जे विविध. प्रकार सध्या अस्तित्वात आहेत त्यापैकी 'षण्मासिक' हा प्रकार हळूहळू अधिक लोकप्रिय होऊ पाहात आहे. त्यामागची व्यावसायिक कारणं काहीही असतील पण एक मुद्दा मात्र स्पष्ट आहे तो म्हणजे दर महिन्याला किंवा दर तीन महिन्यानी एखादं वाङ्मयीन दर्जाच्या दृष्टीन सामान्य प्रतीच नियतकालिक वाचकासमोर ठेवण्यापेक्षा वर्षातून एकदा किंवा दोनदाच भरपूर कसदार असं वाङ्मय आपल्या वाचकापुढे ठेवण आजचा संपादक अधिक पसंत करू लागला आहे. यदाच्या वर्षी, वासतिक अकाच्या किंवा षण्मासिकाच्या स्वरूपात जी काही नियतकालिकं वाचनालयामध्ये दिसतात त्यामध्ये 'जरीपटका' हे शिवाजी सावत यानी सपादित केलेलं षण्मासिक चटकन लक्ष वेधून घेत

सुमारे दीडशे पानाच अस हे मासिक वाचल्यानतर सपादकमहाशयांनी पानाच्या संख्येपेक्षा मजकुराच्या गुणवत्तेवरच लक्ष अधिक केंद्रित केल असल्याच जाणवत. यामध्ये पु. ल. देशपाडे, ग. वा. बेहरे, वामन चोरघडे, श्रीपाद जोशी, प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी नाईक, बॅ पी. जी पाटील याचे विचारप्रवर्तक लेख आहेत. डॉ. आनद यादव, ज्योत्स्ना देवधर, श्री. ज. जोशी याच्या कथा आहेत गदिमा, कवि यशवत बा. भ. बोरकर याच्या कविता आहेत. या सगळ्याच्या जोडीला सध्या मराठी चित्रपटसृष्टी गाजवीत असलेल्या दादा कोडकेंवर सुधीर गाडगीळ याचा चटकदार लेख आणि एक एकांकिकाही आहे,

'हे षण्मासिक कुठल्याही राजकीय पक्षाला वा विचाराला बाधलेले नाही. ते अत करणाने जोडले गेले आहे फक्त महाराष्ट्राच्या समाजजीवनाला ! महाराष्ट्राच्या अठरापगड जातीच्या, धर्मांच्या पुरुषार्थी प्रकृतीचे आणि प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून या षण्मासिकाचं नाव आहे 'जरीपटका !' अशा खुलासा संपादकमहाशयानी आपल्या सपादकीयातच केलेला आहे आणि याच

प्रत्यंतर मासिक वाचतानाही येतं. मासिकातल्या कथा–लेखांचे विषय सर्वस्पर्शी आहेत. पु. ल. च्या 'प्रलयातील विपळपाने' या वैचारिक लेखात 'भयानक विध्वंसातही नवनिर्माणाची चित्रे ज्यांना पाहता येतात तसेच खरे 'पाहाणारे' तेच द्रष्टे' हा विचार प्रामुख्याने दिसतो तर, 'सुखी माणसाचा सदरा' या लेखात ग. वा बेहरे यांनी, 'जगात सुख नाहीच हे म्हणणं खोटं आहे, सुख मिळवता येतं; अर्थात ते मानण्यावरही असतं' असा प्रवृत्तिवाद मांडलेला आहे. याच विचाराला समांतर पण थोडासा विरोधी असा एक विचार श्रीपाद जोशींच्या 'गर्दीत हरवलेला' या लेखात दिसतो. 'व्यक्तीला स्वत चं असं व्यक्तिमत्त्वच आज उरलेलं नाही' ही त्यांची व्यथा आहे. या लेखाबरोबरच डॉ. जे. पी. नाईक यांचा 'भारतीय अनौपचारिक शिक्षण : प्रमुख पैलू' आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु बॅ. पी. जी. पाटील यांचा 'श्रम आणि शिक्षण' हे दोन्ही लेख वाचनीय आहेत. आजची शिक्षणपद्धती व तिच्यामुळे उद्भवणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपायांचं विस्तृत विवेचन या लेखामध्ये वाचावयास मिळतं

कथेच्या प्रांतात डॉ. आनंद यादव यांची 'मळवट' ही कथा वाचकांच्या मनाची पहिल्यापासूनच जी बिलक्षण पकड घेते ती कथा संपल्यावरही सोडीत नाही श्री. ज. जोशी यांची 'खून' आणि ज्योत्स्ना देवधरांची 'त्याचा बाप' या दोन्हीही कथा समाजातील एका विशिष्ट वर्गाचं भेदक चित्रण करण्यात यशस्वी झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे अनंत सोनवणे यांची 'परतफेड' ही दलितांवरील अत्याचाराचा प्रसंग सांगणारी हृदयद्रावक कथा आणि प्रा. गंगाधर पानतावणे यांचा 'दलित समाज– आंबेडकर कालीन व नंतर' हा लेख, या दोन्ही गोष्टी (कदाचित योगायोगानेही) एकत्र आल्यामुळे या विषयाचं गांभीर्य वाचकाला अधिक तीव्रतेने जाणवतं. प्रा. पानतावणे यांचा हा लेख अभ्यासपूर्ण आहे. लेखाच्या शीर्षकातच सुचविल्याप्रमाणे खरोखरच हा लेख म्हणजे आंबेडकरांच्या 'बहिष्कृत भारत' पासून आजच्या दलित पँथर आणि दलित वाङ्मयापर्यंतच्या सर्व घडामोडींचा चिकित्सक आढावा घेणारा एक लक्षणीय प्रवास आहे.

गीतरामायणकार ग दि. माडगूळकरांनी खास या अंकासाठी शब्दबद्ध केलेली 'विनीवर जरीपटका मिरवा–शिवनिष्ठेच्या सामर्थ्याची ग्वाही जगी फिरवा' ही कविता आहे अगदी खास 'गदिमा स्टाइल' मध्ये, पण त्यांच्यासारख्या श्रेष्ठ कवीने अशी 'मेड टू ऑर्डर' कविता करावी हे खटकल्याशिवाय राहत नाही. कवी यशवंतांच्या *'दिव्य जरीपटका' या कादंबरीच्या बाबतीतही* थोडस तसंच झालेलं दिसतं. त्यामानाने मग बा. भ. बोरकरांची

'या जगाच्या या युगाच्या
सर्व ओलांडून वेशी
या नदीच्या पार झालो
निर्झराच्या गार देशी'

ही कविता मनाला अधिक प्रसन्न करून जाते. तसंच कुमुद ओगले यांची–

'घरेच फक्त खूप खूप
मोठी असतात
त्या मानाने आत राहणारी
खूपच खुजी'

ही कविता मानवी स्वभावाचं सुरेख विश्लेषण करून जाते तर विजय कुवळेकर यांची–

'संपला मुक्काम इथला
दूर आता जायचे
खूप अजुनी ऐक, राणी,
आहे पुढे चालायचे'

ही कविता 'पैलतीरा' ची लागलेली ओढ प्रभावीपणे व्यक्त करते.

याव्यतिरिक्त शिवाजी सावंतांच्या 'छावा' या आगामी कादंबरीतील एक हृदयस्पर्शी प्रसंगही दिलेला आहे 'छावा' ची वाचकाची उत्कंठा तो निश्चितच वाढीस लावतो.

अंकाचं मलपृष्ठ अनंत सालकरांनी त्यांच्या आजपर्यंतच्या ख्यातीला साजेसं असंच काढलंय त्यावर दाखविलेला सूर्याचा सोनेरी गोळा त्याचं तेजही भासविल्याशिवाय राहत नाही. अंकाकडे लक्ष वेधलं जाण्यात या मुखपृष्ठावरील चित्राचाही फार मोठा (आणि पहिला) वाटा आहे अंकाची अंतर्गत सजावट लक्ष्मण कडू व मधू पाटील यांनी कथा–लेखांचे विषय लक्षात घेऊन औचित्यपूर्ण केलेली आहे. जाहिरातीची मांडणीही व्यवस्थित आहे, परंतु 'जरीपटका षण्मासिकास आमच्या शुभेच्छा' अशी एक चौकट शुभेच्छा व्यक्त करणाऱ्याच्या नावाने कुठेही, कशीही अंकभर विखुरलेली आहे

तेव्हा असा हा 'जरीपटका' मासिकाच्या आणि संपादकाच्या नावारून जरी फक्त इतिहासाशीच संबंधित वाटला तरी अपेक्षाभंगाचा सुखद अनुभव देणारा ! □

## साभार पोच

१ मृत्युंजय : नाटक
लेखक : शिवाजी सावंत
प्रकाशक : कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे
मूल्य : ५ रु.

२. घरोघरी हीच बोंब
लेखक · वसंत सबनीस
प्रकाशक . कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
मूल्य : ५ रु.

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**। मॅक्झिम गॉर्की ।**

**। सुमती देवस्थळे ।**

**मूल्य वहा रुपये**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ पुणे ४११ ०३०

# आमचे ग्रंथालय

## Thc Super Secs

By Alice Marchak & Linda Hunter
Corgi Books, Pages 280
70 pence

---

या पुस्तकाचे नाव चक्क व्हेलव्हेट वापरून लिहिले आहे ! हे फॉरिनर्स कधीकधी पुस्तकाचे मुखपृष्ठ फारच आकर्षक करतात. बर्मुडा ट्रँगल या पुस्तकात तर मुखपृष्ठावरची एक छोटी आगबोटच नाहीशी केलेली आहे कित्येक वेळा असे मुखपृष्ठावर भोक पाडून व चंदेरी, रुपेरी शाईने पुस्तक इतके आकर्षक करतात की, मला स्वत:ला ते पुस्तक विकत घेण्याचा मोह होतो; परंतु आता फक्त पुस्तकाची गुणवत्ता बघूनच ते लायब्ररीत टाकायचे असे ठरविले आहे. कित्येक लोक मुखपृष्ठ बघून ही आकर्षक पुस्तके घेत असतील. हे लिहिण्याचे कारण की थोड्या दिवसापूर्वी मराठी पुस्तकाच्या मुखपृष्ठासबंधी महाराष्ट्र टाइम्समध्ये बरीच चर्चा झाली होती. त्यात एका गृहस्थाने असे सुचविले होते की प्रकाशकाने मुखपृष्ठ छापण्यासाठी पैसे वाया घालवू नयेत व त्याऐवजी पुस्तकाची किंमत थोडी कमी करावी. वाचकाकडील मुखपृष्ठे शेवटी कचऱ्याच्या पेटीतच जातात. मग त्याना वाचक प्लॅस्टिक कव्हर का घालीत नाही ? असा माझा प्रश्न आहे. अर्थात हा प्रश्न थोडासा 'लोकाकडे ब्रेड नाही तर ते केक का खात नाहीत ? ' असा वाटेल; पण पुस्तकप्रेमी लोकाना अर्धपोटी राहूनही प्लॅस्टिकचे कव्हर टाकावेसे वाटेल. अर्थात मुखपृष्ठामुळे पुस्तक वाचण्याची गोडी थोडीशी वाढते; पण ते अगदीच आवश्यक आहे अशातला भाग नाही. सपाटून भूक लागलेल्याना बर्फी द्रोणात दिली काय किंवा नक्षाकाम केलेल्या डिशमध्ये दिली काय त्याची चव त्याला सारखीच वाटेल. तसेच डोळस वाचकांना मुखपृष्ठाचे महत्त्व कमीच वाटते. परंतु आपण जसे ज्या व्यक्तीवर प्रेम करतो ते तिच्या दोषासकट करतो तसेच जर पुस्तकाला मुखपृष्ठ असलेच तर पुस्तकप्रेमी त्या पुस्तकाच्या सर्वांगावर प्रेम करतो.

असो. एलाइस मारचॅक ही, प्रख्यात नट मार्लोन ब्रान्डो ह्याची वीस वर्षे सुपर सेक्रेटरी होती तर दुसरी लेखिका लीडा हंटर हिने ब्लेक एडवर्ड्स व ज्युली अॅन्ड्र्यूज यांच्यासाठी बराच वेळ काम केले होते. आणखीन मोठमोठ्या हॉलीवुडच्या नटासाठीही या दोघीनी सेक्रेटरी म्हणून काम केले आहे. या पुस्तकात या दोन्ही बायकानी आपल्या आठवणी व अनुभव दिलेले आहेत. या लेखिका प्रख्यात नटाबरोबर दिवस-रात्र असत त्यामुळे त्याच्या वैयक्तिक जीवनाचे व धंदेवाईक जीवनाचे त्यानी अगदी बारकाईने अवलोकन केलेले आहे या दोघीनो त्याच्या बॉसबरोबर सबंध जग तुडविले आहे त्याच्या घराची व्यवस्था पाहिली आहे. त्याच्यासाठी पार्टीज दिल्या व त्या नटाच्या समस्या काय आहेत ते ऐकून घेतले. त्या नटाच्या बायकापेक्षा या दोन लेखिकानाच या नटांविषयी जास्त माहिती आहे असे या लेखिका म्हणतात. किंबहुना त्या नटाच्या आयुष्यातील एक अविभाज्य घटकच त्या बनून जातात व कधी कधी त्याना नटासारखीच कीर्ती व व्ही. आय. पी ट्रीटमेंट मिळते.

मार्लोन ब्रान्डोविषयी त्याची सेक्रेटरी म्हणते की तो फक्त नटच नव्हता, तर तो इतर अनेक सामाजिक कार्य करीत असे. ब्राडो एकदा UNICEF मधे अॅम्बॅसॅडर होता. तो निग्रोच्या हक्कासाठीसुद्धा सतत लढा देत असे. रेड इंडियन्सच्या हक्कासाठी सुद्धा तो भांडत असे. मार्लोन ब्रांडोने South Sea जवळ टेटियारोआ नावाचे एक बेटच विकत घेतले आहे. या बेटात तो विचार करायला व विश्रांती घ्यायला जाई हे बेट पॉलोनेशिया जवळ आहे. हे बेट मार्लोन ब्राडोने दहा वर्षांच्या शोधानतर विकत घेतलेले आहे. एवढ्या लांब त्याने हॉलीडे रिट्रीट का विकत घेतला असे त्याला 'टाइम' मासिकाच्या पत्रकाराने विचारले असता तो म्हणाला, 'मला खात्री वाटते की मानवजातीचा विनाशकाल जवळ आला आहे. मला असे वाटते की या बेटावर मी व माझे कुटुंब जिवत राहू शकू.' मानवाच्या बिकट परिस्थितीने ब्रांडो हा जणू पछाडलेलाच आहे या बेटावर तो कधीकधी नग्नावस्थेत किनाऱ्यावर चालतो असेही 'टाइम'च्या पत्रकाराने लिहिले आहे. नग्नावस्थेत किनाऱ्यावर भटकण्यामुळे ब्रांडोला एका विलक्षण स्वातंत्र्याचा अनुभव येत असतो असेही तो म्हणाला होता. या बेटावर ब्रांडो वर्षातील सहा महिने राहातो. त्याला तिकडे एकाकी कधीच वाटत नाही. तो बेटावर वाचनही भरपूर करतो. या बेटावर ब्रांडोने एकदा हॉटेल काढण्याचा प्रयत्न केला होता; पण त्यात त्याला पाच लक्ष डॉलर्सचा फटका बसला.

'लास्ट टँगो इन पॅरिस'मध्ये तर त्या फिल्मचा डायरेक्टर बर्नार्डो बर्टोल्युसी याने ब्रांडोला शूटिंगच्या वेळी मॉरिया स्नायडर हिच्याबरोबर खराखुरा संभोग करायला सांगितले होते; पण याला मार्लोन ब्रांडोने नकार दिला. ब्रांडोचा सर्वात आवडता मित्र वॉली कॉक्स हा दिवंगत झाला तेव्हा त्याला एकदम धक्का बसला. ब्रांडोने त्याच्या मित्राच्या अस्थी त्याच्या घरात ठेवून दिल्या आहेत व त्यांच्याशी तो संभाषण करीत असतो. बावन्न वर्षांचा, कपाळ थोडेसे पुढे असलेला, तुटलेल्या नाकाचा हा थोडासा जाड नट मोठमोठ्या लोकाना सुद्धा सत्य त्यांच्या तोंडावर सांगून गलितगात्र करीत असे.

हॉलीवुडमधील सुपरस्टार्स वर्षातून एका किंवा दोनच पिक्चर्समध्ये काम करतात हे वाचून आश्चर्य वाटले.

काही काही सुपर सेक्रेटरीना कोणती कामे करावी लागतात त्याचे मासले या पुस्तकात दिले आहेत. एका सुपरसेक्रेटरीला बॉससाठी 'मार्टीनी' करावी लागत असे. दुसरी एका विनोदी नटाची सुपरसेक्रेटरी होती. त्या नटाला पाच जुन्या बायकाना पोटगी द्यावी लागत असे. त्यामुळे त्याच्या दारावर पैसे घेणाऱ्याची रीघ लागलेली असते. या सुपरसेक्रेटरीला बॉसला बंगेला भोके पाडून त्यातून पळवावा लागत असे ! आणखी एका सुपरसेक्रेटरीच्या बॉसने वाचले होते की वनस्पतीच्या जवळ कामुक भाषा केली तर त्या वनस्पतीची वाढ छान होते. त्यामुळे त्या बॉसने आपल्या सुपरसेक्रेटरीला या प्रकारचे खतपाणी वनस्पतीला

टाकण्यास सांगितले !

मार्लोन ब्रॉंडो, ब्लेक ऐडवर्डस् व ज्युली अॅन्ड्र्यूज हे हॉलीवुडच्या पार्टीजमध्ये मिसळत नसत. ज्युली व ब्लेक हे त्यांच्या प्रिमियर शोला तरी जातात; पण मार्लोन ब्रॉंडो मात्र शूटिंगचा शेवटचा दिवस संपला की आपल्या टॅटीआरोआ बेटाबर प्रयाण करीत असे.

टाहीटीमध्ये ब्रॉंडोने एक मोठी पार्टी दिली ती तिकडच्या ढोल आणि मृदुगाच्या आवाजात पहाटे चांगली ५ पर्यंत चालली.

हॉलीवुडच्या पार्टीजमध्ये किती पैसे उधळले जातात हे या पुस्तकात वाचून माझ्या तोंडचे पाणीच पळाले. फुले, दारू, काव्हीयार ( सामन ( Salman ) व स्टर्जिअन माशाच्या अंड्याला मीठ चोळून काव्हियार हे जठराग्नि प्रदीप्त करण्यासाठी दिले जाते ) यातच कधीकधी तीस हजार डॉलर्स ( जवळजवळ रु. २,४०,००० ) एका पार्टीमध्ये उधळले जातात. या पार्ट्यांची आमंत्रणे फक्त हातांनी दिली जातात. हेरी फिल्ले यांनी एकदा केवळ आमंत्रणपत्रिका देण्यासाठी अमेरिकेहून युरोपपर्यंत विमानाने उड्डाण केले होते ! या पार्टीजमध्ये 'तुम्ही असाल तसे या', 'तुम्ही होता तसे या', 'तुम्हाला हवे तसे या' अशी आमंत्रणे दिली जातात. आता समजा घरी तुम्ही लेगा आणि बनि-यनमध्ये असाल तर असेल तसे या-पार्टीमध्ये तुम्हाला तसेच जायला हवे. नतर तुम्हाला रेड इंडियनचा ड्रेस घालून जायचे असेल तर 'हवे तसे या' या निमत्रणाच्या पार्टीजमध्ये तुम्ही तसे जाऊ शकता.

हॉलीवुडमध्ये पार्टी देणारे हे streakers ( नग्नावस्थेत पळणे किंवा हिंडजे ) भाड्याने ठेवतात व नग्नावस्थेत शरीराला पेन्ट रग लावण्यासाठी पेन्टर्ससुद्धा भाड्याने ठेवतात. एकदा तर एकाने सबध ३ रिंगांची सर्कसच भाड्याने आणली होती !

मार्लोन ब्रॉंडो असल्या पार्टीज्मध्ये क्वचि-तच जातो. मोठमोठ्या हॉटेलमध्ये सुद्धा तो जात नसतो; पण मधेच एखाद्या साध्या हॉटेलमध्ये जाऊन तो कधीकधी विश्रांती घेतो.

या सुपरसेक्रेटरीज्ना नटाच्या कुत्र्याची सुद्धा काळजी घ्यावी लागते. परदेशात हे नट गेले की त्याच्या कुत्र्याना क्वॅरेंटाईनमध्ये ठेवावे लागे. त्यामुळे परदेशात जाताना कुत्री नटाच्या नातेवाइकांकडे किंवा इतर योग्य ठिकाणी ठेवावी लागत. त्या वेळी कुत्र्याची ने-आण करताना विमानाचा उपयोगही केला जातो ! असल्या या श्रीमताच्या चोचल्याबद्दल वाचले की, पुस्तक वाचणे बद करून टाकावेसे वाटते

या पुस्तकावर 'The Super Secs' हे नाव व्हेलव्हेटमध्ये छापले असले तरी आत फक्त भरड माजरपाट भरलेले आहे !

—जे. एन्. पोंडा

– फिनिक्स लायब्ररी


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| 1. | **The Russians** – ( Bestseller – a peep behind the iron curtain ) Hedrick Smith | Rs 12·10 |
| 2. | **W W II** – James Jones ( Best War Story ) | Rs. 11·20 |
| 3. | **My Life** – ( Autobiography ) – Golda Meir By Khushwant Singh | Rs. 15·20 |
| 4. | **Good people bad people** – Edited by Rahul Singh | Rs 6/– |
| 5. | **What do you say after you say hello ?** – Eric Berne ( Psychology ) | Rs. 13/– |

'फिनिक्स' चे सभासदत्व ही आपल्या उच्च अभिरुचिची साक्ष आहे !

- अत्युत्तम पुस्तके
- पुस्तकात महत्त्वाची कात्रणे, लेखकाचे फोटो, सिनेस्टोरी वगैरे
- गाजलेल्या पुस्तकाच्या एकापेक्षा जास्त प्रती.
- दंड वगैरे जादा आकार नाही.

'फिनिक्स एक वैशिष्टचपूर्ण वाचनालय.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव, सदाशिव पेठ पोस्टासमोर, पुणे ३०.

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## ☐ वैद्यकीय प्रवेशाची डोकेदुखी

सध्या महाराष्ट्रात चालू असलेल्या नवीन शिक्षणविषयक प्रयोगाचा आणि त्या निमित्ताने निर्माण झालेल्या अमानुष गोंधळाचा खरा आणि जबर तडाखा इंजिनिअरिंग वैद्यक शाखांतील विद्यार्थ्यांना–विशेषतः वैद्यक शाखेतील–बसणार अशी चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली आहेत. इंजिनिअरिंगच्या प्रवेशाच्या जागा थोड्या का होईना, वाढविल्यामुळे त्याचा प्रश्न (आणि त्याचे दुर्दैवही) थोडाफार कमी झाला असे मानले तरी वैद्यकीय शाखेसाठी धडपडणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल मात्र उत्तरोत्तर जास्तच विदारक होत चालले आहेत

इंडियन मेडिकल असोशिएशनने नुकत्याच एका ठरवाद्वारे महाराष्ट्रातील वैद्यकीय जागा वाढवून देण्याच्या मागणीस विरोध केल्याने विद्यार्थ्यांच्या हलाखीच्या परिस्थितीत धाऊक भर पडली आहे कौन्सिलने घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयामागची त्याची भूमिका अद्याप स्पष्ट झाली नसल्याने विविध कल्पक मडळींनी त्यावर आपले अंदाज आणि मतप्रदर्शन करणे साहजिकच आहे तथापि हे अदाज पाहू जाता, या प्रकरणी एकदरीत थोडा जास्त आणि वेगळा विचार करणे आवश्यक आहे असे दिसते. तेव्हा वैद्यकीय महाविद्यालयातील जागा न वाढविण्यासबंधीचे काही दावे आणि त्याविषयी थोडा वेगळा दृष्टिकोण इथे माडण्याची जरुरी वाटते.

एक महत्त्वाचा दावा असा आहे की सध्या आहे ह्या परिस्थितीत जर वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागा वाढविल्या तर पुरेशा तांत्रिक सोयी अभावी वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा अधिकच घसरण्याची शक्यता आहे आणि वस्तुत सध्या असलेल्या तांत्रिक सोयीदेखील सध्याच्या विद्यार्थ्यांना अपुऱ्याच असल्याने, अधिक जागा वाढविल्यास हा दर्जा पुरताच ढासळेल. आता एका दृष्टीने विचार केल्यास हा मुद्दा अगदीच बिनतोड आहे, पण या मुद्द्याला एक दुसराही पैलू आहे वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जाविषयी एवढा गहजब माजवणारी ही कल्पक मडळी खरोखरीच या दर्जाबाबत इतकी जागरूक असतील तर एक महत्त्वाची गोष्ट त्यांच्या नजरेत नक्कीच खुपणार आणि ती म्हणजे वैद्यकीय प्रवेशाबाबत मागास विद्यार्थ्यांना सध्या देण्यात येत असलेल्या सवलती. या सवलतीमुळे किती तरी कमी गुणवत्ता असूनही कित्येक मागासलेले विद्यार्थी वैद्यकीय वर्गात सहज प्रवेश करू शकतात. तेव्हा दर्जाचाच विचार करू जाता ७०–७२ टक्के गुण मिळवणारे हुशार विद्यार्थी देखील जेव्हा प्रवेशाला नालायक ठरविले जातात, तेव्हा केवळ ५५ टक्के गुण मिळविणारे मागास विद्यार्थी मात्र प्रवेशपात्र ठरविणे अर्थातच चुकीचे आहे यामुळेही वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा घसरणार ही गोष्ट अपरिहार्य आहे तेव्हा या चुकीविरुद्धही या 'दर्जेदार' मंडळींनी आधीच आवाज उठविणे आवश्यक होते, परतु तो उठविला गेला नाही; कारण त्या वेळी त्याना मागासवर्गीयासमोर असलेल्या वेगळ्या आणि अधिक गभीर समस्याची जाणीव होती आणि या समस्यांवर तोड काढण्यासाठी, वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा थोडाफार घसरण्याची शक्यता असून सुद्धा, असाच काही तरी मार्ग काढणे अत्यावश्यक होते साहजिकच डॉक्टरी दर्जावर झालेला हा आघात दुय्यम समजला जाऊन याबाबतीत तो पचविला गेला वैद्यकीय प्रवेशासाठी उत्सुक असलेल्या सध्याच्या विद्यार्थ्यांची समस्यादेखील काही कमी महत्त्वाची समजण्याचे कारण नाही. या समस्येवर तोड म्हणून शिक्षणाच्या दर्जाच्या बाबतीत एक वर्षापुरती तात्पुरती तडजोड स्वीकारण्यालाही नकार दिल्यास, तो त्या विद्यार्थ्यांवर फार मोठा अन्याय होईल आणि विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांपुढची समस्या, त्याच्या चुकीमुळे नव्हे, तर सरकारी धोरणाच्या गलथानपणामुळे निर्माण झाली आहे त्यामुळे तर त्यांच्यावर होणारा हा अन्याय अधिकच तीव्र ठरतो आणि नाही तरी, सध्याच्या डॉक्टरी दर्जाबद्दल सर्वच लोक अगदी समाधानी आहेत असे थोडेच आहे ?

सध्याच्या वैद्यकीय जागा वाढविण्याविरुद्ध दुसरा एक दावा असा आहे – ह्या जागा वाढविल्यास हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या मानाने विद्यार्थ्यांची संख्या फार वाढेल. त्यामुळे दिवसभर विद्यार्थी रुग्णाना तपासू लागल्याने रुग्णाच्या मन स्थितीवर विपरीत परिणाम होऊन त्याच्या बरे होण्याच्या प्रक्रियेस अडथळा निर्माण होईल.' हाही दावा तसा पुरेसा बळकट आहे; परतु याही बाबतीत विद्यार्थ्यांच्या दृष्टीने थोडा वेगळा विचार होणे शक्य आहे. रुग्णाची मन स्थिती बिघडून त्याना बरे व्हायला थोडा उशीर लागेल ही वस्तुस्थिती गृहीत धरली तरी लायकी असूनही वैद्यकीय प्रवेश नाकारला गेल्याने, त्या विद्यार्थ्यांची मन.स्थिती कशी होईल याची कल्पना करावी. रुग्णाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा त्याना होणारा त्रास ही एक मर्यादित काळापुरती अडचण आहे, पण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने मात्र हा त्याच्या आयुष्याचाच प्रश्न आहे. यातला कुठला प्रश्न अधिक महत्त्वाचा यावर सहृदय जाणकारांनीच विचार करावा.

याखेरीज एक महत्त्वाची अडचण म्हणजे जादा विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात स्वतंत्र वेळ द्यावयाचा म्हटला तरीही तज्ज्ञ प्राध्यापकाची अडचणच आहे. आता या मुद्द्याला महत्त्व देणे आवश्यकच आहे, परंतु यावर तोड म्हणून जी योजना काही जाणकारांनी सुचविलेली आहे ती मात्र केवळ विनोदीच

म्हणावी लागेल. ही योजना अशी की जर नवीन महाविद्यालये सुरू करण्यात आली तरच विद्यार्थ्यांची अडचण सुटू शकेल. म्हणजे याचा अर्थ असा की सध्या आहे त्या महाविद्यालयातही जादा प्राध्यापकवर्ग उपलब्ध होऊ शकत नसला तरी नवीन महाविद्यालये सुरू होताच तो उपलब्ध होईल आणि विद्यार्थी सुखी होतील. थोडा तर्कशुद्ध विचार करण्याचा प्रयत्न केला तरी या दाव्यातला फोलपणा लगेच लक्षात येईल.

'इंडियन मेडिकल कौन्सिलने विद्यार्थ्यांना अहितकारक असा निर्णय घेतल्यास सरकार आपल्या अखत्यारीत तो बदलेल' असे एक विधान आपले आरोग्यमंत्री राजनारायण यांनी नुकतेच लोकसभेत केले होते. त्यामुळे चिडून जाऊन कौन्सिलने हा विरोधी कौल दिला असे एक कारण काही मंडळी देतात. आता कौन्सिलच्या बैठकीआधीच असे धाडसी आणि जोशपूर्ण विधान करणे हे राजनारायणांना शोभले का? असा प्रश्न काही मंडळी विचारतात, पण राजनारायण पूर्वीपासून आपल्या विनोदी वक्तव्याबद्दल प्रसिद्ध आहेत. असे असताना त्यांचे हे आव्हान इतके मनावर घेणे कितपत योग्य ठरेल? आणि राजनारायणाशी अशी 'खुन्नस' देण्यापेक्षा विद्यार्थ्यांचे हित पाहाणे अधिक योग्य नव्हे काय?

याखेरीज कौन्सिलच्या या निर्णयाच्या पार्श्वभूमीबाबत इतरही काही कारणे मंडळी देऊ लागली आहेत. महाराष्ट्राबद्दल वाटणाऱ्या आकसातूनच ही मागणी नाकारली गेली. इतर राज्यांनी कौन्सिलच्या सभासदांवर दबाव आणला, महाराष्ट्रीय डॉक्टरांची संख्या आधीच जास्त आहे तेव्हा ती आणखी वाढविल्यास ही परिस्थिती अधिकच बिकट होईल अशी ही कारणे आहेत. अगदी एकदा वाचूनच हसावे इतकी ही कारणे विनोदी आणि बालिश आहेत. त्यातूनही ती खरी असतील तर मात्र दुर्दैवच होय.

अशा रीतीने वैद्यकीय प्रवेशाबाबतचा विद्यार्थ्यांच्या दृष्टीनेही एक वेगळा दृष्टिकोण आहेच. तो इथे मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. अपेक्षा इतकीच, बिचाऱ्या निरपराध हुषार विद्यार्थ्यांवर एवढा जबर जुलूम विनाकारण होऊ नये. इतके असूनही हा जुलूम होणारच असेल तर एक गोष्ट करावी इ. स. १९५९-६० साली महाराष्ट्रात जन्माला आलेली सर्व मुले राष्ट्रीय गुन्हेगार होत असाच एक ठराव करून टाकावा म्हणजे विद्यार्थ्यांवर होणाऱ्या या सगळ्या अन्यायाला एक सबळ कारण तरी मिळेल.

एकूण काय, हा विषय 'टेक इट लाइटली' म्हणून सोडून देण्यासारखा नाही, त्यावर थोडा विचार करणे अत्यावश्यक आहे! □

## □ राजकारणाची वावटळ

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुका आणि कॉंग्रेसचा झालेला पराभव या निमित्ताने जाणवलेल्या काही लक्षणीय घटनांचा आढावा मागच्या एका लेखात मी घेतलाच आहे. अशा रीतीने पराभवाच्या या दुसऱ्या धक्क्यामुळे कॉंग्रेसच्या बड्या नेतेमंडळींची तोंडे बंद झाली असली तरी कॉंग्रेसच्या आघाडीवर सामसूम व सुन्न विषण्णता पसरली असे मात्र नव्हे उलट या पराभवातूनच एका मोठ्या प्रक्रियेची सुरुवात होत आहे या पराभवामुळे उत्तेजित झालेल्या कित्येक कॉंग्रेसी मंडळींना आता एका नवीनच प्रेरणेचा लाभ झाला असून ते आता आपल्या स्वतंत्र बुद्धीने स्वतंत्र मार्ग आक्रमिण्याचा विचार उघडपणे करू लागले आहेत. स्वतंत्र विचाराची अशी बाणेदार मंडळी एकाच वेळी पक्षात अचानक उत्पन्न झाल्याने कॉंग्रेसमध्ये फाटाफूट होऊन तिचे विघटन होणार ही गोष्ट उघडच आहे. त्यानुसार कॉंग्रेसचे तुकडे पडण्यास आता अगदी जोरदार सुरुवात झाली आहे. काही राजकीय निरीक्षकांच्या अंदाजानुसार तर आता अशीच परिस्थिती आणखी काही काळ चालू राहिल्यास अखिल भारतीय कॉंग्रेसपक्षाचे कमीत कमी पन्नास ते बावन्न स्वतंत्रपक्ष बनून ते तालुका आणि जिल्हापातळीवरील राजकारणात अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावू लागतील आणि अशा रीतीने राष्ट्रीय पातळीवरच्या कॉंग्रेस पक्षाचे खरेखुरे नवनिर्माण होऊन तो खरोखरच 'लोकाभिमुख' बनेल.

आपल्याला अभिमानाची गोष्ट अशी की कॉंग्रेसच्या या नवनिर्माणाच्या प्रक्रियेचा शुभारंभ कॉंग्रेसतर्फे होत आहे महाराष्ट्राचे माजी मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांच्या सह इतरही बरेच आमदार या सोहळ्याचे अध्वर्यु आहेत. वस्तुत शंकरराव स्वतः काही कॉंग्रेस सोडणार नाहीत अशी काहींची कल्पना होती. अगदी खुद्द शंकररावांनीच तशा प्रकारचे काही तरी विधान काही दिवसांपूर्वीच केल्याचे आमच्या वाचनातही आले होते तेव्हा कदाचित त्यांनी नुकताच मुख्य मंत्रिपदाचा राजीनामा दिला असल्याने त्यांची मन स्थिती ठीक नसावी असे दिसते; पण आता मन-स्थिती सुधारताच आणि मुख्य म्हणजे विधानसभांच्या निवडणुकांचे निकालही हातात येताच त्यांचा निर्णय पक्का झालेला दिसतो. असा निर्णय कधी ना कधी तरी होणारच याची (शंकररावांना नसली तरी) आम्हाला तेव्हाच खात्री होती, पण कॉंग्रेसश्रेष्ठींना मात्र हा निर्णय बराच धक्कादायक वाटलेला दिसतो. बंडखोर मंडळींचे हृदयपरिवर्तन करून हा अनर्थ टाळण्यासाठी त्यांची बरीच धावपळ उडालेली दिसते मुख्य मंत्री वसंतरावदादा पाटलांच्या मैत्रीचा हात झिडकारला गेला. इंदिराजींची विनंती धुडकावली गेली. यशवंतरावांची शिष्टाईदेखील त्याच मार्गाने जाण्याची लक्षणे दिसत आहेत, पण बंडखोरांची तत्त्वे अगदी ठाम आहेत. कॉंग्रेसमध्ये त्यांना सध्या मिळत असलेली द्वेषमूलक वागणूक, त्यांना पदोपदी जाणवणारा सावत्रभाव, त्यांच्या पूर्वीच्या योजनांवर सरसकट फासला जाणारा हरताळ, महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा निर्माण होत असलेले बड्या शेतकऱ्यांचे वर्चस्व—या सगळ्याच जखमा खोल गेल्या आहेत. त्यातून असे हे घाव झेलून कॉंग्रेसमध्ये राहाण्यातला फोलपणा तर पदोपदी जाणवू लागला आहे. कॉंग्रेसचा त्याग करून तत्त्वाचा डांगोरा पिटायला हीच वेळ अगदी योग्य ही गोष्ट तर सूर्यप्रकाशासारखी स्वच्छ आहे. त्यामुळे ही फाटाफूट आता होणे अगदी साहजिकच आहे कॉंग्रेसकडून मिळणारी सत्तेचो ऊब नाहीशी झाल्यावर आता दुसरीकडे निवारा शोधणेही तितकेच आवश्यक आहे. तेव्हा कॉंग्रेसमधल्या या फाटाफुटीचे विशेष नवल नाही मुख्य मंत्री होताच शंकररावांनी वसंतरावदादांची हकालपट्टी

केली. आता आणीबाणी गेली. वसंतरावदादा आले तेव्हा शंकरराव जाणार हे समीकरणही अगदी स्पष्ट आहे.

खरी गंमत आहे ती आता ही बंडखोर मंडळी पुढे काय करणार याबाबतच्या औत्सुक्यात. या काँग्रेसमधल्या बंडाळीच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या राजकारणात जी धावपळ उडाली आहे ती गंमतीशीर आहे. शे. का प. चे लोक आपला दरवाजा उघडा ठेवून बसले आहेत. जनतामंडळी आपलाही दरवाजा उघडून अगत्य करण्याच्या विचारात आहेत. अशा रीतीने या बंडखोरांसमोर सगळे रान अगदी मोकळे आहे. त्यांच्या कुठल्याही निर्णयाला कधी नव्हे ते एवढे वजन आज प्राप्त होऊन राहिले आहे हे वजन ती मंडळी आता अगदी पुरते आणि जपून वापरणार यात शंकाच नाही. गंमत वाटते ती जनतापक्षाच्या यासंबंधीच्या धोरणाची. सत्तेवर येताना पक्षांतरबंदीचा उद्घोष करीत सत्तारूढ झालेला हा पक्ष. पक्षांतरबंदीसंबधीचा कुठलाही निर्णय घ्यायला त्यांना एवढा वेळ लागावा याचे आश्चर्य वाटते. आता सत्तारूढ पक्ष झाल्यावर या पक्षाकडे कार्यकर्त्यांचा ओघ सुरू होणार ही कल्पना असल्यामुळे याबाबत जनतापक्ष काही तरी ऐतिहासिक निर्णय घेऊन नवीन पायंडा पाडील अशी आमची भाबडी कल्पना. त्यातून वारा येईल तशी पाठ फिरविणारी ही शिडे आपल्या पक्षात घेऊन, जनतापक्ष सरळ दिशेने वाटचाल तरी कशी करणार हा प्रश्नच आहे. या सर्व भारूडभरतीचे जनतावाले जे समर्थन करतात तेही पाहण्यासारखं आहे. 'ही राजकीय शक्तीची 'realignment' आहे' असा त्यांचा दावा आहे अर्थात हा दावाही आम्ही समज शकतो. या अभूतपूर्व लोकसभा-निवडणुकांनंतर काही काळ हा बदल चालणारच; परंतु त्या काळालाही काही निश्चित मर्यादा असावी, ही अपेक्षा. अन्यथा भारतात तर स्वातंत्र्यानंतरची गेली तीस वर्षे राजकीय शक्तीच्या या realignment पेक्षा दुसरे काहीच वेगळे घडू शकलेले नाही. कुठलाही पक्ष धरणे आणि सोडणे ही मातीचा किल्ला करण्या आणि मोडण्याइतकी सोपी आणि तेवढ्याच किंमतीची गोष्ट बनून राहिली आहे. जनतापक्ष याबाबत काही त्वरित हालचाली करील अशी अपेक्षा होती. नाही तर आता महाराष्ट्राच्या आणि इतर ठिकाणच्याही निवडणुका होतील. त्यात पुन्हा काँग्रेसचा पराभव होईल आणि पुन्हा एकदा काँग्रेसवासीय मंडळींना आपल्या काही तत्त्वांची याद होऊन 'political realignment'च्या गोंडस नावाखाली त्यांची 'जनता'कडे धाव घेणे सुरू होईल. ही प्रक्रिया भारतात कधीच न संपणारी आहे. कारण सत्तारूढ पक्षात राहावे ही भारतीय मुत्सद्दी राजकारण्यांची सर्वांत मोठी हौस आहे.

महाराष्ट्रातील या राजकीय realignmentचा निकाल काय लागायचा तो लागो. सर्वसामान्य महाराष्ट्रीय जनतेला त्यात रस नाही. कुणीही सत्तेवर येऊनही तिच्या दृष्टीने फारसा फरकही पडत नाही. दुःख एवढंच आहे की, मराठी माणसांना खरा लायक नेताच उरलेला नाही. उरली आहे ती फक्त विचकट राजकारण्यांची वावटळ, नको तेव्हा उठणारी आणि नको तेव्हा थांबणारी ! □





**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

पृष्ठ ६ वरून

चौकशीसाठी अद्यापी काहीही केलेले नाही ही गोष्ट मला बोलकी वाटते. या दुर्दैवी घटनांना इंदिराजी थोडयाफार जबाबदार असल्याची शंका जर या मंडळीना असती तर मात्र या प्रकरणीही तातडीने चौकशीमंडळ नेमले गेले असते.

**प्रश्न :** मुस्लिम समाजाच्या आर्थिक व राजकीय भलाईसाठी काय करता येईल ?

**उत्तर :** इच्छा असेल तर मार्ग जरूर सापडतो. नवीन सरकारची जर इच्छा असेल तर भरपूर काही करता येईल. इतर गोष्टीचे जाऊ द्या; पण भारताचे माजी राष्ट्रपती मरहूम फकरुद्दीन अलि अहमद याच्या मकबऱ्याचे कामही अद्यापी झालेले नाही. ही गोष्ट तशी लहानच आहे; परंतु मुसलमानाच्या भावना त्यामुळे दुखावल्या जातात असे मला वाटते. कदाचित ही गोष्ट नजरचुकीनेही राहून गेली असेल, पण जिथे भावनात्मक गोष्टी निगडित असतात तिथे जर अशी नजरचूक झाली तर शकेची पाल चुकचुकल्याखेरीज राहत नाही. मरहूम फकरुद्दिनसाहेबाच्या बेगम या दिरंगाईबद्दल चांगल्याच नाराज आहेत आणखी एका छोटया गोष्टीचा उल्लेख मी करू इच्छितो. अगदी अलीकडेच पंतप्रधान मोरारजी देसाई यानी एक मुलाखत दिली होती. आपल्या मुलाखतीमध्ये त्यानी आपण इजेक्शन का घेत नाही याबाबत कारणमीमांसा केली होती. ते म्हणाले–मी शुद्ध शाकाहारी आहे. न जाणो इजेक्शनद्वारा काही असे औषध दिले गेले की, ज्यामुळे माझी शाकाहारी परंपरा खडित होईल. याच भीतीपोटी मला इजेक्शन घेणे नको वाटते.

**प्रश्न :** या विधानामध्ये आक्षेपार्ह काय आहे ? हे तर संपूर्ण व्यक्तिगत स्वरूपाचे विधान आहे ?

**उत्तर :** तुम्हाला ते तसे वाटेल, परंतु आम्हाला मात्र हे विधान विक्षिप्त वाटते. पंतप्रधानानी शाकाहारी असण्यात माझी मुळीच हरकत नाही, परंतु आपल्या शाकाहाराची अशी ढळढळीत जाहिरात करताना असख्य मासाहारी लोकांना काय वाटेल याचा त्यानी विचार करायला हवा. अधिकाऱ्याच्या जागेवर असलेल्या प्रत्येक व्यक्तीने अत्यत जबाबदारीने बोलले पाहिजे. पंतप्रधानानी हे विधान सहज केले असेल; पण पंतप्रधानानी सहज करावयाचे विधानही जबाबदारी ओळखून आणि एका बहुढंगी देशाचे नेतृत्व आपण करीत आहोत याची जाणीव ठेवूनच केले पाहिजे असे माझे मत आहे.

**प्रश्न :** तुम्ही अकारण लहान-सहान गोष्टीना महत्त्व देता असे तुम्हाला वाटत नाही का ?

**उत्तर :** येथे लहान-सहान गोष्टीचा प्रश्नच नाही. शिवाय कोणत्याही देशामधील अल्पसंख्य समाज नेहमीच साशंक असतो हे तुम्ही म्हणजे बहुसख्याकानी विसरून चालणार नाही.

**प्रश्न :** मुस्लिमसमाजाचे हक्क सुरक्षित आहेत असे आपल्याला वाटते का ?

**उत्तर :** आमचे हक्क नक्कीच सुरक्षित आहेत; परंतु तरीही अल्पसंख्यांकांना सतत जागरूक राहावेच लागते. भारतामध्ये आमचा मतदानाचा हक्क हीच आमची फार मोठी शक्ती असून तो जोपर्यंत आम्ही जाणीवपूर्वक शाबूत राखू शकू तोपर्यंत आम्हाला कसलीही भीती नाही. कारण मतदान हे आमच्या हातामधील एक महत्त्वपूर्ण हत्यार असून त्याचा आम्ही गरजेप्रमाणे वापर करू शकतो. □

## □ भारत-रशिया .... ऋणानुबंध

भारत-रशिया स्नेहसंबंधाविषयी काही गोटांमध्ये नाराजी असली तरी या स्नेहसंबधामुळेच आतरराष्ट्रीय पातळीवर आपला किती तरी वेळा बचाव झालेला आहे याचे पूर्ण भान असल्यानेच नवीन परराष्ट्रमंत्र्यानीही भारत-रशिया स्नेहसबंध वर्धिष्णु राहतील अशी ग्वाही दिलेली आहे भारत-रशिया याच्यामधील हे स्नेहसंबध निर्माण कसे झाले याच्या काही आठवणी स्वातंत्र्यानतर परराष्ट्र-मत्रालयाचे सचिव म्हणून काम करणाऱ्या के पी. एस. मेनन यानी नोंदल्या आहेत. १९४७ च्या ऑक्टोबरमध्ये युनोच्या सर्वसाधारण सभेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विजयालक्ष्मी पडित याच्या अध्यक्षतेखाली एक शिष्टमंडळ गेले होते. श्री. के. पी. एस. मेनन हे त्या मंडळाचे सदस्य होते. एक दिवस त्यांना त्या वेळचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू याची तार आली. त्यानी श्री. मेनन यांनी श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांच्या समवेत मॉस्कोला जावे व दोन देशांमध्ये राजकीय सबध चालू करण्यासंबंधी बोलणी करावीत असे सुचविले होते. मेनन यानी ती तार वाचली. मॉस्कोची त्यांना चागली माहिती होती. त्यानी गरजेपुरतेच कपडे बरोबर घेतले होते आणि कडाक्याच्या थडीमध्ये मॉस्कोला जाण्यापेक्षा त्यानी त्याच वेळी तेथे असलेल्या रशियन प्रतिनिधीबरोबर बोलणे करणे अधिक पसत केले. रशियन शिष्टमंडळाचे प्रमुख म्हणून त्या देशाचे त्या वेळचे परराष्ट्रमंत्री श्री. मोलोटोव्ह हे न्यूयॉर्कमध्ये हजर होते. श्री मेनन यानी त्याच्याशी संपर्क साधला. श्री. मोलोटोव्ह यांना ही कल्पना एकदम पसंत पडली. त्यानी सपूर्ण भारतीय शिष्टमडळाला खाना देण्याचे ठरविले आणि भरपूर व्होडका सेल हाताने फिरविल्या गेलेल्या या खान्याच्या वेळीच भारत आणि रशिया याच्या राजनैतिक संबंधाची घोषणा झाली आणि पुढे १३ एप्रिल १९४८ रोजी या निर्णयाची अंमलबजावणीही झाली.

भारत-रशियासंबंधाबद्दल त्या वेळी अनेक नेत्याच्या तसेच वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या मनामध्ये विविध शका असल्याचे नमूद करून श्री. मेनन पुढे लिहितात, मी त्या वेळी परराष्ट्रखात्याचा सचिव होतो. भारत-रशिया याच्यामधील संबध वाढावेत अशी माझी इच्छा होती आणि म्हणून आम्ही भारत-रशिया व्यापारी करार करवून घेतला. या करारामधील एका कलमाप्रमाणे–अनेक रशियन तज्ज्ञ भारतामध्ये येणार होते. या कराराबद्दल नाराज

असलेले एक ज्येष्ठ अधिकारी आणि त्या वेळचे गृहखात्याचे सचिव श्री. एच व्ही. आर. अय्यंगार एक दिवस माझ्या चेंबरमध्ये येऊन म्हणाले, 'के. पी. एस. हे तुम्ही काय चालवले आहे ? रशियन तज्ज्ञाना तुम्ही भारताचे दरवाजे एकदा खुले केलेत की, बघता बघता असंख्य रशियन गुप्तहेर देशात घुसतील आणि देश पोखरून काढतील.' या देवघेवीला त्यांनी विरोध दर्शविला; परंतु अशा स्वरूपाची देवघेव व्हावी असे स्पष्ट मत मी नोंदविले. नेहरूंनी माझ्या धोरणाचा पाठपुरावा केला आणि असंख्य रशियन तज्ज्ञ या देशामध्ये आले. त्यांच्यावर आपल्या पोलिसखात्याचे चागले लक्ष होते; परंतु एखाद-दुसरा अपवाद वगळता त्यांनी हेरगिरीचा प्रयत्न केल्याचे आढळून येत नाही. उलट त्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा देशाला भरपूर फायदा झाल्याचेच आढळून येते.

क्रेमलिनमधील एका शानदार पार्टीची आठवण नोदवून श्री. के. पी. एस. मेनन यानी या लेखाचा समारोप केला आहे. कै. पडित नेहरू यांच्या स्मरणार्थ रशियाचे त्या वेळचे पंतप्रधान श्री बुल्गानिन यानी एक खाना आयोजित केला होता. त्या वेळी बोलताना ते म्हणाले होते, 'आम्ही मित्र पारखून घेतो. एखाद्याला आम्ही आमचा मित्र मानला की, आम्ही रशियन लोक त्याचा पिच्छा शेवटपर्यंत सोडीत नाही भारताला आम्ही आमचा मित्र मानला आहे आणि म्हणूनच पतप्रधान नेहरूंना मी असे आश्वासन देतो की, या मैत्रीची कास आम्ही कधीच सोडणार नाही !' स्नेहाची अशी उबदार साथ आणि तीही त्याना आस्था असलेल्या रशियाकडून मिळाल्याने पंडितजी खूष झाले होते. त्यांनी आपल्या भाषणामध्ये बुल्गानिन यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, त्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले आणि भाषणाच्या शेवटी बुल्गानिन यांच्याकडे वळून ते म्हणाले की, 'आत्ताच तुम्ही मित्राच्या आणि शत्रूच्या गोष्टी केल्यात; परंतु खरं सांगू आम्हा भारतियाना मुळी शत्रूच नसतात. कारण शत्रू निर्माण होतील असे वर्तन आमच्या हातून होतच नाही !' त्यावर बुल्गानिन मध्येच म्हणाले, 'दुसऱ्या कोणी शत्रुत्वाचे वर्तन केले तर ?' शब्दामध्ये उत्तर न देता नेहरूंनी हसून वेळ साजरी केली; परतु पुढे १९६२ साली चीनने हल्ला केला त्या वेळी त्याना बुल्गानिनने विचारलेल्या प्रश्नाची याद आली. □

## □ पंतप्रधान आणि पत्रकार

फार पूर्वी म्हणजे पडित नेहरूंच्या जमान्यामध्ये पंडितजी दर महिन्यातून एकदा दिल्लीमधल्या पत्रकाराना भेटत असत. पुढे इंदिराजींनी ही प्रथा जवळजवळ बदच पाडली. वर्षातून एखाद्या वेळीच त्या पत्रकाराना भेटत असत. मोरारजीभाईंनी जवाहरलाल-जींच्या जमान्यामधील प्रथा तर पुन्हा सुरू केली; परतु पत्रकाराशी वागण्याची त्यांची पद्धत मात्र विक्षिप्त असल्याची तक्रार अनेकानी केली. 'ऑर्गनाइझर' या आणीबाणीच्या काळामध्ये बंद पडलेल्या आणि आता पुन्हा कार्यक्षम असलेल्या साप्ताहिकाचा प्रतिनिधी म्हणतो की, पतप्रधानांनी पत्रकाराशी जास्त समजूतदारपणे वागणे आवश्यक आहे. मोरारजीभाईंनी पंतप्रधानपद स्वीकारल्यापासून आतापर्यंत तीन पत्रकारपरिषदा घेतल्या. त्यातील अगदी अलीकडील पत्रकारपरिषदेचा दाखला देऊन तो म्हणतो– मोरारजीभाईंच्या पत्रकारपरिषदांपासून अपेक्षित ती माहिती मिळत नाही आणि पंत-प्रधानांच्या ताठर धोरणामुळे काही वेळा अकारण कडवटपणा निर्माण होतो. आपल्या विधानाच्या समर्थनार्थ ऑर्गनाइझरच्या प्रतिनिधीने काही दाखलेही दिले आहेत.

संबंधित पत्रकाराने आपला प्रश्न पूर्णपणे विचारण्यापूर्वीच पंत-प्रधान बोलायला प्रारंभ करतात त्या वेळेपर्यंत त्याच्या प्रश्नाचे टोक स्पष्ट झालेलेच नसते काही वेळा विचारण्यात आलेल्या प्रश्नावर ते अकारण विक्षिप्त प्रतिक्रिया व्यक्त करतात तर काही वेळा विचार-णारालाच उलट प्रश्न विचारीत सुटतात. त्यामुळे पतप्रधानांना प्रश्न विचारावेत तरी कसे असा उलट प्रश्न पत्रकाराना पडतो. अदाजपत्रकासबधी बोलताना एक पत्रकार म्हणाला की, 'अंदाजपत्रक निराशजनक आहे' या विधानावर पंतप्रधानाची प्रतिक्रिया अशी की ही निराशा तुमच्या मनात आहे ती तुम्ही काढून टाका. तुम्हाला कोठेही निराशा आढळणार नाही. वास्तविक पतप्रधान अदाज-पत्रकाबाबत काही बोलतील अशी अपेक्षा होती; परतु ते अर्थशास्त्रा-कडून तत्त्वज्ञानाकडे क्षेपावले. दुसऱ्या एका पत्रकाराने प्रश्न विचा-रला की, आपले मत्रिमंडळ आपण कधी पूर्ण करणार ? पतप्रधानांनी उत्तर दिले– या गोष्टीबद्दल तुम्हाला एवढी उत्सुकता का ? तुमच्या-पैकी कोणीही मंत्रिमंडळाच्या वाढीव जागेसाठी उमेदवार नाही. एवढे ताशेरे झाडल्यावर ते म्हणाले–योग्य वेळेमध्ये मी हे मंत्रिमडळ-विस्ताराचे काम पूर्ण करीन. पतप्रधानाच्या उत्तराचा रोख लक्षात घेतला की असे वाटते की, ज्यामध्ये पत्रकाराचा व्यक्तिगत हित-सबध गुतलेला आहे अशाच विषयावर त्याने प्रश्न विचारावेत काय ? रगत म्हणा अथवा तापत म्हणा; परंतु पुढे सरकत अस-लेल्या या पत्रकारपरिषदेमध्ये पुढचा प्रश्न आला की पश्चिम बगालमध्ये जर मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षाने आमत्रण दिले तर जनतापक्ष तेथील मत्रिमडळामध्ये सहभागी होईल काय ? काही तरी साधे सरळ उत्तर अपेक्षित होते; पण ते देण्याऐवजी पंत-प्रधानांनी विचारणा केली– 'हा प्रश्न विचारण्याचा अधिकार काय ?' आता अवती–भवती घडणाऱ्या राजकीय घटनांबाबर प्रश्न विचारायचे नाहीत, तर मग विचारायचे तरी काय ? एखादा प्रश्न विचारण्यासाठी पत्रकाराला कोणाच्या परवान्याची– अथवा अधि-काराची काही आवश्यकता असते काय ? असा प्रतिप्रश्न या संदर्भात विचारावसा वाटतो पंतप्रधान कॉमनवेल्थ परिषदेला हजर राहून आलेले होते इदी अमीन येणार की नाही येणार. यावरून बरेच वादळ उठले होते म्हणून एका पत्रकाराने विचारले की, कॉमनवेल्थ परिषदेला येणार येणार म्हणून गर्जना करणारा पाहुणा न आल्याने चुकल्यासारखे वाटले का ? पण प्रश्नाला असलेली विनोदाची डूब लक्षात न घेता पतप्रधान म्हणाले, तुम्ही कोठे चुकला होतात की काय ते मला माहीत नाही; परतु मला मात्र कोणाची भेट घ्यायचे राहून गेले असे वाटले नाही. मोरारजीभाई अलीकडेच इंदिराजी पतप्रधान असताना जेथे राहात असत त्या १ सफदरजंग-रोड निवासस्थानामध्ये राहावयास गेले आहेत. १ सफदरजंगरोड हे

इंदिराजींचे निवासस्थान होते ह्या संदर्भ लक्षात ठेवून एका पत्रकाराने विचारले, 'सर, हे नवीन निवासस्थान आपल्याला सुखावह वाटते का?' वास्तविक या प्रश्नाला थोडीफार विनोदाची डूब देऊन पुढे जाता आले असते; पण पंतप्रधान पुन्हा तत्त्वज्ञानाकडे वळले आणि म्हणाले, 'माझे काय मी सर्वत्र समाधानी असतो. अगदी इथे या पत्रकारपरिषदेमध्येही मी पूर्ण समाधानी आहे. कदाचित तुम्ही थोडेफार अस्वस्थ असाल; परंतु मी मात्र अगदी पूर्ण समाधानी आहे' समजा, काही विनोद करता नाहीच आला तर मी सर्वत्र पूर्ण समाधानी असतो, एवढे उत्तर देऊन भागण्यासारखे होते; पण काहीही कारण नसताना पत्रकारांना डिवचण्यात मोरारजीभाईंना काय आनंद मिळतो ते समजू शकत नाही. आपण बॉक्सिंगच्या रिंगणामध्ये उतरलो आहोत आणि समोरचा पत्रकार हा आपला शत्रू आहे असे समजून ते हल्ला चढवितात. कधी अकारण उपहास करतात, तर कधी वेडावाकडा प्रतिप्रश्न विचारतात. एकाने विचारले की, 'आणीबाणीमधील अतिरेकी प्रकाराची चौकशी करण्यासाठी जी चौकशीसमिती नेमण्यात आलेली आहे तिला अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळत नाही हे खरे काय?' या उमेट प्रतिप्रश्नाला त्याने उत्तर दिले की, 'चौकशीमंडळाशी संबंधित असलेल्या माणसाकडून मला ही माहिती मिळाली.' त्यावर पंतप्रधानानी पुन्हा प्रश्न केला की, 'चौकशीमंडळाशी तुम्ही खाजगी सल्लामसलत केली होती काय?' आता पतप्रधान जर साध्या सरळ प्रश्नाला असे उगाच फाटे फोडायला लागले तर पत्रकार काय करणार?

पंतप्रधानांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की विचारण्यात आलेला प्रश्न जबाबदारीने विचारण्यात आलेला असतो आणि म्हणूनच वस्तुस्थितीवर आधारलेले त्याचे उत्तर व्यवस्थितपणे देण्यात यावे एवढीच विचारणाराची माफक अपेक्षा असते. समजा, एखाद्या प्रश्नाला उत्तर द्यायचे नसले तर 'नो कॉमेन्टस' असे म्हणून त्याना सहज पुढे सटकता येते. एखादा हलकाफुलका विनोद केला तर त्यालाही कोणी हरकत घेणार नाही; परंतु पत्रकाराना अकारण दुखविण्याचा पंतप्रधानांनी सपाटा चालविला तर त्याचे मात्र विपरीत परिणाम होतील. वास्तविक वस्तुस्थिती अशी आहे की, गुदमरवून टाकणाऱ्या आणीबाणीच्या पर्वातून सुटलेल्या पत्रकारांना जनतापक्षाबद्दल फार आपुलकी आहे– ममत्व आहे आणि तरीही जनतापक्षाचे पंतप्रधान पत्रकाराशी इतक्या कडवटपणे का वागतात हे समजू शकत नाही. □

## □ साधा प्रवास जास्त कटकटी....

पंतप्रधानांनी निर्णय घेऊन टाकला की प्रवास करावयाचा तो सर्वसाधारण विमान–वाहतूक–सेवेचा फायदा घेऊनच. स्वत.साठी विमानदलाचे विमान फिरविण्याची जुन्या पतप्रधानांची परपरा सोडून देण्याचे मोरारजीभाईंनी ठरविले. पतप्रधानांचा निर्णय चांगला, या निर्णयामागील हेतूही चांगला आणि तरीही पतप्रधानांच्या या साध्या प्रवासातून अनंत कटकटी निर्माण झाल्या. अगदी अलीकडेच पंतप्रधान कॉमनवेल्थ–परिषदेसाठी लंडनला गेले होते. दिल्लीच्या स्टेटस्मन या वृत्तपत्राने या प्रवासाचा जो तपशील दिला आहे तो पाहता पतप्रधानांनी सर्वसाधारण वाहतूकव्यवस्थेचा फायदा घेत प्रवास करणे फारसे सुखावह नाही असेच म्हणावे लागेल.

कॉमनवेल्थ–परिषदेला हजर राहण्यासाठी पतप्रधान एअर–इंडियाच्या बोइंग ७०७ या नियमित सेवेमधील विमानातून गेले. हे विमान दिल्ली–ॲमस्टरडॅम असा प्रवास करते. या विमानातून पतप्रधान जाणार म्हणून पोलिसखात्याने उतारूंच्या यादीची चाळणी केली. या नसत्या कटकटी नकोत म्हणून उतारूंनी दुसऱ्या विमानाने प्रवास करणे पसत केले. परिणामी–अर्धे विमान मोकळे झाले! एअर–इंडियाचे हे विमान तेहरान येथे कधीच थांबत नाही; परंतु पतप्रधान मोरारजीभाई यांना इराणच्या शहाशी बोलणी करणे शक्य व्हावे म्हणून तेहरान येथे विमान थांबविण्यात आले नंतर विमान ॲमस्टरडॅमला जाण्याऐवजी सरळ लडन येथे गेले. ॲमस्टरडॅमची तिकिटे काढलेल्या उतारूंना लंडनची फुकट सफर झाली. अर्थात विमान–प्रवास करणाऱ्या लोकांना वेळेचे महत्त्व अधिक असते ही गोष्ट लक्षात घेतली गेली नाही –लंडनहून या सर्व उतारूंना कोणताही जादा आकार न घेता ॲमस्टरडॅम येथे पोचवावे लागले. एक समाधानकारक विमानसेवा असा एअर इंडियाचा लौकिक आहे; परंतु या दिल्ली–ॲमस्टरडॅम प्रवासाचा ज्या उतारूंनी अनुभव घेतला त्यांचे एअर इंडियाबद्दल काही फारसे चांगले मत झाले नाही. शिवाय आर्थिक नुकसान झाले ते वेगळेच! विमानाने प्रवास करणाऱ्या उतारूंमध्ये पंतप्रधान असल्याने या नियमित विमानाच्या पाठोपाठ एक स्टँड–बाय विमान पळवावे लागते. समजा काही कारणाने–मुख्य विमान पुढे जाऊ शकले नाही तर या स्टँड बाय विमानाचा वापर करण्यात येतो. एअर इंडियाच्या सुदैवाने याच वेळी दुबईला जाणारे एक विमान उपलब्ध होते, ते स्टँड बाय म्हणून वापरण्यात आले. पतप्रधानाना घेऊन जाणाऱ्या विमानाने उड्डाण केल्यानंतर एक तासाने या विमानाने उड्डाण केले. या दौऱ्याच्या वेळी पंतप्रधानाच्या चिरजिवांना थोडीफार सवलत देण्यात आली. आपल्या पिताजीबरोबर चिरंजीव कांतीभाई देसाई हे पण दिल्लीहून प्रवासाला निघाले. त्याना ॲमस्टरडॅमला जायचे होते. त्याप्रमाणे त्यांच्याजवळ तिकिट होते; परतु त्यांनी लंडनलाच राहण्याचे ठरविले. एअर इंडियाने त्यांच्याजवळून ॲमस्टेरडम ते लंडन हे भाडे घेतले नाही. पतप्रधानाचे चिरंजीव म्हणून हे सौजन्य त्याना दाखविण्यात आले. पतप्रधान प्रवास कशाही पद्धतीने करणार असले तरी त्यांना सरक्षणावाचून थोडेच पाठविणार? अगदी स्वत. मोरारजीभाईंनी जरी सांगितले की संरक्षणव्यवस्था किमान असावी, तरीही ज्यांच्यावर पतप्रधानांच्या संरक्षणाची जबाबदारी असते त्यांना सतत जागरूक राहावेच लागते. प्रवासामध्ये तर ही जबाबदारी जास्तच वाढते आणि म्हणूनच सरक्षणव्यवस्था सांभाळणाऱ्या मंडळींना दोष देता येणार नाही. ज्या दिवशी पंतप्रधानानी विमानाने प्रस्थान ठेवले, त्या दिवशी जे भाग्यवंत प्रवासी त्यांच्याबरोबर प्रवास करणार होते त्याना या संरक्षणव्यवस्थेच्या सव्यापसव्याला तोंड द्यावे लागले. पतप्रधान सोबत प्रवास करणार आहेत, याचे भारतीय प्रवाशांना कदाचित थोडेफार अप्रूप वाटेल आणि त्या पोटी ते थोडाफार त्रास सहनही करून घेतील;

परंतु आंतरराष्ट्रीय वाहतुकीमध्ये एअर–इंडियाने प्रवास करणारे उतारूही असतात त्याना मात्र या साऱ्या गोष्टींची विलक्षण तकलीफ झालेली असणार हे सरळच आहे पंतप्रधान पॅरिसमार्गे परत आले त्या वेळीही परदेशीय प्रवाशांना असाच वैताग आला. उतारू फार नव्हते म्हणजे उपलब्ध नव्हते अशातला भाग नव्हे तर भारतीय पंतप्रधान असलेल्या एअर इंडियाच्या जम्बो विमानातून प्रवास करण्याची त्याची इच्छा नव्हती. त्यामुळे ३४२ उतारू घेऊ शकणाऱ्या या विमानातून केवळ १५० उतारूच प्रवास करीत होते! लंडन येथे ज्या वेळी विमान काही वेळ थांबते त्या वेळी उतारूंना–करमुक्त खरेदी-केंद्राला भेट देता येते. सर्वसाधारणपणे ही सवलत सर्व विमान-कंपन्यांच्या सर्व प्रवाशांना देण्यात येते. परंतु संरक्षणव्यवस्थेचे निमित्त पुढे करून ही सवलत नाकारण्यात आली. पॅरिसला विमान थांबणार नव्हते. कारण पॅरिसला ते कधीच थांबत नाही. परंतु भारतीय पंतप्रधानाच्या सोयीसाठी ते पॅरिस येथे थांबविण्यात आले आणि त्याचे सहकारी विमानतळ सोडून जाईपर्यंत अन्य उतारूंना खाली उतरू देण्यात आले नाही. विमान दिल्लीला पोचण्यास नेहमीच्या वेळेपेक्षा तीन तास उशिर झाला आणि एअर इंडियाच्या अधिकाऱ्यांना प्रवाशांची बडबड ऐकून घ्यावी लागली या गोष्टी पंतप्रधानाच्या देशाबाहेरील प्रवासाबाबतच दिसून येतात असे नव्हे. देशांतर्गत प्रवासाच्या वेळीही बरोबरच्या उतारूंना संरक्षणव्यवस्थेमुळे होणारा त्रास आणि पर्यायी विमानाची इंडियन एअर लाइन्सला करावी लागणारी व्यवस्था, यामुळे उतारू आणि वाहतूकव्यवस्था या दोन्ही बाजू संत्रस्त होतात.

या सगळ्या गोष्टी पंतप्रधानांना कदाचित माहितीही नसतील. सर्वसाधारण वाहतूकव्यवस्थेचा लाभ घेण्यामागे त्यांचा उद्देशही चांगलाच आहे आणि तरीही या कटकटी निर्माण होताना दिसतात. अर्थात सर्वसाधारण जनतेला देशाचा पंतप्रधान विशेष विमान-सवलतीचा फायदा न घेता प्रवास करतो याचे कौतुक जरूर वाटते· तथापि व्यावहारिक आणि आर्थिक पातळीवर मात्र ही योजना फारशी स्वागतार्ह वाटत नाही ही योजना खरोखरच यशस्वी करण्याची इच्छा असेल, तर किमान पर्यायी विमानव्यवस्थेला फाटा द्यावा असे सुचवावेसे वाटते. संरक्षणाबाबत मात्र पूर्ण दक्षता घेणेच हितावह आहे. □

---

चित्रपट

# चोमाना दुडी

## असा एक म्हातारा होता

**अशोक प्रभाकर डांगे**

असाही एक म्हातारा होता ज्याला,
आदी होता अंत होता.
माणूस म्हणून जन्माला येऊन जो,
पशू म्हणूनच जगत होता.
असाही एक म्हातारा होता जो,
उजाडताही गुलाम होता आणि,
मावळताही गुलामच होता.
असाच एक म्हातारा होता जो,
आभाळ कधी मागत नव्हता पण आपल्या,
फाटलेल्या आभाळाला न चुकता,
अस्तर घालू पहात होता,
असा एक म्हातारा होता. ज्याला स्वत ची,
जीभ असून शब्द नव्हता.
तोंड असून घास नव्हता,
असा हा म्हातारा
आयुष्याच्या गुत्त्यात फसला होता.
काळाच्या हाकेहाकेबर त्याला
दुःख नावाच्या एका ताडीचा एकेक घोट
बळेच गिळावा लागत होता.
त्याचा एक मुलगा एका पोरीपायी धर्मभ्रष्ट झाला.
त्यानं पहिला घोट गिळला.
त्याचा दुसरा मुलगा अकालीच तडफडून मेला
त्यानं दुसरा घोट घेतला.
त्याचा आणखी एक मुलगा तळ्यात बुडाला.
त्यानं तिसरा घुटका घेतला.
त्याच्या लाडक्या पोरीनं व्यभिचार केला.
दु खाच्या ताडीचा हा अखेरचा घोट मात्र
त्याला पचवता आला नाही.
तो चालता चालताच कोलमडला.
भवितव्याचा डमरू त्यानं बडव
बडव बडवला.
आणि आपल्या
आयुष्याचा घडा सरळ फोडून
टाकला.

असा हा एक अफलातून म्हातारा. 'चोमाना दुडी' नावाच्या एका भन्नाट चित्रपटात तो आपल्याला भेटतो. चोमाना दुडीचा हा नायक त्याच भिकार परंपरेचा पुत्र आहे जी माणसांना गुलाम म्हणून राबवते. दुसऱ्याच्या शेतात तिसऱ्यासाठी रावणारा हा माणूस चांगल्या चार–पाच पोरांचा बाप आहे; पण त्याचं सारं जिणं बांधलंय एका क्रूर जमिनदाराच्या दावणीला. स्वाभाविकच त्याची सारी मुलं परिस्थितीची मांडलिक होऊन बसलीयत

पिकल्या केसांच्या, खोल डोळ्यांच्या आणि वाळक्या देहाच्या ह्या माणसाचं एकच स्वप्न आहे. हे स्वप्नदेखील तसं फारसं महाग नाहीयेय. त्याला हवाय भूईचा एक चतकोर तुकडा. ह्या जगात स्वत च नाव लावता येईल अशी सतेज भुई त्याला हवी आहे, पण हा एक गुलाम आहे गुलामाची स्वप्नदेखील गुलाम असतात. आशा निष्फळ ठरतात आणि इच्छा वांझ रहातात. स्वतःच्या मालकीची जमीन मिळवण हेच चोमाच्या आयुष्याचं अवघ उद्दिष्टच होऊन राहिलय. तो मालकापुढे पदर पसरतो. भीक मागतो. जमीनदार पण बेरकी. तो आपल्या म्हातारीला साकड घालतो. तिचं उत्तर अचूक नेमाला धरून. 'चोमा अस्पृश्य आहे. अस्पृश्याना स्वतःसाठी जमीन कसायचा मुळीच अधिकार नाही.

परंपरेची मढी वाहणारी माणसं चोमाच्या इच्छांना बाहेरची वाट दाखवताना धर्माच्या विटक्या पदराखाली भ्याडपणे दडून बसतात. अस्पृश्यतेचा शाप उरी बाळगणारा चोमा ताडीचा गुत्ता गाठतो. पाणी न घातलेली, 'पाणी घातलेली पितो. झोपडीत परततो. करवटीतून पेज पितो आणि झोपलेल्या पोरांना तुडवत तुडवत भुईला पाठ टेकतो.

चोमाचा संसार तसा मोठा. चार मुलगे, एक मुलगी बापू नावाचा कुत्रा; पण ह्या सर्वांहून त्याला प्रिय असते ती त्याची दुडी. सुख असो, दुःख असो. आपल्या आयुष्यात जय-पराजयाचा प्रत्येक क्षण तो दुडी वाजवूनच साजरा करतो. ह्याची पोर त्या तालावर नाचतात आणि पोरगी सुराचा फेर माडते, गाते.

आणि तेवढ्यात कॉफीच्या मळ्याचा मॅनेजर येतो. कर्जाची मागणी करतो. नाही तर तुला मळ्यावर खडून द्यायला यायला लागेल असा चोमाला इशारा देतो. म्हातारा चोमा आपल्या दोघा तरुण पोराना पुढे करतो. बापाचं कर्ज फेडायला ही पोरं बाहेर पडतात. कॉफीच्या मळ्यात राबायला लागतात. परिस्थितीचे डोळे वटारू लागतात. चोमाच्या भरल्या संसाराचे तीनतेरा वाजतात. चोमाचा एक मुलगा गुरुवा मेरी नावाच्या एका ख्रिश्चन पोरीच्या प्रेमात सापडतो आणि कॉफीच्या मळ्यावरचं काम सपताच तिच्याबरोबर पळही काढतो. थोरला चानीया त्याला विरोध करतो. बापाच्या कर्मठतेचा धाक घालतो, पण अपयशी होऊन एकटाच घरी परत येतो. आठ महिने कॉफीच्या मळ्यात मुलांना राबवूनदेखील चोमाच कर्ज फिटलेलं नसतं. त्यान जिवापाड जपलेली वाडवडलाची पुण्याई एक पोरगा धुळीला मिळवतो. तर ती जपू पहाणारा दुसरा मुलगा चानीया श्रम आणि रोगराईपायी घरी आल्या-आल्याच मरण पावतो.

चोमा नावाच्या माणसाच्या शोकांतिकेला खऱ्या अर्थाने सुरुवात होते. परिस्थितीचे ढग अकाली दाटून येतात; पण हा पीळदार म्हातारा आपला आग्रह सोडायला तयार नसतो. तो पुन्हा एकदा जमीनदाराची करुणा भाकतो. त्याला जमिनीचा एक तुकडा हवा असतो आणि अशा अनेकांच्या अनेक इच्छाचे गळे घोटून अस्तित्व टिकवणारा जमीनदार ते मानायला निश्चितच तयार नसतो.

चोमा मालकावरचा राग बैलावर काढतो. त्यांना बडबडव बडवतो. आवडती ताडी ढोसतो आणि झोपलेल्या पोराना उठवून नाचायला उभा करतो. पोरीला गायला लावतो आणि आपल्या पुडीतून करुण शब्दाचं तांडव उभारतो आणि सारं रान सारा अधार थरारवून सोडतो.

कॉफीचा दुसरा सिव्हन मॅनेजर न चुकता दारात उभा राहतो. आता कर्ज खडायला चोमाची लेक बाहेर पडते. आपल्या धाकट्या भावाला-निलाला-बरोबर घेऊन ती मळ्याची वाट धरते आणि व्हायचं तेच होत. मॅनेजर मिन्गेला पोरीला अचूक जाळ्यात पकडतो आणि ती बिचारी त्याला सरळ सरळ शरण जातेदेखील; पण यापुढचा प्रकार मात्र चागला नसतो मळ्याचा गोरा मालक बेलीवर बलात्कार करतो आणि त्याच अधाऱ्या रात्री बेली फाटक्या कपड्यानी आणि घायाळ शरिरानं घराकड पळ काढते. चोमाचं कर्ज आता चुकत फिटलेलं !

चोमा आनदान उधाणतो. आपल कर्ज चुकत करण्याचा पोरीचा पराक्रम तो साजरा करतो लोकाना ताडी पाजतो. स्वत ही पितो आणि आनंदात बुडून जातो त्याचा झमडा मात्र चालूच असतो. ह्या एका गुलामाचा त्याच्या मालकाशी लढा असतो. आपल्या मुलीचं लग्न लावण्यासाठी आणि त्यातूनच आपल्या एकुलत्या एक स्वप्नाच्या परिपूर्तीसाठी त्याला जमीन हवी असते. याही वेळी मालकाचा नकार अटळ ठरतो

दैव मात्र चोमाची पाठ सोडायला तयार नसत. आता त्याचा तिसरा मुलगा निला तळ्यात बुडून मरतो. काठावरचे ब्राह्मण बघ्यासारखे तो मृत्यू पहात रहातात. कारण चोमा आणि त्याचा मुलगाही अस्पर्श ठरतो. त्यामुळे त्याला वाचवायला कोण पुढे होणार ? परिस्थितीची ही क्रूर थट्टा असते आणि चोमा नावाचा गरीब माणूसच तिचा बळी ठरतो.

चोमा आता वैतागतो परिस्थितीला शरण जातो धर्म बदलल्यास जमीन मिळण्याच्या एका ख्रिस्ती मित्राच्या आमिषाला अखेर बळी पडतो धर्म बदलायला निघालेल्या "चोमाची पावल नेमकी देवीच्या देवळापाशीच अडखळतात. देवळाजवळही जाण्याचा हक्क नसलेला तो अस्पृश्य त्याच देवळातल्या देवीचा कौल मात्र मानतो. आपल्या मनाच्या तळात दडून बसलेल्या खोट्या भावनांना चोमा बळी जातो. धर्म बदलायचं नाकारून तो घरची वाट धरतो.

दैवाचा डमरू वाजतच असतो. चोमा घरी येऊन पाहतो तर त्याची लाडकी मुलगी कॉफी-मळयाच्या मॅनेजरशी, मिन्गेलाशी प्रेमचाळे करण्यात मग्न झालेली चोमाच्या साऱ्या आशा कोलमडतात. इच्छा पराभूत होतात. एका अनामिक संतापान तो बेलीचा गळाच घोटू पाहतो उरल्यासुरल्या पोराला बडवतो

चोमा नावाचा म्हातारा हरलेला असतो. आयुष्यभर उरीपोटी जपलेल जमिनीचं ते स्वप्न निष्फळ ठरत जन्मापासून जपलेला अस्पृश्यतेचा शाप जन्मभर हात धुऊन मागे लागतो आणि वाडवडिलानी राखलेला श्रद्धाचा वारसा परिस्थितीच्या संदर्भात राख होतो.

चोमा नावाचा सरळ, संसारी म्हातारा आता थाबायला तयार नसतो तो नागराला बैल जोडतो मालकाचीच जमीन स्वतःची असल्याच्या भावनेन नागरून काढतो. मग बैलाना, ते जिथे एके काळी सापडले, त्याच रानातल्या जागी नेऊन सोडून देतो घरी येतो नागर मोडून-तोडून टाकतो. त्याचे अवशेषदेखील जाळून टाकतो त्याची दोन पोर भेदरून पाहत असतात चोमा झोपडीत जातो. कवाडी बद करतो. आपली आवडती दुडी काढतो. बडबडब बडबतो तो हारतो. दुडी फुटत नाही. चोमा नावाचा म्हातारा मरून गेलेला असतो.

असाच एक म्हातारा होता.
त्याला आदी होता अत होता.
तो सुखाच्या पिंडाला कधी शिवला नाही
आणि दुःखाला पाठ देऊन पळाला नाही.
असाही एक म्हातारा होता,
ज्यान आपल्या श्रद्धाचा वसा कधी टाकला
नाही.
माणूस म्हणून तर तो कधीच
उतला नाही, मातला नाही.
असाच एक म्हातारा होता,
जो कधी उगाचच वाकला नाही.
रडला नाही भेकला नाही.
पण सर्वस्वाच्या पणात हरताच
मोडल्यावाचून राहिला नाही.

□

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजरातेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १५ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १६ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १७ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १८ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| १९ | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २० | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |
| २१ | लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २० – ०० |

**आगामी**

| | |
|---|---|
| प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे / श्री. ग. माजगावकर |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे |
| सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति आ.) |
| संध्याकाळ | गजानन जागीरदार (दु. आ.) |
| शतपावली | रवींद्र पिंगे (दु. आ.) |
| टॉलस्टॉय - एक माणूस | सौ सुमती देवस्थळे (दु. आ) |
| मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ९।७।७७ ते १५।७।७७

**मेष : त्रास कमी होईल**

सुखस्थानी शनीबरोबर बुध आला आहे. मन सतत शंकाकुल राहील. व्यग्र राहील. तरी पण आठवडा प्रगतीला पोषक आहे. महत्त्वाच्या घडामोडी घडणार आहेत. त्यामुळे तुमचे महत्त्व वाढेल. नोकरीत नव्या कामाची जबाबदारी घ्यावी लागेल. तेथे अधिकार वाढतील. एखादी उच्चपदावरील व्यक्ती तुमच्या सहवासात येईल. तिच्यापासून फायदा होईल. जमीन वा इतर स्थावराची समस्या सुटेल. पैसा मिळेल; पण बचतीची इच्छा मात्र पुरी होईलच असे नाही. ज्यांची तब्येत नाजुक आहे त्यांनी तब्येतीला जपणे आवश्यक आहे. लॉटरीपासून लाभ होईल. बेकाराना आश्वासन मिळेल. प्रवास होईल. शुभ दिनांक १०–११.

महिलांना : नातेवाइकाची गाठभेट होईल.

विद्यार्थ्यांना . शिक्षकाच्या मनात आदर निर्माण होईल.

**वृषभ : सामर्थ्य वाढेल**

राशीत गुरू आहे. त्याच्या मदतीला आता मंगळ आला आहे. त्यामुळे तुमचे सामर्थ्य फार वाढले आहे. त्याचा परिणाम तुमच्या यशावर अनुकूल होणार आहे. उद्योगात व इतर कोणत्याही व्यवसायात या वेळी जे पाऊल उचलाल ते यशस्वी ठरणार आहे प्रगतीचे नवे पर्व सुरू करणारे ठरणार आहे. भाडवलगुतवणुकीसाठी प्रयत्न करा. पैसा कमी पडणार नाही. नोकरीत तुमचे वर्चस्व वाढेल. अधिकारात वाढ होईल. कार्यक्षमता वाढेल. जुने रेंगाळलेले काम मार्गी लागेल. सरकारदरबारी प्रतिष्ठा उचावेल. लेखक म्हणून मान्यता पावाल. कलाक्षेत्रात प्रसिद्धी मिळेल. कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. अविवाहिताचे विवाह जुळून येतील. ससारात आनंद निर्माण होईल. शुभ दिनांक १०–१२.

महिलांना : नोकरीत समाधानकारक वातावरण राहील.

विद्यार्थ्यांना : हुशारीने सगळ्यांना आवडाल.

**मिथुन : बेसावधपणा नको**

बाराव्या गुरूच्या जोडीला आता मगळदेखील बारावा होऊन तुमच्यावर नाराज झाला आहे त्यामुळे या वेळी अत्यंत सावध राहून एकूण कारभार करणे आवश्यक आहे. तुम्ही व्यापारी असाल तर खरेदी-विक्रीचे वायदे करताना दक्षता घेणे आवश्यक आहे. खोटेपणा, फायदा उठविण्यासाठी बेकायदेशीरपणा करू नका. बाराव्या मगळाची तुमच्यावर काळनजर आहे. नोकरीत वरिष्ठाची मर्जी डळमळू लागेल. कामात चुका होऊ देऊ नका एखाद्या जुन्या चुकीची चौकशीदेखील सुरू होऊ शकेल. कॅशियर अगर इतर पैशाचे व्यवहार ज्यांच्याकडे असतात त्यानी दक्षता घ्यावी. कौटुंबिक स्वास्थ्य थोडे कमी होईल. कोणत्या तरी भांडणात ओढले जाल. पैशाची अडचण निर्माण होईल शुभ दिनांक १३–१४.

महिलांना : शेजाऱ्यांच्या भाडणात लक्ष घालू नका.

विद्यार्थ्यांना : रस्त्याने चालताना सावध राहा.

**कर्क : खर्च आटोक्याबाहेर**

गुरू व बुध बारावे आहेत. बुध हा व्यापारी ग्रह बारावा आहे याचा परिणाम पैशाची टचाई व आवाक्याबाहेर खर्च होणे असा होणार आहे. त्यामुळे या वेळी काटकसरीचे धोरण ठेवणे आवश्यक आहे. व्यापारी लोकानी वायदे करताना फार दक्षता घ्यावी शेअर्सचा बाजार अनिश्चित राहणार आहे त्यामुळे हा व्यवहार करणाऱ्यांनी विचारपूर्वक वायदे करावेत. चालू नोकरीत गुप्त शत्रूपासून त्रास होण्याची शक्यता आहे. वरिष्ठांचे कान फुकणारे लोक तुमच्याभोवतीच असतील. चुका होऊ देऊ नका. लेखकाना ठरल्याप्रमाणे लेखन करता येणार नाही स्थावराचा व्यवहार लाबणीवर पडेल. तरी पण मंगळ लाभदायक आहे. त्यामुळे यातूनदेखील तुम्ही व्यवस्थित बाहेर पडाल. रेसमध्ये लाभ. शुभ दिनांक ११–१२.

महिलांना : घरससारात काही तरी अनपेक्षित अनुकूल घडेल.

विद्यार्थ्यांना : खेळताना काळजी घ्यावी.

**सिंह : प्रगतीचा मार्ग**

या आठवड्याअखेरपर्यंत रवि अकरावा आहे. नतर तो बारावा होणार आहे. तो राशिस्वामी आहे तरी पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या वेळी तुमची आर्थिक बाजू भक्कम होणार आहे. अनपेक्षित अर्थलाभ होईल. रेस–लॉटरी व शेअर्समधून लाभ होईल. व्यापारात केलेले अंदाज अचूक ठरतील. प्रवासाला हा आठवडा खूपच प्रतिकूल आहे. परदेशी प्रवास होईल. हाती घेतलेली कामे पार पडतील. स्थावराची कामे हातावेगळी होतील. नवी नोकरी लागेल. चालू नोकरीत वरिष्ठाची मर्जी राहील. तरीपण कामाचा ताण वाढेल. सहकारी चागले सहकार्य देतील. कौटुंबिक वातावरण एकूण प्रसन्न राहील. शुभ–९, ११.

महिलांना : नोकरीत मोठेपणा मिळेल.

विद्यार्थ्यांना : अभ्यासातील हुशारीबद्दल शाबासकी मिळेल.

**कन्या : बरीच अनुकूलता**

सध्या अनेक ग्रह तुमच्यावर खूष आहेत. राहू चद्राभोवती विळखा घालून बसला असला तरी त्याचा त्रास नाही. शनि–बुध अकरावे आहेत. मंगळ भाग्यस्थानी आहे तर रवि दहावा आहे त्यामुळे आर्थिक आघाडी बरीच अनुकूल होणार आहे धंद्याचे बस्तान बसेल मदावलेला धंदा पुन्हा गती धरील. नव्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी बरीच मदत होईल. लॉटरीत लाभ होईल. अनपेक्षित अर्थलाभ होईल. चालू नोकरीत एकूण वातावरण प्रगतीचे राहील प्रयत्नाने का होईना काही मागण्या मान्य होतील. बेकाराना या वेळी नोकरी मिळेल प्रतिष्ठा वाढेल. प्रसिद्धी टिकेल. चागले लेखन हातून होईल. अपुरे लेखन पुरे होईल. पत्रव्यवहाराने काही नवे पदरात पडेल. शुभ–९, १३.

महिलांना : एकूण धावपळ बरीच कमी होईल.

विद्यार्थ्यांना : अभ्यासात मन रमेल.

**तूळ : संमिश्र फल**

मंगळ आठवा झाला आहे. बुध दहावा झाला आहे. मगळाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेषतः ज्याची तब्येत अति उष्ण किंवा अति थड आहे त्यानी काळजी घ्यावी. पोहताना कोणतेही धाडस करणे टाळावे. आर्थिकदृष्ट्या आठवडा अनपेक्षित लाभाचा

आहे श्रमाशिवाय पैसा हाती येऊ शकेल. स्थावराची समस्या मार्गी लागेल. शेतीचा प्रश्न समाधानकारक सुटेल. शेती–बागायती बहरेल. हाती घेतलेल्या कामात मोठे यश येईल. मात्र वाहन खरेदी करायचे लांबणीवर टाका. कारण अपेक्षेपेक्षा अधिक पैसा खर्च होईल. वाहन चालवणाऱ्याने वेगावर नियंत्रण ठेवावे नोकरीत समाधानकारक परिस्थिती राहील कार्यक्षमता वाढेल. वरिष्ठांच्या मर्जीचा प्रत्यय येईल शुभ–१०, १२.

**महिलांना :** बरेच काही अपेक्षेप्रमाणे घडेल.

**विद्यार्थ्यांना :** कलावृत्ती जागृत होईल.

## वृश्चिक : नोकरीत यश

राशिस्वामी मंगळ सातवा झाला आहे. तो संसारात नवे काही तरी अनुकूल घडवून आणणार आहे. त्याचा लाभ होईल. ज्यांची नुकतीच लग्ने झाली आहेत त्यांना सासुरवाडीकडून मदत मिळेल. वर्चस्व वाढेल. नोकरीच्या बाजूला फार छान घटना घडतील. आजवर न मिळालेले फायदे मिळतील. विशेषतः जे प्रमोशन आजवर लांबणीवर पडत होते ते आता मिळेल. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. बेकारानी नोकरीपेक्षा धंद्याकडे लक्ष द्यावे. या वेळी व्यापारात मात्र म्हणण्यासारखे यश मिळणे कठीण आहे कर्ज काढले असेल त्याचे वसुलीचे तगादे लागतील. माल पडून राहाण्याचा धोका आहे. इंजिनियरिंग उद्योगास ठीक आहे. शुभ–१३, १५.

**महिलांना :** नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहून काम होईल.

**विद्यार्थ्यांना :** भाडण व संताप आवरणे आवश्यक.

## धनु : समाधान लाभेल

सहावा मंगळ तब्येतीस जरी तेवढासा अनुकूल नसला तरी विरोधकांचे पापदर्शन घडवणारा आहे. कोणत्याही क्षेत्रात असलेले तुमच्याबद्दलचे गैरसमज या वेळी दूर होतील. मन प्रसन्न राहील. नोकरीत काळजी राहणार नाही. एखादे नवे काम मिळेल ते करून दाखविण्यासाठी आवश्यक असलेला उत्साह राहील. स्वतःची इच्छा असलेला असा एखादा नजिकचा प्रवास घडण्याचा संभव आहे. एखादे पत्र असे येईल की त्यामुळे सर्व आशा-आकांक्षा पार पडतील. दुय्यम धंदा सुधारेल. रेंगाळत राहिलेली कामे पार पडतील. रेस-लॉटरीपासून लाभ होईल. व्यापारातील फायदे बरेच हितकारक ठरतील. शेअर्समध्ये लाभ होईल जुने येणे वसूल होईल. व्यापारात नवीन भांडवल गुंतवणूक सुकर होईल. शुभदिनांक – १४–१५.

**महिलांना .** व्रतवैकल्ये मनासारखी करता येतील

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासाची जिद्द निर्माण होईल.

## मकर : मार्ग सापडेल

मंगळ हा मकर राशीचा ऐश्वर्याचा ग्रह आहे. त्याचे वरदान लाभले तर कोणतेही काम यश देऊन गेल्याशिवाय राहणार नाही. पण तुम्ही तुमचे मन प्रामाणिक ठेवले पाहिजे. खोटेपणा, डावपेच मंगळाला मान्य नाहीत या वेळी तुम्ही जे जे काही ठरवाल वा योजाल ते ते सोन्यासारखे यश मिळवून देईल नोकरीत वरिष्ठाबरोबर बेबनाव होण्याची शक्यता आहे. पण ते सगळे श्रेयस्कर होईल प्रवास हिताचा ठरेल. ज्याची विदेशयात्रा करण्याची इच्छा होती व प्रयत्न चालू होते त्यांना यश येणार आहे. जमीन, घर, शेती यात मन रमणार आहे. एखादा धंदा सुरू होईल. विशेषतः लोखंड, पोलाद याच्याशी संबंध असलेला धंदा सुरू होईल. ज्याना नोकऱ्या मिळाल्या नसतील त्या या वेळी मिळतील प्रगतीचा मार्ग सापडेल. शुभ – ११–१४.

**महिलांना :** धावपळ टाळावी. प्रकृतीची काळजी घ्यावी.

**विद्यार्थ्यांना :** स्मरणशक्ती जागृत होईल.

## कुंभ : धंद्यात प्रगती

सुखस्थानी मंगळ आला आहे तो जरी मानसिक स्थिती आंदोलनात्मक ठेवणार असला तरी उत्पादनात भर घालणार आहे विशेषतः तुम्ही जर वकील, इंजिनिअर, शिक्षक, डॉक्टर अथवा रसायनाशी संबंधित असाल तर या वेळी हाती माती धरली तरी सोने होईल. नोकरीत प्रयत्न करण्यास हरकत नाही बरीच वरची जागा मिळणार आहे. प्रमोशन, बढती मिळणार आहे. एखादी फिरतीची महत्त्व वाढवणारी नोकरी देखील मिळू शकेल. व्यापाऱ्याना लाभ होईल. जपून खर्च केला तर फायदा वाढेल पेटी मोकळी होईल. धंदा, करण्याच्या योजना कार्यान्वित होतील. प्रवास घडेल. अनेक महत्त्वाच्या घटना घडतील. रेसमध्ये लाभ होईल. राजकारणात लाभाची जागा मिळेल. प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित होईल. नवे संबंध जुळून येतील शुभ – १३–१५

**महिलांना :** घरगुती धंद्यात प्रगतीच्या वाटा मोकळ्या होतील.

**विद्यार्थ्यांना .** मन प्रसन्न राहील.

## मीन : यशाची चढती कमान

तुम्ही गुरूचे वर्चस्व असणारे लोक आहात. धर्मभावना प्रिय असते. अध्यात्माकडे ओढा असतो. अंतर्मन जागे असते. स्फूर्ति असते. त्यामुळे अनपेक्षित असे बरेच काही घडत असते. अध्यात्मात यश येणार आहे. साधुसताचे दर्शन घडेल. साक्षात्कारी प्रत्यय येईल उपासनेचे फळ येईल. ध्यानी मनी नसलेली घटना घडून मन आनंदी होईल. प्रसन्नता लाभेल. नोकरीत लाभकारक घटना घडतील. कामात थोडाफार बदल होईल. आवडते काम मिळण्याची शक्यता आहे. गुणांना प्रोत्साहन मिळेल. सार्वजनिक कार्यात भाग घेता येईल. प्रसिद्धी मिळेल. प्रवास घडेल. उच्चपदस्थ व्यक्तीबरोबर संबंध येईल. आरोग्य सुधारेल. अनपेक्षित अर्थप्राप्ती होईल. अनेकाचे सहकार्य मिळेल. आशा-आकांक्षा पल्लवित होतील. मन प्रसन्न राहून कार्यक्षम राहील. शुभ — १२–१३.

**महिलांना :** माहेरच्या माणसाची गाठभेट होईल.

**विद्यार्थ्यांना .** अनेक बाबतीत सुखकारक आहे

□

सलामी पुस्तक योजना, रुपया पुस्तक योजना, पॅपिलॉन पुस्तक योजना या तीन मोठ्या व अनेक छोट्या सवलत पुस्तक योजनांच्या परिपूर्तीनंतर आता

# ' टॉलस्टॉय ' पुस्तक योजना

## पाच पुस्तके । प्रत्येकी सात रुपये । नोंदणी शुल्क पंधरा रुपये

**या योजनेत उपलब्ध होणारी पुस्तके**

| पुस्तकाचे नाव | लेखक | मूल्य ( अंदाजे ) |
|---|---|---|
| १ : टॉलस्टॉय-एक माणूस | सुमती देवस्थळे | पन्नास रुपये |
| २ : महाडचा मुक्तिसग्राम | प्रा. रा. म. बिवलकर<br>प्रा. ज्ञुबरलाल कांबळे | वीस रुपये |
| ३ : पश्चिमेचे पुत्र | रवींद्र पिंगे | पंधरा रुपये |
| ४ : दि टच् | अशोक प्रभाकर डांगे | पंधरा रुपये |
| ५ : आर डॉक्युमेंट | अशोक जैन | वहा रुपये |

**वरील सुमारे १०० रुपये दर्शनी किंमतीची ५ पुस्तके फक्त ७×५ = ३५ + १५ = ५० रुपयात**

## योजनेसंबंधी थोडे अधिक

* योजनेतील ' महाडचा मुक्तिसंग्राम ' व 'आर डॉक्युमेंट ' ही दोन पुस्तके सभासदांना जुलैच्या शेवटच्या आठवड्यात संस्थेच्या कार्यालयात मिळू शकतील
* ' पश्चिमेचे पुत्र ' व ' दि टच् ' ही दोन पुस्तके सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मिळू शकतील
* ' टॉलस्टॉय-एक माणूस ' हे पुस्तक डिसेम्बर ७७च्या शेवटच्या आठवड्यात मिळू शकेल.
* नोंदणी शुल्क पंधरा रुपये त्वरित पाठवावे. पाचही पुस्तकांची सवलतीची किंमत + नोंदणी-शुल्क असे मिळून होणारे रुपये पन्नास एकदम पाठवले तरी चालू शकेल
* ज्यांना पुस्तके रजि. पोस्टाने घरपोच हवी असतील त्यांना ती जानेवारी ७८ पूर्वी एक, दोन किंवा तीन हप्त्यात सोयीप्रमाणे पाठविली जातील टपाल पाठवणी खर्च + सवलतीची न भरलेली किंमत इतक्या रकमेची व्ही. पी. सभासदाला केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यायची आहे.
* व्यक्तिगत ग्रंथसंग्रह हा योजनेचा मूळ हेतु असल्याने ग्रंथ-विक्रेत्यांना या योजनेत सहभागी होता येणार नाही
* रक्कम शक्यतो म. ऑ. ने पाठवावी. चेक असल्यास वटणावळ रुपये दोन अधिक.
* चेक, ड्राफ्ट, म. ऑ. ' राजहंस प्रकाशन ' या नावे पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

# किंवा

**१०० रुपये ठेव राजहंस प्रकाशनाकडे पाच वर्षे ठेवणारास व्याजाच्या मोबदल्यात वरील पाचही पुस्तके विनामूल्य मिळतील.**

( टपाल + पाठवणी-खर्च ठेवीदाराकडे )

**' राजहंस प्रकाशन ', १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.**